# “अनधिकृत गोदामांवर नंतर बोलू आधी आग विझवू”

## अतिरिक्त आयुक्तांची अनधिकृत गोदामांना बगल!

**पिंपरी-चिंचवड, दि.१०: प्रतिनिधी**



पिंपरी- चिंचवड शहरातील कुदळवाडी भागात भंगाराच्या गोदामाला भीषण आग लागल्यानंतर चिखली आणि कुदळवाडीतील अनाधिकृत गोदामांचा आणि भंगार दुकानांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी अधिक बोलण्यास टाळाटाळ करत आधी आग विझवणे महत्त्वाचे आहे. अनधिकृत गोदमांवर आपण नंतर बोलू असे म्हणत अनधिकृत गोदामांनाबद्दल न बोलता त्यांनी एक प्रकारे बगल दिली आहे. चिखली कुदळवाडी मध्ये काल सकाळी दहाच्या सुमारास गोदामाला भीषण आग लागली. या घटनेनंतर अग्निशमन दलाच्या १५ ते २० गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या.

आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान शर्तीचे प्रयत्न करत होते. या आगीमध्ये आत्तापर्यंत ४० ते ५० दुकाने जळून खाक झाल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त जांभळे यांनी दिली आहे. अद्याप घटनेत कुणीही जखमी नाही. जीविहितहानी झालेली नाही. दरम्यान, चिखली आणि कुदळवाडी परिसरात अनधिकृत गोदामे आणि भंगार दुकाने असल्याचा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यानंतर सर्वात आधी आपण आग विझवणे यावर लक्ष केंद्रित करू मग अनाधिकृत गोदामांवर बोलू असे म्हणत त्यांनी गोदामांवर बोलणे टाळले आहे. हे पाहता महानगरपालिका अधिकारी आणि चिखली कुदळवाडीतील भंगार व्यावसायिक आणि अनधिकृत गोदाम यांच्यात संगनमत आहे. हे सर्वश्रुत झाले असल्याचे बोलले जात आहे. आगीला जबाबदार असणाऱ्या वर कारवाई करणार असल्याचं अतिरिक्त आयुक्त जांभळे यांनी आश्वासन दिल आहे.

# बिबट्याचा वावर असलेल्या संवेदनशील गावांत सौर कुंपण


**ठाणे, दि.१०: प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात बिबट्याचा वावर वाढू लागला आहे. बिबट्याचा अधिक प्रमाणात वावर असलेल्या एकांतात असलेल्या घरांमधील कुटुंबीय, पशुधन, पाळीव प्राणी यांना बिबट्यापासून धोका निर्माण झाला आहे. अशा संवेदनशील गावांमध्ये एकांतात असलेले शेत शिवार, माळरानांवरील घरांभोवती सौर कुंपण लावण्याचा पथदर्शी प्रकल्पाचा प्रस्ताव शहापूर वनविभागाने तयार केला आहे. शासन मंजुरीच्या आवश्यक त्या पूर्तता झाल्यावर या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड, शहापूर, कल्याण, भिवंडी, माळेशज, कसारा घाट परिसरात बिबट्याचा वावर वाढला असून जंगलात लाकूडफाटा, वनोपज गोळा करणे, शेतकरी, गायी, शेळ्यांच्या गोरक्षकांवर यापूर्वी बिबट्याने हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत.

बिबट्या आणि मानवी वस्तीमधील हा संघर्ष वाढत चालला आहे. भक्ष्य शोधण्यासाठी अनेक वेळा रात्रीच्या वेळेत बिबटे गाव हद्दीतील गोठ्यांमध्ये येऊन पशुधन, भटक्या श्वानांवर हल्ले करतात. हे प्रकार वेळीच रोखण्यासाठी मनुष्य व पशुधन हानी रोखण्यासाठी शहापूर वन विभागाने शहापूर तालुक्यातील बिबट्यांचा वावर, चलत मार्ग असलेल्या काही गावांमधील एकांतात असलेली घरे निश्चित केली आहेत.

बिबट्याचा वावरामुळे या घरांचा परिसर संवेदनशील म्हणून जाहीर केला आहे. अशा एकांत वस्तीत बिबट्याने शिरकाव केला तर त्याला वेळीच सुरक्षितपणे, कोणत्याही प्रकारचा त्रास न होता अटकाव व्हावा या उद्देशातून वन विभागाने संवेदनशील घरांभोवती सौर कुंपण उभारण्याचा निर्णय घेतला आहे. वन विभागातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सदरची माहिती दिली आहे.



### सौरकुंपण प्रस्ताव

सौरकुंपण प्रस्तावाप्रमाणे एक एकर शेती परिसरात घर, गुरांचा गोठा असेल तर त्याला संरक्षित करण्यासाठी 30 हजार रुपये खर्च येतो. या निधीतील 75 टक्के रक्कम शासकीय अनुदानातून शेतकऱ्याला दिली जाईल. उर्वरित 25 टक्के रक्कम शेतकऱ्याने स्वत: उभारून हा प्रकल्प आकारात आणायचा आहे. या प्रकल्पासाठी देखभाल दुरुस्तीसाठी नियमितचा खर्चही असणार नाही. बिबट्याचा वावर असलेल्या एकांतामधील घर, गोठ्याला कुंपण घातले जाईल. त्या कुंपणाच्या आतील भागात सौरपट्ट्या बसविल्या जातील. सौरपट्ट्यांमधून तयार होणारी सौर वीज बॅटरी माध्यमातून कुंपणात सोडण्यात येईल. अचानक दिवसा, रात्री अन्य वन्यजीव किंवा बिबट्या एकांतामधील घर परिसरात भक्ष्यासाठी आला. त्याचा स्पर्श सौर कुंपणाला झाला की, वन्यजीव किंवा बिबट्याला विजेचा सौम्य धक्का बसेल आणि त्याचवेळी सौर यंत्रणेवर चालणारा भोंगा वाजण्यास सुरुवात होईल. शॉक बसल्याने बिबट्या पळून जाईल आणि भोंग्याच्या आवाजामुळे शेतकरी जागा होईल. या प्रकल्पामुळे बिबट्या पण सुरक्षित आणि शेतकऱ्याचे कुटुंब, पशुधन एकांतात असले तरी सुरक्षित राहण्यास मदत होणार आहे, असे असे देखील या वनाधिकाऱ्याने सांगितले.

### प्रस्ताव आदर्शवत ठरण्याची शक्यता

या पथदर्शी प्रकल्पामुळे बिबट्या किंवा वन्यजीवांस कोणत्याही प्रकारची दुखापत होणार नाही. त्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होणार नाही याची विशेष काळजी या प्रकल्पात घेण्यात आली आहे. अलीकडे एकांतामधील घर परिसरात लोखंडी जाळीचे कुंपण करण्यासाठी दोन ते अडीच लाख खर्च येतो. त्याच जागी सौरऊर्जेच्या माध्यमातून सौर कुंपण उभारण्याचा प्रयत्न केला तर शासकीय आर्थिक साहाय्याने तीस हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे बिबट्या, मानवातील संघर्ष थांबविण्यासाठी राबविण्यात येणारा शहापूर वनविभागाचा हा प्रस्ताव आदर्शवत ठरण्याची शक्यता आहे.

# पुढे आरोपी, मागे पोलीस पाठलागाचा थरार!

## आरोपी पाठोपाठ पोलीसही पडला विहिरीत

**संगमनेर, दि.१०: प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या संगमनेर तालुक्यामध्ये एक धक्कादायक आणि तितकीच आश्चर्यकारक घटना घडली. अनेक वर्षांपासून एका गुन्ह्यातील फरार असलेला आरोपी आपल्या एका नातेवाईकाकडे आला असल्याची टीप मिळाल्यानंतर पोलीस पथक त्याला पकडण्यासाठी गेले. सावध असलेल्या आरोपीला पोलीस आल्याचा सुगावा लागताच त्याने तिथून धूम ठोकली. पोलीसही त्याच्या पाठोपाठ धावले. रात्रीच्या वेळी आरोपी आणि पोलिसांचा हा पाठ शिवणीचा खेळ चालू असताना अंदाज न आल्याने आरोपी विहिरीत पडला. त्याच्या मागे पळत असलेल्या पोलिसालाही अंदाज न आल्याने तोही विहिरीत पडला. नंतर गावकऱ्यांनी दोघांनाही विहिरीतून सुरक्षितरीत्या बाहेर काढले. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, संगमनेर तालुक्यातील तालुक्यातील सांगवी गावामध्ये ही घडली. जुन्या वादाच्या कारणावरून तालुक्यामध्ये २०१६ साली हाणामारी झाल्याची एक घटना घडली होती. या घटनेतील आरोपीने आपल्या मामा आणि मामीला जमिनीच्या वादातून बेदम मारहाण केली होती. त्यामुळे या आरोपीविरुद्ध पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकेच्या भीतीने आरोपी फरार झाला होता. पोलिसांनी वारंवार प्रयत्न करूनही त्यांना गुणगरा देण्यात आरोपी यशस्वी होत होता. अधूनमधून तो आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी संगमनेरमध्ये यायचा याची माहिती पोलिसांना होती. त्याच्या मोबाईलच्या लोकेशन वरून पोलिसांना त्याचा ठाव ठिकाणा लागताच त्याला अटक करण्यासाठी एक पोलीस पथक तातडीने रवाना झाले. आरोपी ज्या ठिकाणी थांबलेला होता, त्या ठिकाणी पोलीस पथकातील कर्मचारी पोहचले. आपल्याला पकडण्यासाठी पोलीस पथक आल्याची कुणकुण लागताच या आरोपीने पोलिसाला धक्का देऊन पलायन केले. पोलीस पथकाने त्याचा पाठलाग केला.

एका शेतातून आरोपी पुढे पळत होता तर पोलीस पथक मागून त्याचा पाठलाग करीत होते. हा सर्व प्रकार रात्रीच्या वेळी सुरू होता. पोलिसांपासून वाचण्यासाठी आरोपीने झाडाझुडपांमधून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र अंधारामुळे मध्येच आलेल्या विहिरीचा अंदाज न आल्याने आरोपी व त्याच्या पाठोपाठ पोलीस पथकातील एक पोलीस कर्मचारी विहिरीत पडले. विहिरीत पडलेल्या आरोपीला पोहता येत असल्याने त्याने लगेचच विहिरीच्या कडेचा आसरा घेतला. मात्र पोलीस कर्मचाऱ्याला पोहता येत नसल्याने पाण्यात बुडू लागला. जीवाच्या आकांताने बुडणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांने आरडाओरडा सुरू केला. आवाजाच्या दिशेने धावलेल्या पोलिसांना आरोपी आणि पोलीस कर्मचारी विहिरीत पडल्याचे लक्षात आले. त्यांनी तातडीने काही ग्रामस्थांच्या मदतीने दोघांनाही विहिरीतून वर काढले व उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. विहिरीत पडलेला पोलीस कर्मचारी व आरोपी संगमनेर शहरातील रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती मिळाली.

# जिवे मारण्याची धमकी देऊन शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य, अल्पवयीनांविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे, दि.१०: प्रतिनिधी**

शाळकरी मुलगी, तसेच तिच्या भावाला जिवे मारण्याची धमकी देऊन अल्पवयीनांनी तिच्याशी अश्लील कृत्य केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी सहकारनगर पोलिसांनी दोन अल्पवयीनांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत एका शाळकरी मुलीने सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, अल्पवयीनांविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण प्रतिबंधक कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला. पीडीत १४ वर्षीय मुलगी एका शाळेत आहे. नोव्हेंबर महिन्यापासून अल्पवयीन मुलीचा पाठलाग करत होती. मुलीला अडवून एका अल्पवयीनाने तू मला आवडते. माझ्यासोबत बोलली नाही, तर समाजात तुझी बदनामी करेल, अशी धमकी दिली. अल्पवयीनाने धमकी दिल्यानंतर मुलीने या प्रकाराची माहिती पालकांना दिली. तेव्हा तिच्या पालकांनी अल्पवयीन आणि त्याच्याबरोबर असलेल्या साथीदाराला समज दिली.

त्यानंतर मुलगी शनिवारी (७ डिसेंबर) शाळेत गेली होती. अल्पवयीन आणि त्याचा मित्र शाळेत गेले. मुलीला शाळेबाहेर बोलाविले. मुलीला दुचाकीवरुन शाळेच्या परिसरातील मोकळ्या जागेत नेले. अल्पवयीनाने तिच्याशी अश्लील कृत्य केले. त्याच्याबरोबर असलेल्या मित्राने मोबाइलवर छायाचित्र काढले. या प्रकाराची कोणाकडे वाच्यता केल्यास समाज माध्यमात छायाचित्रे प्रसारित करू, तसेच मुलगी आणि तिच्या भावाला जिवे मारण्याची धमकी दिली. त्यांच्या धमकीमुळे घाबरलेल्या मुलीने अखेर पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक छगन कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक काळे तपास करत आहेत.

शहर, तसेच उपनगरात अल्पवयीन मुलींशी अश्लील कृत्य करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अशा घटनांना वाचा फोडण्यासाठी शालांमध्ये समुपदेशन करण्यात येत आहे. शाळा, तसेच परिसरात कोणी छेड काढली किंवा अश्लील कृत्य केल्यास त्वरीत पोलिसांकडे तक्रार देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# लोकलमध्ये डोंबिवलीतील प्रवाशांना मद्यधुंद खासगी बाऊन्सरची दमदाटी

**ठाणे, दि.१०: प्रतिनिधी**

डोंबिवली ते नाहूर दरम्यान लोकलने प्रवास करत असताना गुरूवारी (दि.5) दुपारच्या सुमारास मद्यधुंद अवस्थेत असलेल्या एका बलदंड बाऊन्सरने कोणतेही कारण नसताना दहशत माजविण्याचा प्रयत्न केला. लोकलमधील तिघा प्रवाशांना दमदाटी करून त्यांना मारण्याची धमकी दिली. तसेच एका भिक्षूकाला जय श्रीराम बोलण्याची सक्ती केली. वेगवेगळ्या कारणांवरून धाक व धमक्या देणाऱ्या बाऊन्सरच्या विरोधात एका जागरूक प्रवाशाने डोंबिवली लोहमार्ग पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा नोंदवून या बाऊन्सरला पुन्हा असे केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, अशी नोटीसद्वारे सक्त ताकीद दिली आहे.

यातील वयोवृद्ध तक्रारदार हे डोंबिवलीकर रहिवासी आहेत. तर या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला बाऊन्सर 28 वयोगटातील असून तो डोंबिवली जवळच्या लोढा हेवन परिसरात राहतो. या संदर्भात लोहमार्ग पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, गुरूवारी (दि.5) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास तक्रारदार गृहस्थ डोंबिवली ते नाहूर लोकलने प्रवास करत होते. इतक्यात त्याच लोकलमध्ये अन्य प्रवाशांसह एक भिक्षूकही प्रवास करत होते. याच लोकलच्या डब्यातून बलदंड शरीरयष्टीचा बाऊन्सर देखिल प्रवास करत होता. तक्रारदाराने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार हा बाऊन्सर दारूच्या नशेत धुंद होता. त्याने तक्रारदारासह अन्य दोघा प्रवाशांशी वाद उकरून काढत लोकलमध्ये आरडाओरडा सुरू केला. इतर प्रवासी त्याला शांत राहण्याचा सल्ला देत होते. तथापी बाऊन्सर काही केल्या ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. त्याने तक्रारदारासह अन्य प्रवाशांना काहीही कारण नसताना मारण्याची धमकी दिली. याच लोकलच्या डब्यातून प्रवास करणाऱ्या एका भिक्षूकाला त्याने जय श्रीराम बोलण्याची सक्ती केली. लोकल डब्यात गोंधळ घालून मारण्याची धमकी दिल्याने भयभीत झालेल्या प्रवाशाने त्याच दिवशी रात्री बाऊन्सरच्या विरोधात डोंबिवली लोहमार्ग पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.

# भिवंडीत बनावट फेविकॉल व फेव्हिक्विक बनवणाऱ्या गोदामावर आयपी कंपनीचा छापा; मालकावर गुन्हा दाखल

**भिवंडी, दि.१०: प्रतिनिधी**

शहरातील मानकोली रोड येथील वळगाव या ठिकाणी मुंबईच्या आयपी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी बनावट फेविकॉल तयार करून ते ग्राहकांना विकून फसवणूक करणाऱ्या गोदामावर छापा टाकून सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त करीत गोदाम मालकाच्या विरोधात नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.उमेश शत्रुघ्न रेवंडकर (रा.ठाणे) असे गुन्हा दाखल झालेल्या गोदाम मालकाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,वळगाव येथील पारसनाथ कंपाऊंड मधील ईजी इंडस्ट्रीज या गोदामात पिडीलाईट इंडस्ट्रीज लि. रिजेंट चेंबर्स या कंपनीचे उप उत्पादन फेविकॉल व फेव्हीक्विक या ब्रँडची हुबेहूब नक्कल व रंगसंगती असलेले बनावट फेविकॉल व फेव्हीक्विक तयार केला जात असल्याची गुप्त माहिती मुंबई येथील इनवेस्टीगेशन अँड डीटेक्टीव्ह सर्व्हिसेस प्रा. लि. (आयपी) कंपनीला मिळाली होती,त्यानुषंगाने आयपी कंपनीचे तपासी अधिकारी दिनेश शेट्टी त्यांचे सहकारी मुख्य तपासि अधिकारी फकरुद्दीन शेख ,रिजनल ऑफिसर आदिल पटेल,गुमा-मुख्य तपासि अधिकारी जितु महादेव,तपासी अधिकारी रवी लालचंद वासवाणी,सर्व्हे



ऑफिसर श्रीमती दिपाली पाटील आदी पथकाने नारपोली पोलिसांच्या मदतीने ७ डिसेंबर रोजी छापा टाकला असता ११ हजार रुपये किमतीचे फेविकॉल एम आर या २० ग्रॅम प्लास्टिकचे ५०० रुपयाप्रमाणे २२ रोल, फेविकॉलने भरलेल्या ११ हजार १०० रुपयांच्या ५५५ प्लास्टिक बाटल्या,पिडीलाईट नाव असलेले प्लास्टीकचे २ रोल,प्लास्टिक बॉटल ठेवण्याचे ७ पॅकिंग पुठ्ठे,१२ हजार किमतीचे पिवळ्या व निळ्या रंगाचे १२ रोल,६० हजार रुपयांची बॉटलवर लेबल लावण्याची इलेक्ट्रिक मशीन,१ लाख २० हजारांचे फ्लेक्स क्विक नावाचे १० बॉक्स,१ लाख १ हजार ६०० रुपये किमतीचे १६ मोठे रिकामे बॉक्स तसेच बनावट उत्पादनाकरिता लागणारा सामान असा एकूण २ लाख १७ हजार ५७५ रुपयांचा बनावट मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला आहे.याप्रकरणी गोदाम मालक उमेशच्या विरोधात नारपोली पोलिस ठाण्यात (आयपी) तपासी अधिकारी दिनेश शेट्टी यांच्या फिर्यादीवरून प्रतीलिपी अधिकार अधिनियम १९५७ चे कलम ५१,६३ न्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नारपोली पोलिस ठाण्याचे वपोनि भरत कामत करीत आहेत.

# ठाण्यात डोंगरांना आगी लागण्याच्या घटना वाढल्या

**ठाणे, दि.१०: प्रतिनिधी**

जमिनी आणि गवत सुकल्यानंतर डोंगरांना आगी लागण्याच्या घटनांत वाढ झाली आहे. माती चोर आणि ठेकेदारांना माती उत्खनन करण्यास वाट मोकळी व्हावी या करता आगी लावल्या जात आहेत. वनविभागाकडून उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

निसर्गरम्य डोंगरांना आगी लावण्याचे प्रकार समाजकंटकांकडून सुरूच आहेत. नुकतेच पिरकोन रस्त्यालगत डोंगराला लागलेली आग तीन तासांनी आटोक्यात आणण्यात यश आले आहे. मात्र यामध्ये हिरवीगार निसर्गसंपदा नष्ट होत असल्याने हे वणवे लावणाऱ्यांचा वनखात्याने बंदोबस्त करावा, अशी मागणी निसर्गप्रेमींकडून होत आहे. माती उत्खननासाठी या आगी जाणूनबुजून लावल्या जात असल्याचा आरोप निसर्गमित्रांनी केला आहे. एकीकडे महाराष्ट्र शासन करोडो रुपये वृक्षलागवडीसाठी खर्च करीत आहे. अनेक संस्थासुद्धा वृक्ष लागवड करीत आहेत. त्यामुळे डोंगर पठारांवर वृक्षांची हिरवळ वाढली आहे.

पर्यायाने या वनराईमध्ये अनेक वन्य पशुपक्षांचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सध्या थंडीचा हंगाम सुरू असल्याने विविध प्रजातींच्या विणीचा हंगाम सुरू आहे. पक्षांच्या घरट्यात उबवणुकीची अंडी असतानाच काही समाजकंटक मुद्दामहून या हिरव्यागार वनराईला वणवे लावुन नष्ट करीत आहेत. त्यामध्ये विविध प्राणी पक्षी जळून नष्ट होत आहेत.

प्राणी, पक्षांबरोबरच विविध जातीच्या औषधी वनस्पतींची सुद्धा या आगीच्या वणव्यांमध्ये राख होत असल्याने निसर्गप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे. दरवर्षी वणवे लागून हिरवीगार वनसंपदा नष्ट होऊ लागली आहे, तर शासनाने करोडो झाडे लावूनही महाराष्ट्रातील डोंगर भकास राहतील अशी भीती निसर्गप्रेमींकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## वरवेची माध्यमिक शाळा ग्रामस्थांनी पाडली बंद

**भोर, दि.१०: प्रतिनिधी**

पुणे - सातारा महामार्ग लगत असणारे न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक शाळा आज सकाळी ग्रामस्थांनी संस्थेच्या फलकाला काळे फासून शाळा बंद पाडली आहे. यामुळे शिक्षण संस्थेत मोठी खळबळ उडाली आहे. या शाळेत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत विद्यार्थ्यांची संख्या 316 असून शिक्षक कर्मचारी 15 असे आहेत. देवस्थाने दिलेल्या जागेवर शिक्षण संस्थेचा सातबारा असून त्या जागेचा कोणताही गैरवापर आम्ही करत नसून केवळ विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ही जागा वापरत असल्याचा दावा शिक्षण संस्थेच्या शिक्षकांनी केला आहे.

वरवे देवस्थान ट्रस्ट आणि उल्हास शिक्षण संस्था यांच्या जमिनीचा प्रलंबित वाद असून वरवे येथे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी देवस्थान ट्रस्टने उल्हास शिक्षण संस्थेला बक्षीसपत्र म्हणून वीस गुंठे जागा दिली होती. तसेच शाळेच्या इमारतीसाठी शाळेच्या संस्थेला कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी खरेदीखत म्हणून दोन एकर जागा देखील देण्यात आली होती. काही काळानंतर ती दोन एकर जागा ट्रस्टने अनेकवेळा परत मागून देखील शिक्षण संस्थेचे विलास बांदल चालढकल करत असल्याचे आरोप करत ग्रामस्थांनी शाळा बंद केली आहे.

## ठाणे जिल्हा पुन्हा गारठला, जिल्ह्यातील तापमान सरासरी 12 अंश सेल्सिअस

**ठाणे, दि.१०: प्रतिनिधी**

फेंगल वादळामुळे गेल्या काही दिवस राज्यात तापमानात वाढ झाली होती. थंडीनंतर अचानक झालेल्या या तापमान वाढीमुळे अनेकांच्या आरोग्यविषयक तक्रारी वाढल्या होत्या. त्यानंतर रविवारपासून तापमानात पुन्हा घट होण्यास सुरुवात झाली. सोमवारी ठाणे जिल्ह्यातील सर्वात कमी तापमान नोंदवले गेले. बदलापुरात ११.३ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले आहे. तर जिल्ह्यातील सरासरी तापमान आहे १२ अंश सेल्सियस इतके आहे.

गेल्या काही दिवसांपासून देशावर फेंगल वादळाचे सावट होते. त्यामुळे राज्यातील काही भागात अवकाळी पावसाचा फटकाही बसला. तर मुंबईसह उपनगरात ढगाळ वातावरण होते. यामुळे तापमानात वाढ झाल्याचे पाहायला मिळत होते. त्यापूर्वी ठाण्यासह आसपासच्या भागात चांगली थंडी जाणवू लागली होती. मात्र ढगाळ वादळामुळे अचानक तापमान वाढल्याने अनेकांना त्याचा त्रास जाणवला. मात्र गेल्या दोन दिवसांपासून तापमानात बदल होत असल्याचे दिसत होते.

# बदलापूरच्या थकबाकीदार बालाजी हाईट्स सोसायटीचा कांगावा

## दोन लाख 46 हजार रुपयांची थकबाकी मार्चपासून भरणा नाही; महावितरणचे स्पष्टीकरण

**कल्याण, दि.१०: प्रतिनिधी**

बदलापूर पश्चिमेतील प्राईम बालाजी हाईट्स या सोसायटीकडे वीजबिलाची २ लाख ४६ हजार रुपयांहून अधिकची रक्कम थकीत आहे. रितसर नोटिस देऊन वीजपुरवठा खंडित केल्यानंतर सोसायटीकडून महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून दमदाटी झाल्याचा अपप्रचार झाला. यासंदर्भात पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्यानंतर सोसायटी पदाधिकाऱ्यानीच टप्प्याटप्प्याने थकबाकी भरण्याची ग्वाही देत दीड लाख रुपयांचा धनादेश दिला. त्यानंतरच सोसायटीचा वीजपुरवठा पुर्ववत करण्यात आला आहे.

बदलापूर गाव पश्चिम येथे न्यू डीपी रोड परिसरात प्राईम बालाजी हाइट्स या सोसायटीला सामान्य वापरासाठी (लिफ्ट, अंतर्गत पथदिवे आणि पाणीपंप) महावितरणने मे २०१८ मध्ये वीजपुरवठा दिला आहे. मार्च-२०२४ नंतर सोसायटीने या वीजजोडणीचे बिल भरलेले नाही. थकीत वीजबिलाचा भरणा करण्याबाबत सोसायटी पदाधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. अखेर थकबाकी न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याबाबत लेखी नोटीसही बजावण्यात आली. परंतू सोसायटीने थकबाकीचा भरणा केला नाही. त्यामुळे सोसायटीचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. यावेळी जमलेल्या सोसायटीधारकांनी वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करणाऱ्या शाखा अभियंत्यांच्या कामात अडथळा आणला. उलट महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अरेरावी केल्याचा कांगावा करत अपप्रचार केला.

शाखा अभियंत्यांनी यासंदर्भात बदलापूर पोलीस ठाण्यात तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता सोसायटी पदाधिकारी बाबु तांबे व इतरांनी संपर्क साधून थकबाकी भरण्याचे मान्य केले. प्रत्येकी ७५ हजार रुपयांचे दोन धनादेश तातडीने देत उर्वरित थकबाकी लवकर भरण्याची ग्वाही सोसायटी पदाधिकाऱ्यांनी पोलिसांसमक्ष दिली. त्यानंतर सोसायटीचा वीजपुरवठा पुर्ववत करण्यात आला.



# आनंदी जीवनासाठी शास्त्राची गती, दिशेची कास धरा:स्वामी ज्ञानानंदजी

## खंडेलवाल वैश्य सभेतर्फे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १० : धकाधकीच्या व त्रासदायक जीवनाच्या मुक्ततेसाठी शास्त्र संमत गती व दिशेची आवश्यकता आहे. शास्त्राने मानवी जीवनाच्या व्यथा व समस्यांचा सांगोपांग विचार केला आहे. अशा विचाराची कास धरून जीवन कृतार्थ व शाश्वत सुखाची अनुभूती प्रदान करणारे बनवण्याचे आवाहन दिल्लीतील अक्षरधाम मंदिराचे डॉ. स्वामी ज्ञानानंद यांनी केले. ते खंडेलवाल वैश्य सभेच्या वतीने आयोजित विशेष सत्संगात मार्गदर्शन करत होते.

जीवनाच्या सुखाचे फलित कशात दडलेले आहे यावर मार्गदर्शन करताना स्वामी म्हणाले की, विपरीत परिस्थितीत धैर्याची गरज असते. गेलेला शब्द हा पुन्हा परत येत नाही. या संदर्भात त्यांनी राजा परीक्षिताची सात दिवसात मृत्यू होत असणारी घटना विषद केली. राजा परीक्षेत यांनी केलेल्या चुकांमुळे त्यांना सर्पदंशाच्या सामना करावा लागला. नेमकी हीच परिस्थिती आज समाजात सर्वत्र चुकांच्या संदर्भात दिसत आहे. आजची जीवनाची प्राथमिकता काय आहे, तत्त्ववेत्त्यांनी या संदर्भात सांगोपांग विवेचन केले आहे. त्वरित व महत्वपूर्ण या दोन्ही बाबीची आवश्यकता असते. जीवनाची वास्तविक प्राथमिकता काय आहे, ही प्राथमिकता समजून घेणे शाश्वत जीवनाच्या सुखासाठी अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आपण कोणत्याही वादात दुसऱ्याचे दोष बघतो. या वादात आपली काय चूक आहे, हे आपण बघत नसून दुसऱ्यांवरच आरोपांचा दोष मांडतो. यामुळे ही दुःखाची निर्मिती होऊन जीवन अध:पतीत होते. ज्या दिवसापासून आपण आपल्या चुका शोधण्यास सुरुवात करू तेव्हापासून जीवनात व्यापक परिवर्तन होऊन जीवन सुखाच्या दिशेने वाटचाल करू शकेल, असा विश्वास स्वामींनी व्यक्त केला. साहा खंडेलवाल वैश्य सभेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल यांच्या अध्यक्षतेत आयोजित करण्यात आला. या विशेष सत्संग सोहळ्यात व्यासपीठावर स्वामी कौशल मूर्तीदास, खंडेलवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानप्रकाश खंडेलवाल, आ. वसंत खंडेलवाल, खंडाला धाम जनजागरण यात्रेचे संयोजक पुरुषोत्तम गुप्ता आदी उपस्थित होते. प्रास्ताविक मनोज खंडेलवाल यांनी केले. सूत्रसंचालन संजय खंडेलवाल यांनी केले.

भारतीय शास्त्रात याचा सांगोपांग उपाय सांगितला आहे. जीवनाची वेळ कमी आहे. त्या वेळेचा सदुपयोग या शास्त्र संमत ज्ञानाचा शोध घेऊन आपण आपले जीवन सुखी व आनंदी करू शकतो. ज्याप्रमाणे हंस पाण्यातून दूध वेगळे करतो, त्याचप्रमाणे शास्त्रातुन जीवनाच्या सुखी आनंदाचे गुण प्राप्त करून त्या दिशेने जर वाटचाल केली तर नक्कीच जीवनाची खरी यशस्वीता प्राप्त करून घेता येऊ शकते. आजचे जीवन पालकांनी कठीण करून टाकले आहे. आपली संस्काराची परिभाषा बदलली आहे. आपण मुलाबाळांना संस्कार न देता त्यांना सरळ मोबाइल देऊन जीवन अध:पतीत करून त्यांना महाजालाच्या दुष्टचक्रात अडकवत आहोत. म्हणून जीवनातील दिशा सरळ असली पाहिजे. जीवनातील दिशा जर सरळ रचली तर गती आपोआप प्राप्त होते. या दोन्ही चाकोरीतून मार्गक्रमण केले तर नक्कीच जीवनाच्या आनंदी जगण्याचे रहस्य आपण प्राप्त करू शकतो, असे स्वामी म्हणाले.

# राज्यात आलेले बहुमत हे ईव्हीएमचे: प्रकाश आंबेडकरांची टीका



**महाविकास आघाडी तसेच इतर पक्षांनी देखील ईव्हीएम घोटाळा झाला असल्याचा आरोप केला आहे.**

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १० : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले आणि सत्ता देखील स्थापन केली. यावरून महाविकास आघाडी तसेच इतर पक्षांनी देखील ईव्हीएम घोटाळा झाला असल्याचा आरोप केला आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी देखील ईव्हीएमवर शंका उपस्थित केली असून राज्यात आलेले बहुमत हे ईव्हीएमचे असल्याची टीका केली आहे.

### ग्रामस्थांना अडवल्याने संशय बळवतो

प्रकाश आंबेडकर म्हणाले, ईव्हीएमविरोधात आम्ही आंदोलन सुरू केलं आहे. निवडणूक आयोगाला पत्र लिहून मतदानाच्या दिवशी सायंकाळी ६ नंतर झालेल्या मतदानाचे डिटेल्स मागितले आहेत. आयोगाच्या उत्तराची वाट पाहात आहोत. मारकडवाडी सारखी परिस्थिती गावागावत आहे, गावागावत रोष आहे. मारकडवाडी येथील गावकऱ्यांचा बॅलेट पेपरवर मतदान घेण्याच्या निर्णयाला आडवीण्याचा सरकार किंवा पोलिसांना आधिकार नाही. सरकारने मारकडवाडी येथील ग्रामस्थांना अडवल्याने संशय बळवतो की यांनी गडबड केली आहे, अशी प्रतिक्रिया प्रकाश आंबेडकर यांनी दिली आहे.

### राज्यात आलेले बहुमत हे ईव्हीएमचे बहुमत

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, काळजीवाहू मुख्यमंत्र्यांनी मारकडवाडी या गावातील मतदान थांबाविण्याचा आदेश दिला होता का? याबाबत एकनाथ शिंदे यांनी खुलासा करावा. वेळ मिळाला तर मी मारकडवाडीला जाणार आहे. मी अनेकदा म्हटले की हे ईव्हीएम पूर्वी कॉंग्रेसकडून पाडण्यासाठी वापरले जात होते.

आता हे भाजपकडून निवडणुका जिंकण्यासाठी वापरले जात आहे. सर्वोच्च न्यायालायचे न्यायाधीश ईव्हीएमचा मुद्दा बघायला तयार नाहीत. राज्यात आलेले बहुमत हे ईव्हीएमचे बहुमत आहे.

### कॉंग्रेसवरही साधला निशाणा

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी कॉंग्रेस पक्षावर देखील टीका केली आहे. आंबेडकर म्हणाले, संविधान खतरे में नाही तर कॉंग्रेस पक्ष खतरे में है. कॉंग्रेसने आम्हला बाहेर का ठेवले? याचा पहिल्यांदा खुलासा करावा.

आम्ही भाजप सोबत कधीही समजोता करणार नाही, हे आम्ही ठरवले असल्याचे देखील यावेळी आंबेडकर यांनी स्पष्ट केले आहे.

# मतदारसंघातील अवैध धंदे बंद करा:शपथविधी उरकताच आमदार तोडसाम यांनी उचलले पाऊल



■ महासागर प्रतिनिधी,
पांढरकवडा,दि. १० : आर्णी-केळापूर मतदार संघातील भाजपचे आमदार राजू तोडसाम यांनी रविवारी दि. ७ डिसेंबरला विधिमंडळ अधिवेशनात आमदारकीची शपथ घेतल्यानंतर प्रथम मतदार संघातील ठाणेदारांना परिसरातील अवैध धंदे तातडीने बंद करण्याचे आदेश दिले.

विशेष करून पांढरकवडा शहरांमध्ये गांजाची मोठ्या प्रमाणात विक्री केल्या जाते. यासंदर्भात सामाजिक संघटनांनी पोलिस प्रशासनाला विविध निवेदने देऊन गांजा विक्री बंद करण्याची मागणी केली होती. मात्र, यावर पायबंध घालण्यात पोलिस प्रशासनाला अपयश आले. अवैध व्यवसाय फोफावत गेला. गांजामुळे व्यसनाधीन युवकांची पिढी बरबाद होत गेली. केळापूर मतदारसंघात घाटंजी, पांढरकवडा व अन्य ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध धंदे बोकाळले आहे. दारू, गांजा तस्करी व विक्री, वरली मटका अन्य जुगार मोठ्या प्रमाणात खेळला जातो. यामध्ये कोट्यवधींची उलाढाल होते. यामुळे विद्यार्थीदशेतील युवक हा व्यसनाच्या आहारी गेला. ही बाब आमदार राजू तोडसाम यांच्या निदर्शनात आली.

# नाल्यामध्ये बस अडकून २५ प्रवासी गंभीर जखमी



■ महासागर प्रतिनिधी,
मलकापूर पांग्रा ,दि. १० : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची चिखली आगाराची बस चिखली येथून मलकापूर पांग्रा कडे जात असताना वाघाळा येथून मलकापूर पांग्रा कडे येत असताना नाल्यात उलटून अडकली. या अपघातात २५ प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर मलकापूर पांग्रा येथील प्राथमिक उपचार केंद्रात उपचार सुरु आहे. ही घटना आज ४ डिसेंबर रोजी सायंकाळी घडली. स्टिअरींग फ्री झाल्याने ही दुर्घटना घडली असली तरी नाल्यामुळेच मोठी अप्रिय घटना टळली. एम एच ४० एन ४५८४ या क्रमांकाची चिखली आगाराची बस चिखली मार्गे वाघाळा किनगाव जट्टू ही वाघाळ्यावरून मलकापूर पांग्राकडे जात होती. दरम्यान चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस कैलास सोनवणे यांच्या शेताजवळ रस्त्याच्या बाजूला मोठ्या नालीत बस पलटली. त्यामध्ये ४४ प्रवाशी होते. यापैकी जखमी प्रवाशांच्या पायांना, तोंडाला व डोक्याला मार लागला.

# शेळगाव आटोळ रस्त्याचे काम निकृष्ट

## आंदोलनाचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी,
देऊळगाव , दि. १० : शेळगाव आटोळ - देऊळगाव घुबे रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सूचनेनंतरही निकृष्ट होत आहे. या कामात सुधारणा न झाल्यास परिसरातील सरपंचांसोबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा सरचिटणीस डॉ. विकास मिसाळ यांनी दिला आहे. बांधकाम विभागाच्या माध्यमातून शेळगाव आटोळ -देऊळगाव घुबे रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. हे काम निकृष्ट होत असल्याचे डॉ. विकास मिसाळ यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना कळवले होते. त्यानंतर अधिकाऱ्यांकडून रस्त्याच्या कामाची पाहणी करण्यात आली.

त्यावेळी रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक प्रमाणात खोदकाम करण्यात आले नाही, तसेच खोदकामाच्या ठिकाणी कडक मुरूम न टाकता अपूर्ण खोदकाम करून कमी जाडीचा गिट्टीचा थर टाकून दबाई करण्यात आली, अशा बाबी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्या.

त्यामुळे त्यांनी संबंधित कंत्राटदाराला अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याच्या सूचना दिल्या. परंतु, त्यानंतरही कंत्राटदाराने अधिकाऱ्यांच्या सूचनेला न जुमानता निकृष्ट काम सुरूच ठेवले आहे. रस्त्याचे काम अशाच प्रकारे सुरू राहिल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात परिसरातील सरपंचांना सोबत घेऊन ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा डॉ. विकास मिसाळ यांनी या विभागाला दिला आहे.

# भटकी कुत्रे पकडण्यासाठी तारीख पे तारीख

## मनपाचे दुर्लक्ष



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १० : अकोला शहरात कुत्र्यांचा उपद्रव सुरुच असून, गल्लोगल्ली रस्त्यांवर कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी दिसत आहेत. या भटक्या कुत्र्यांना पकडून निर्बिजीकरणासाठी मनपाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या मोहिमेसाठी नियुक्त बीडच्या कंत्राटदाराची मनपाला तारीख पे तारीख मिळत आहे. ४ डिसेंबरपासून ही मोहीम राबवली जाणार असल्याचे सांगण्यात आलं होते.

मात्र, संबंधित कंत्राटदाराची कुत्रे पकडण्यासाठीची वाहने अद्याप आली नसल्याने अजून ही मोहीम सुरु करण्यासाठी मनपाला मुहूर्त सापडलेला नाही. शहरात भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संचालित सर्वोपचार रुग्णालयातील नोंदीनुसार, शहरात दररोज किमान चार ते पाच जणांना श्वानदंश होत आहे.

रात्री उशिरा कामावरून घराकडे परतणाऱ्या दुचाकीस्वारांच्या अंगावर धावून जाणाऱ्या कुत्र्यांमुळे अपघात घडल्याच्या घटना आहेत.

रस्त्याने एकट्या जाणाऱ्या लहान शाळकरी मुलांनाही कुत्र्यांचा त्रासाला सामोरे जावे लागत आहे. एवढ्या प्रमाणात शहरात भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला असला तरी मनपाकडून कुत्रे पकडून त्यांची निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करण्यात दिरंगाई होत असल्याने नागरिकांत मनपाच्या वेळकाढू कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. याबाबत मनपाच्या कोंडवाडा विभागाचे प्रमुख अनिल बिडवे यांच्याशी संपर्क साधला असता, येत्या दोन-तीन दिवसांत कंत्राटदारीची वाहने आली की ही कुत्रे पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया केली जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# डाबकी रोडच्या रुंदीकरणाला विरोध



## महापालिका अतिक्रमण हटवण्यावर ठाम

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १० : जुने शहरातील वर्दळीच्या प्रमुख मार्ग असलेल्या डाबकी रोडचे मनपाच्या (डीपी प्लॅन) विकास आराखड्यानुसार रुंदीकरणासाठी रस्त्याच्या आड येणारे रस्त्याच्या दुतर्फा बांधकामावर मनपाच्या अतिक्रमण विभागाने हातोडा उगारला आहे. याला काही मालमत्ताधारकांनी विरोध दर्शवला असून, या रस्त्याची भूमिअभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन द्यावी, त्याशिवाय रस्ता रुंदीकरणाच्या आड येणाऱ्या एकाही घर किंवा दुकानाला हात लावू देणार नाही, अशी भूमिका या भागातील काही मालमत्ताधारकांनी घेतली आहे. दुसरीकडे मनपा प्रशासन मात्र, येत्या एक-दोन दिवसात अतिक्रमण विभाग डाबकी रोडच्या रुंदीकरणाच्या आड येणारे पक्के बांधकामाचा सफाया करण्याच्या भूमिकेवर ठाम आहे. डाबकी रोडच्या रुंदीकरणाच्या कामासाठी रस्त्यालगतच्या दुतर्फा असलेल्या मालमत्तांवर मार्किंग करुन या कामाच्या आड येणारी घरे, दुकाने तोडण्याचे काम गेल्या काही दिवसांपूर्वी केले होते.

मात्र, त्यास काही मालमत्ताधारकांनी विरोध केल्याने मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी संबंधित मालमत्ताधारकांना अतिक्रमित बांधकाम हटवण्यासाठी डिसेंबरपर्यंत मुदत उर्वरित पान ४

मनपाच्या शहर विकास आराखड्याप्रमाणे डाबकी रोडचा रस्ता ६० फुट रुंद करायचा आहे. या रस्ता रुंदीकरणात आड येणारे बांधकाम तोडल्यामुळे ज्या लोकांच्या मालमत्तांचे नुकसान होणार आहे.

त्यांना मोबदला म्हणून टीडीआर देण्यात येणार आहे.

नागरिकांनी येत्या एक-दोन दिवसांत स्वत:हून आपले रस्त्यालगतचे अतिक्रमित बांधकाम पाडून मनपाला सहकार्य करावे व कटू कारवाई टाळावी.

**-डॉ. सुनील लहाने, मनपा आयुक्त तथा प्रशासक.**

# जिल्हा विधी सेवातर्फे मध्यस्थी जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि.१०: जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने येथील सभागृहात मध्यस्थी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एन. व्ही. न्हावकर होते. या कार्यक्रमाला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव के. ए. नहार तर प्रमुख वक्ते म्हणून आर. आय. सोनवने तसेच वकील मंडळी, विधी महाविद्यालयातील विद्यार्थी, पीएलव्ही व बँक कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रशिक्षित मध्यस्थ न्यायाधीश आर. आय. सोनवने यांनी मध्यस्थी काळाची गरज तसेच त्याचे सर्वतोपरी फायदे यावर मार्गदर्शन केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष एन. व्ही. न्हावकर यांनी मध्यस्थी प्रक्रियेबाबत उदाहरण देताना सांगितले की, वाद मिटवण्यासाठी मध्यस्थी प्रक्रिया खुप महत्वाची आहे. दोन्ही पक्षकारांमध्ये तडजोड करण्यासाठी प्रशिक्षित मध्यस्थ असणे आवश्यक आहे. मध्यस्थीमुळे दोन्ही पक्षकारामध्ये वाद हा सहजासहजी मिटू शकते. तसेच वकिलांनी पक्षकारांना मध्यस्थी मध्ये सामावून घ्यायला पाहिजे. मध्यस्थी प्रक्रियेमध्ये




वकीलांची भुमिका खुप महत्वाची असते. तडजोडीकरीता वकिलांनी जास्तीत जास्त सहभाग घेऊन मध्यस्थी प्रक्रियेमध्ये काम करावे व दोन्ही पक्षकारामध्ये तडजोड कशाप्रकारे होऊ शकते हे पाहावे. त्यामुळे मध्यस्थी प्रक्रिया प्रभावीपणे काम करु शकते, असे यावेळी त्यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये सांगितले. या कार्यक्रमाचे आभार सचिव के.ए. नहार यांनी मानले. संचलन ४ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर श्रीमती आर. एस. मोरे यांनी केले.

# औद्योगिक विकास महामंडळाचे फलक उरले केवळ नावापुरतेच

■ महासागर प्रतिनिधी,
मारेगाव , दि.१०: शहरात मागील चार दशकांपूर्वी महराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने लघु उद्योग सुरु करण्यासाठी शेकडो हेक्टर भूमी अधिग्रहण करण्यात आली. परंतु, आजपर्यंत या जागेवर एकही उद्योग सुरु झाला नाही. परिसरात झाडे-झुडपे वाढले असून आता फलकालाही जंग चढला आहे. या जागेवर असलेला महामंडळाचा फलक बेरोजगारांना आता वाकोल्या दाखवत आहे.



महाराष्ट्र शासन औद्योगिक विकास महामंडळाने काही वर्षांपूर्वी प्रत्येक तालुक्यात लघु उद्योग सुरु करण्यासाठी भूमी अधीग्रहण केली. त्यातील अनेक तालुक्यतील या जागेवर छोटे-छोटे उद्योगही सुरु झाले. मात्र, मारेगाव या उद्योगाच्या स्पर्धेत मागे राहिला आहे. इतर तालुक्याप्रमाणे मारेगावात शहरापासून दोन किमी अंतरावर असलेल्या घोन्सा मार्गांवर भूमी अधिग्रहण केल्या गेली. त्यावेळेस रस्ते, पाणी, विजेची समस्या समोर करून इच्छुक उद्योजकांना तिकडे येऊच दिले नाही. त्यामुळे जागा अधिग्रहण एवढेच कार्य झाले.

आता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जागा अधिग्रहण केलेल्या परिसरात पाणी, रस्ते, वीजेचा प्रश्न सुटला आहे. त्यामुळे येथे उद्योजकांनी छोटे-छोटेउद्योग उभारायला हरकत नाही. तशा प्रकारचे उद्योग करण्यास महामंडळाकडून प्रोस्ताहन, मार्गदर्शन दिल्यास तालुक्यात भरभराट होईल. त्यासाठी इच्छुक उद्योजकांना तिथे जागा देऊन सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच एकाच उद्योजकाला अधिक जागा देऊ नये असे नागरिकाचे मत आहे.

*तालुक्यात ५० टक्के लोकांचा व्यवसाय हा शेतीच आहे. शेतकऱ्यांची असंख्य मुले विद्यावीभूषीत आहे.*

तर असंख्य तरुणांच्या हाताला असते काम मारेगाव तालुका आदिवासी बहुल तालुका म्हणून विदर्भात परिचित आहे. तालुक्यात ५० टक्के लोकांचा व्यवसाय हा शेतीच आहे. शेतकऱ्यांची असंख्य मुले विद्यावीभूषीत आहे. आता तालुक्यात एखादा मोठा उद्योग उभा राहिल्यास असंख्य तरुणांना रोजगार मिळू शकतो. तालुक्यात रोजगाराचे साधन उपलब्ध झाल्यास तालुक्यात वाढत असलेल्या आत्महत्या कमी होऊ शकतात असे सुज्ञ नागरिकांचे मत आहे.


## Change Of Name

I, **MALKITSINGH SADHUSINGH MUTAR,** MY SON OLD NAME WAS **PARAMVEER SINGH.** NOW MY SON NEW NAME IS **PARAMVEERSINGH MALKITSINGH MUTAR. ADD :** WARD NO.1 SAURABARDI TAKIYA POST. DAWLAMETI NAGPUR 440023

MY OLD NAME WAS **JASVENDAR KAUR.** NOW MY NEW NAME IS **JASVINDER KAUR MALKITSINGH MUTAR. ADD :** WARD NO.1 SAURABARDI TAKIYA POST. DAWLAMETI NAGPUR 440023

MY OLD NAME WAS **MALKIT SINGH.** NOW MY NEW NAME IS **MALKITSINGH SADHUSINGH MUTAR. ADD :** WARD NO.1 SAURABARDI TAKIYA POST. DAWLAMETI NAGPUR 440023

MY OLD NAME WAS **MALKEET SINGH.** NOW MY NEW NAME IS **MALKITSINGH SADHUSINGH MUTAR. ADD :** WARD NO.1 SAURABARDI TAKIYA POST. DAWLAMETI NAGPUR 440023

MY OLD NAME WAS **JASVINDER KAUR.** NOW MY NEW NAME IS **JASVINDER KAUR MUTAR. ADD :** WARD NO.1 SAURABARDI TAKIYA POST. DAWLAMETI NAGPUR 440023

MY OLD NAME WAS **MEENA KUMARI MESHRAM.** NOW MY NEW NAME IS **MEENA MESHRAM. ADD :** DH-8D, MAHINDRA BLOOM-DALE, NEAR DY PATIL INTERNATIONAL SCHOOL, KHAPRI MIHAN, NAGPUR 441108

MY OLD NAME WAS **SABIHA KHATOON.** NOW MY NEW NAME IS **SABIHA NAZ. ADD :** KALAMNA ROAD, SAYEED NAGAR, RANALA, KAMPTEE 441002.

MY OLD NAME WAS **QAMARUNNISA NISAR AHMED / QAMAR NISAR.** NOW MY NEW NAME IS **QAMAR NISAR AHMED. ADD :** OPP. SUNIL HARDWARE, SADAR, NAGPUR 440001.

MY OLD NAME WAS **SHAHZAD AHMED.** NOW MY NEW NAME IS **SHAHZAD AHMED NISAR AHMED. ADD :** OPP. SUNIL HARDWARE, SADAR, NAGPUR 440001.

MY OLD NAME WAS **LUBNA SHEIKH AHMED/ LUBNA SHAIKH AHMED.** NOW MY NEW NAME IS **LUBNA SHEIKH** AND **SURNAME** IS **AHMED. ADD :** OPP. SUNIL HARDWARE, SADAR, NAGPUR 440001.

MY OLD NAME WAS **LIS MARY.** NOW MY NEW NAME IS **LIS MARY LIJO. ADD :** PALAKEY BUILDING,CHHINDWARA ROAD, KORADI, NAGPUR 441111.

MY OLD NAME WAS **LIJO JOSE,** MY NEW NAME IS **LIJO** AND MY **SURNAME** IS **JOSE. ADD :** PALAKEY BUILDING,CHHINDWARA ROAD, KORADI, NAGPUR 441111.

MY OLD NAME WAS **MOHMMAD RIZWAN DHORAJIWALA.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD RIZWAN NUR MOHAMMAD DHO-RAJIWALA. ADD :** FLAT NO 202, KASHYAP COLONY, HUSAINI MENSION, SHANTI NAGAR, NAGPUR, 440002.

MY OLD NAME WAS **ASHOKKUMAR KRIPLANI.** NOW MY NEW NAME IS **ASHOK KRIPLANI. ADD :** BLOCK NO 11 NEAR MAHATMA GANDHI SCHOOL ROAD JARIPATKA NAGPUR 440014.

MY OLD NAME WAS **KAMALKUMAR BHIMSEN BHAGTANI.** NOW MY NEW NAME IS **KAMAL BHIMSEN BHAGTANI. ADD :** GANESH NAGAR,NEAR ASHOKA HALL, ASHOK COLONY GONDIA 441601.

MY OLD NAME WAS **SHAHID AKHTAR.** NOW MY NEW NAME IS **SHAHID** AND **SURNAME** IS **AKHTAR. ADD :** ANSAR NAGAR ROAD DOBINAGAR SAIFI NAHAR ROAD MOMINPURA NAGPUR-440018.

MY OLD NAME WAS **PAWAN CHAWLA.** NOW MY NEW NAME IS **PAWAN KUMAR CHAWLA. ADD :** JARIPATKA NAGPUR 440014

MY OLD NAME WAS **SUNILKUMAR LAXMANDAS CHAWLA.** NOW MY NEW NAME IS **SUNIL LAXMANDAS CHAWLA. ADD :** PLOT NO.37, FIRST FLOOR,OPP.LATA MANGESHKAR GARDEN,SURYA NAGAR, NAGPUR 440035 MS

# निवडणुका संपल्या पुरे आता हिंदू-मुस्लिम विवाद!



**एरव्ही पाच वर्षे धार्मिक मुद्दा कधीही चर्चेत येत नसताना निवडणुकीच्या काळातच 'धर्म' हा विषय चर्चेत का येतो? हे आता हळूहळू जनतेलाही समजू लागले आहे. पण धर्माची चिकीत्सा करायच्या कुणीही भानगडीत पडत नाही. रस्त्यावर दिसणार स्वरूप म्हणजे धर्म आहे का ? धर्म रस्त्यावर नाही. रस्त्यावर आहे ते फक्त धर्माचे दुकान, निव्वळ पाखंड. मग धर्म कुठ असतो? धर्म सामान्य सश्रद्ध माणसांच्या मनात. कुठलीही कृती करताना, कुठलेही शब्द उच्चारत असताना लोकांच्या मनात जी सजगता असते ती धर्म. आपण चुकीच बोललो, चुकीचं वागलो तर आपल्याला शिक्षा होईल अस वाटत. मग धर्म भीती आहे का? लोक देवाला घाबरतात का? ज्यांना धर्माची भीती वाटते, ज्यांना देवाची भीती वाटते ते मुळात धार्मिक नसतातच. त्यांना चुकीच वागायचं असत, काहीतरी चुकीच करायचं असत, पण त्याचे परिणाम नको असतात, म्हणून त्यांना देवाला पापात भागीदार करायचं असत. देवाला पापात भागीदार करायला लोक देवाला लाच देऊ पाहतात, देवाशी व्यापार करतात. तू मला अमुक दे, मी तुला सव्वा किलो पेढे वाहीन, तुला अकरा नारळाच तोरण बांधील. हा व्यापार किंवा दुकानदारी नाही तर दुसर काय आहे? ज्यांना देव आपल्याला कुठलीही शिक्षा देणार नाही हे पक्क ठाऊक असतं, अशी लोक देवाची आणि धर्माची दुकानदारी आर्थिक किंवा राजकीय लाभासाठी दणकून चालवतात.**

-----------------

देवाच्या नावाने लोकांना लुबाडणे, भीती घालणे, दंगली करणे, माणसांचे जीव घेणे हे सगळं धर्माच्या देवाच्या नावाने करणारी लोक प्रत्यक्षात देवाला आणि धमार्ला अजिबात न भिणारी असतात, त्यांना धर्माचं, देवाच काहीही पडलेलं नसत, त्यांना फक्त आर्थिक राजकीय लाभ महत्वाचा असतो. मग रस्त्यावर धर्माची दुकानदारी वाढते.

लोक धर्माचा, देवाचा धंदा करतात. मग नेमक कोण धार्मिक आहे? धर्म नेमका काय आणि कुठ आहे ? आंब्याची कोय मातीत पुरली तर आंब्याच झाड उगवत, बाभळ पेरली तर बाभळ हे आपल्याला निसर्ग शिकवतो. ही निसर्गाचे भाषा, जाण आणि निसर्गाचा धर्म ज्याला समजला त्याला आपल्याला काही चांगल मिळावं, लोकांनी चांगल वागावं, लोकांनी आपल्यासाठी चांगल चिंतावं असं वाटत असेल, तर आधी आपण केल पाहिजे हे कळत आणि हे कळल्यावर त्या पद्धतीने माणूस जे वागतो तो धर्म.

अश्या माणसाला कर्मकांड, पोथ्या, परंपरा यापेक्षा जित्या माणसांचा आनंद महत्वाचा वाटतो. मेल्यावर मोक्ष मिळेल का? स्वर्गात जागा मिळेल का? अमृत प्यायला मिळेल का? याची चिंता करण्यापेक्षा आजच आपल्या आणि भवताली असणा?या माणसांच जगण सुकर आणि सुखकर करण्यासाठी सजगतेने जगतो तो धार्मिक माणूस. धर्म माणसांसाठी आहे, माणसं धमार्साठी नाहीत हे समजल की सगळ समजतं. धर्म भीती नाही, देव भीती तर नाहीच नाही. ज्या माणसाचा अंतरात्मा जागा आहे, ज्या माणसाची सदसद्विवेक बुद्धी शाबूत आहे, अश्या माणसाच्या मनात असलेली ही भावना म्हणजेच धर्म आणि देव. त्याला वेगळा जप, रस्त्यावर जाऊन ढोल बडवणे, मंदिरात जाऊन जागरण करून टाळ कुटणे हे काहीही कराव लागत नाही.

नित्यकर्म करत असताना ज्याची बुद्धी जागी असते आणि म्हणून त्याच्या मनात ओठात नाम असत त्याला वेगळ काहीच करावं लागत नाही. खरतर ही सजगता माणसात आली आणि ती सहजभाव झाली की धमार्ची गरजच उरत नाही. जिथं सत्य आहे तिथ धमार्ची गरजच नाही. धर्म आणि देव इतके साधेसोपे असताना जे जे म्हणून त्याला अवघड करतात, त्याचा बागुलबुवा दाखवतात, त्याचा धंदा करतात, त्याला ओंगळवाणे हिडीस रूप देतात, देवाची भीती घालून लोकांच्या गचांड्या पकडून मंदिरातल्या मूर्तीच्या पायावर डोकी आपटून माणसाना लुटतात, धर्माच्या नावाने माणसांचे जीव घेतात अशी लोक धार्मिक असूच शकत नाहीत. असलीच ती फक्त वेगवेगळ्या पद्धतीने धर्माची दुकान चालवणारी धंदेवाईक दुकानदारी आहे. त्यामुळेच आता निवडणुका संपल्या असून हिंदू मुस्लिम विवाह कायमचा बंद झाला पाहिजे.

निवडणुकीच्या काळात हा विषय नाही म्हटले तर उफाळून वर येतच असतो. स्वतंत्र भारतात हिंदू बहुसंख्य आहेत, मात्र त्यांना मुसलमानांची भीती वाटते. मुसलमानांकडे देशाची आर्थिक सत्ता नाही, त्यांच्यामध्ये अदानी-अंबानी-बिर्ला यांच्यासारखे उद्योगपती नाहीत. मुसलमानांनी सरकारी, निमसरकारी नोकऱ्यांमध्ये मुसंडी मारलेली नाही.

मुसलमानांनी खाजगी क्षेत्रातही नोकऱ्या बळकावलेल्या नाहीत. मुसलमान सावकारीच्या धंद्यात नाहीत. त्यामुळे त्यांनी हिंदूंच्या जमिनी, मालमत्ता बळकावलेल्या नाहीत. राजकीय वा सांस्कृतिक सत्ताही मुसलमानांच्या हाती नाही. स्वतंत्र भारतातील दहशतवादी गटांमध्ये बिगर मुसलमान दहशतवाद्यांची संख्या, राजकीय लागेबांधे म्हणजे ताकद मोठी आहे.

मुसलमानांचं लांगूलचालन केलं जातं असं म्हणतात. म्हणजे काय तर शाहाबानो प्रकरणात केंद्र सरकारने कायदा बदलला, समान नागरी कायदा आणला जात नाही. वादासाठी हा मुद्दा मान्य केला तरीही त्यामुळे हिंदू समाजाचं कोणतंही नुकसान झालेलं नाही. जे काही नुकसान झालं ते मुस्लिम समाजातील महिलांचं. म्हणजे निम्म्या मुसलमानांचं.

कोणत्याही दंगलीत मुसलमानांची लांडगेतोड केली जाते. बहुतांश दंगलींमध्ये पोलीसांची सहानुभूती हिंदूंना असते. अनेक सत्यशोधन समित्यांचे अहवाल, चौकशी आयोगांचे अहवाल यातून हे स्पष्ट झालं आहे. मुसलमानांना गाईला कापण्यात काहीही रस नसतो. गाईचं मांस खाल्लं पाहिजे असं त्यांच्या



थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

धर्मात लिहीलेलं नाही. एका गरीब, सत्ताहीन, मागास समाजावर अरेरावी करण्यात हिंदूंना कोणतं सुख मिळतं?

पूर्वी शिवसैनिक गरीब दक्षिण भारतीयांना चोप देत असत, त्यानंतर मनसेने गरीब हिंदी व्यावसायिकांबाबत हाच कित्ता गिरवला. यातून ठाकरे घराण्याला कोणता आनंद मिळाला वा कोणती सत्ता मिळाली? पण राजकीय लाभ झाला. नेमका हाच राजकीय फायदा मुसलमानांचा द्वेष केल्याने भाजप, संघ परिवाराला होतो. नेहरू, पटेल इत्यादींनी सरकारी गुंतवणूक केली, मूलभूत उद्योगांमध्ये. देशाची आर्थिक चौकट भक्कम करण्याचा प्रयत्न केला. धरण बांधली, शास्त्री, इंदिरा गांधींनी हरित क्रांती केली. आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करायला हवी अशी त्यांची दिशा होती.

बाबरने केलेल्या आक्रमणाचा बदला घेणं, औरंगजेबाने केलेल्या अपमानाचा बदला घेणं हे प्रश्न न सुटणारे आहेत. कारण काळामध्ये मागे वा पुढे जाता येत नाही. अशा न सुटणाऱ्या प्रश्नांभोवती हिंदूंना खेळवत ठेवणं हे भाजप-संघ परिवाराचं राजकारण आहे. या मूर्ख राजकारणाला हिंदू फसतात. कारण बहुतांश हिंदूंमध्ये कमालीचा न्यूनगंड आहे. स्वातंत्र्यलढ्यात सर्व जातींनी न्यूनगंडाचा त्याग केला होता.

म. फुले ते बाबासाहेब आंबेडकर अशी सलग परंपरा न्यूनगंड नसलेल्यांची आहे. याउलट स्वतंत्र भारतात गोळवलकर गुरुजी, बाळासाहेब ठाकरे, ब. मो. पुरंदरे यांच्यापासून ते भागवत-शहा-मोदी ही परंपरा न्यूनगंडाचं राजकारण करणारी आहे. त्यांना साथ आहे रामदास आठवलेंसह इतर अनेक आंबेडकरवाद्यांची.

नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांचा वारसा सांगणारे अजित पवार, छगन भुजबळ इत्यादींनीही मोदी-शहांना साथ दिली. त्याशिवाय लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके वरिष्ठ नागरिक यांनीही. यामध्येही हिंदूंची संख्या मोठी आहे. ओबीसी तर हिंदू राष्ट्रवादी बनले आहेत.

तसं पाहीलं तर सारचं कसं चित्रविचित्र आहे. हा देशच अद्भुत आहे, असं वाटू लागलयं. राजकारणात आपण बोलतो काय अन् आपली कृती काय, याची सुसंगतता कधीच जुळत नसते. कारण इथली अविवाहित असलेली आणि प्रापंचिक नसलेली लोक जनतेने किती लेकर जन्माला घालावीत त्याचे सल्ले देतात.

लोक राजकारणात इतके मश्गूल असतात की, सल्ला देणाऱ्यांची पार्श्वभूमी तपासायच्या ते भानगडीत पडत नाही. इथला उद्योगपतीही लोकांना सत्तर तास कामाचे सल्ले देतो आणि याच कामगारांची पिळवणूक करायला कागदपत्रात हेराफेरी केली म्हणून अमेरिकेत गुन्हेगार ठरतो आणि त्याला दंड ठोठावला जातो. पण त्यांना विचारणार कोण?

कारण विचारणा करणाऱ्यांची भलतीच कुंडली तयारच असते. न्यायदेवता यापूर्वी कधीही चर्चेत नव्हती. पण आता न्यायदेवतेला लोकांच्या चर्चेत रहायला आवडते. इथले 'न्यायाधीश' दृष्टांत झाला म्हणून निर्णय दिला असे बिनदिक्कतपणे सांगतात आणि दुसऱ्या मिनिटाला लोकांना घटनात्मक जबाबदा?या पार पाडायला सांगतात. त्यावर मग वादळ उठल्यावर इथलं कोर्ट 'आम्ही काय विरोधी पक्षांची भूमिका बजवायची का?' असं विचारत आणि विरोधकांनी उपस्थित केलेले प्रश्न, याचिका दाबून ठेवून निकाल न देता बसून राहते. मग न्यायाची अपेक्षा करायची तरी कोणाकडून?

इथला टीव्ही वाहिनीचा कर्मचारी जो सरकारची 'पीआर एजन्सी' म्हणून काम करतो, तो अमेरिकन माध्यमांनी पक्षपाती होऊ नये असले सल्ले देतो. इथला राष्ट्रप्रमुख देशातल्या अल्पसंख्याक समुदायावर विनोद करतो, खिल्ली उडवतो, त्यांची भीती घालतो, त्यांच्यावर हल्ले करणारांना अभय देतो आणि परदेशातील अल्पसंख्यांचे रक्षण करा म्हणून दुसऱ्या देशाच्या सरकारला उपदेश करतो.

इथला खासदार स्वतः चार मुलांचा बाप होतो आणि नंतर संसदेत लोकसंख्या नियंत्रण कायदा आणायची मागणी करतो. इथला निवडणूक आयोग आम्ही सांगतो तेच सत्य मानून चला अन्यथा तुमच्यावर खटले टाकण्याची भीती घालतो आणि लोकशाही टिकवायला निवडणुका घेतल्याची ग्वाही देतो. इथली जनताही एकविसाव्या शतकातले स्मार्टफोन तंत्रज्ञान वापरून मध्ययुगीन काळातल्या गोष्टी पसरवण्यात धन्यता मानते.

इथला तरुणवर्ग शिक्षण-रोजगार की धर्म यामध्ये धर्माची निवड करतो आणि नंतर बेरोजगारी साठी अरण्यरुदन करतो. इथले पुरुष देवीची भक्ती करतात, आईला देवी समजतात आणि स्त्रियांवर अत्याचार करण्यातही सहभागी होतात. इथल्या स्त्रिया आपल्याच पायातल्या असमानता आणि कर्मकांड यांच्या बेड्या मजबूत करायला हातभार लावतात आणि स्त्रिया असुरक्षित, अशिक्षित, परावलंबी आहेत म्हणून गळे काढतात.

लोकशाही पद्धतीने आंदोलन करायलाही आता भीती वाटते. कारण कधी कारवाईचा बडगा उभारला जाईल सांगता येणार नाही.

काँग्रेसच्या राज्यात आंदोलनांना देशद्रोही ठरवण्याची पद्धत नव्हती. उलट आंदोलनकर्त्यांची काळजी घेण्याची पद्धत होती. लोकपाल आंदोलनात अण्णांसह उपोषणकर्त्यांच्या दैनंदिन प्रकृती तपासणीसाठी दिल्लीचे डॉक्टर तर होतेच, पण तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मुंबईतून राज्य शासनाचं एक अख्खं वैद्यकीय पथक पाठवलं होतं.

रामलीला मैदानावर पाणी पुरवठा आणि वीज खंडीत होऊ नये यासाठी केंद्र सरकारनं विशेष सूचना दिल्या होत्या. भरपूर सुरक्षा व्यवस्था पुरवली होती. आज दिल्लीत शेतकरी आंदोलनकर्त्यांच्या मार्गात खिळे आणि सिमेंट टाकून मार्ग अडवला जातो आहे. आंदोलन चिरडून टाकण्यासाठी फौजफाटा ठेवला आहे.

शेतकरी ज्यावेळी आंदोलन करतात त्यावेळी धर्म हा विषय त्यांच्यासोबत येतच नाही. धर्माच्या श्रृंखला केव्हाच गळून पडतात. पण इकडे देश पातळीवर मात्र धर्म घराघरात पुसायला पाहतोय. राजकारणात तर तो घुसलाच आहे. उच्च पातळीवर तर तो सर्वत्र दिसू लागला आहे. देश पातळीवरील काही घटना तर आता चर्चेत आल्या आहेत. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शेखर यादव चक्क विश्व हिंदू परिषदेच्या कार्यक्रमात बिनदिक्कत जात आहेत. अर्थात याची मजबूत पायाभरणी धनंजय चंद्रचूड यांनी मोदींना आरतीला निमंत्रित करून केली आहे. न्यायव्यवस्थेला थेट धर्माच्या दारात बांधण्याचा आचरटपणा काँग्रेसच्या काळात कधीही झाला नाही. निवडणुका या येत जात राहतील, त्यात इतकेही गुरफटून जायला नको आहे. देश आज काय प्रगती करतोय त्या बातम्यांना राष्ट्रीय न्यूज चॅनल वर कव्हरेजही मिळू नये? त्याऐवजी धर्माच्या संघर्षाच्या बातम्या प्रसार माध्यमांनी द्यायला नको आहे.

एक गोष्ट लक्षात ठेवली पाहीजे की, अखंड भारत हवा असेल तर खरी लढाई ही नेमकी कुणाशी आहे, हे ओळखायला शिकले पाहीजे. अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश आणि ब्रह्मदेश स्वतः भुकेने आणि तहानेने मरतील. पण आपली खरी लढाई म्हणा किंवा युद्ध हे चीनशीच लढावे लागेल. त्यामुळे मूळ मुद्दा ओळखून सर्वांना एकत्र येण्याची गरज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एक हाती नेतृत्वात देश सुरक्षित आहे. मग त्यांच्याच नेतृत्वाखाली सर्वांनी एकत्र येऊन देश विकासाच्या दिशेने न्यायला हवा. त्यामुळेच निवडणुका संपल्या आता धर्माचे राजकारण पुरे असेच म्हणावे लागेल!

●●●●●●●●●

# केंद्रात नरेंद्र..राज्यात देवेंद्र..!!

पूर्वार्ध

शिवाजी विठ्ठल चौगुले
बेलेवाडी (मासा)
कोल्हापूर.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर ११ दिवसांनी भाजपचे नेते ५४ वर्षीय देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार यावर शिक्कामोर्तब झाले. अर्थात विधानसभेच्या निकालाचा कल पाहता फडणवीस हेच मुख्यमंत्री होणे अपेक्षित होते. त्यासाठी इतके दिवस काथ्याकुट करण्याची गरज नव्हती.

परंतु गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील राजकारणातील चढउतार पाहिले तर याही वेळी शेवटच्या क्षणापर्यंत काहीही होऊ शकते, असे वातावरण निर्माण झाले होते. फडणवीस यांचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग मोकळा होताच राज्याचे राजकारण आता स्थिर होण्याकडे वाटचाल करेल, अशी अपेक्षा आहे. विधानसभा निकालानंतर सर्वांच्या नजरा फडणवीस यांच्याकडेच लागल्या होत्या.

महायुतीचे सूत्रही तसेच ठरलेले होते. २०१४ मध्ये फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाच्या नव्या पवार्ला सुरुवात झाली. मात्र २०१९ मध्ये अचानक ग्रहण लागले. भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांनी एकत्र १६१ जागा जिंकल्या होत्या आणि बहुमत मिळवले होते. परंतु शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदासाठी दावा ठोकला.

इथूनच महाराष्ट्रातील राजकारणाला अनैसर्गिक, अनैतिक आणि अस्थिरतेची लागण सुरू झाली आणि राजकीय विचारांचा कल्लोळ उडाला. पण गेल्या चार ते पाच दशकांपासून हिंदुत्वाचे राजकारण करणाऱ्या शिवसेनेने सत्ता मिळवण्यासाठी २०१९ मध्ये ज्या पद्धतीने रंग बदलला, त्याला जनतेकडून मान्यता मिळणे कठीण होते. २०१४ पासून भारतात भाजपच्या नेतृत्वाखाली मोदी पर्व सुरू झालेले असताना महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर अनाकलनीय घटना घडली होती. अखेर आताच्या निकालातून महाराष्ट्राचे राजकारण एकाच नैसर्गिक विचारांवर आल्याचे दिसून आले. १ जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत बंड झाले. या बंडातून राज्यात अनैसर्गिक युती कोणीही मान्य करणार नाही, असा संदेश दिला गेला. पण जेव्हा अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महायुतीत सामील झाला तेव्हा महाराष्ट्राच्या सत्ता समीकरणात काँग्रेस वगळता अन्य कोणत्याही पक्षात स्थिरता नसल्याचे उघड झाले.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने चांगली कामगिरी करत भाजप-शिवसेना या नैसर्गिक आघाडीला आणि राजकारणाला धक्का दिला. मात्र हा एक तात्पुरता परिणाम ठरला. लोकसभा निवडणुकीच्या निकालावर परिणाम करणारे अनेक घटक होते. त्याचे चित्र महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश आणि अन्य ठिकाणी दिसून आले.

साहजिकच महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश यासारख्या दोन मोठ्या राज्यातील भाजपचे संख्याबळ कमी झाल्याने 'एनडीए'च्या केंद्रात जागा कमी झाल्या. कालांतराने मतदारांनाच चूक झाल्याचे वाटू लागले. भाजपनेही लगेचच बाऊन्सबॅक केला.

अगोदर हरियाणा आणि नंतर महाराष्ट्रात मतदारांनी अनुकूल परिस्थिती आणि सुलभ समीकरणाला कौल दिला.निवडणुकीच्या निकालानंतर सरकार स्थापन करताना दोन आठवडे गेले. कारण फडणवीस यांना नेता या रुपातून स्वीकार करण्यास एकनाथ शिंदे तयार नव्हते.

विधानसभेच्या निकालातून एक गोष्ट स्पष्ट झाली आणि ती म्हणजे शिंदे यांच्या शिवसेनेला मिळालेली जनमान्यता. त्यांनी वलयांकित असलेल्या कुटुंबापासून पक्षाला वेगळे केले आणि या पक्षाला पुन्हा नैसर्गिक विचारांवर आणण्यासाठी बरीच मेहनत घेतली.

जून २०२२ मध्ये भाजपच्या नेतृत्वाखाली स्थिर सरकार असणे गरजेचे होते आणि त्यासाठी शिंदे यांच्यावर कमान सोपविण्यात आली. अर्थात तत्कालिन काळात राजकीय वाटाघाटीत भाजपच्या नेतृत्वाने त्यांना कायमस्वरुपी मुख्यमंत्री होण्याचे एखादे आश्वासन दिले असते तर आता त्याची नक्कीच चर्चा झाली असती.

शिंदे समर्थक हे त्यांना मुख्यमंत्री म्हणून पाहू इच्छित होते; परंतु अशा प्रकारचे चित्र निर्माण करणे हे महाराष्ट्रातील राजकारणाला पुन्हा अस्थिर होण्यास कारणीभूत ठरले असते. शिंदे यांनाही सध्या उमटणाऱ्या प्रतिक्रियांचे आकलन झाले आहे. त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा आग्रह धरला असता तर, उद्धव ठाकरे यांच्याविरोधात बंडखोरी करून निर्माण केलेल्या स्वतःच्या सशक्त प्रतिमेला सरकार स्थापनेत अडथळे आणल्याबद्दल दोषी धरले गेले असते.

महाराष्ट्राच्या राजकारणात काम करताना शिंदे यांच्या शिवसेनेसोबत दीर्घकाळ राहणे आवश्यक असल्याचेही भाजपच्या श्रेष्ठींना चांगलेच ठाऊक आहे. दुसरीकडे अजित पवार यांची राजकीय परिपक्वता दिसून आली.

**(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)**


●●●●●●●●●

# Disease X चा जगभरात धोका

आफ्रिकेत Disease X आजारामुळे 140 रुग्णांचा मृत्यू झाला आहे. जगभरात Disease X चा धोका वाढण्याची शक्यता आहे. जागतिक आरोग्य संघटनेने या आजाराबाबत अलर्ट जारी केला आहे. आहे हा आजार आणि त्याला Disease X असे नाव का देण्यात आले?

मंकीपॉक्सची प्रकरणं अजून थांबली नसती तर मारबर्ग व्हायरस आफ्रिकेत आला होता. ज्यामुळे अनेक रुग्णांचा मृत्यू झाला आहे. या विषाणूनंतर आता आफ्रिकेत Disease X चे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. एका आजाराबाबत जागतिक आरोग्य संघटनेन 7 महिन्यांपूर्वी अलर्ट जारी केला होता. आता त्याची प्रकरणे सातत्याने वाढत आहेत. आफ्रिकेतील अनेक भागात 140 हून अधिक रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

Disease X बद्दल अद्याप फारच कमी माहिती उपलब्ध आहे, यामुळे या आजाराला कोणतेही



विशिष्ट नाव देण्यात आलेले नाही. पण हे नव्या प्रकारच्या विषाणूमुळे असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. 2018 मध्ये पहिल्यांदा Disease X चा उल्लेख करण्यात आला होता.

पण त्यानंतरही हा आजार काय आहे हे कळू शकले नाही. काही भागात लोकांना फ्लूसारखी लक्षणे दिसत होती आणि काही दिवसांनी त्यांचा मृत्यू झाला.

Disease X चा संसर्ग कसा होत आहे हे अद्याप माहित नाही. परंतु संसर्ग झाल्यानंतर अल्पावधीतच रुग्णांचा मृत्यू होत आहे. वाढती प्रकरणे आणि मृत्यू लक्षात घेता जागतिक स्तरावर अलर्ट जारी केला आहे. आफ्रिकेच्या सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शनच्या म्हणण्यानुसार, आतापर्यंत नोंद झालेल्या 386 प्रकरणांपैकी सुमारे 200 प्रकरणे 5 वर्षांखालील मुले आहेत.

हा आजार कसा पसरतो हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी हा आजार एका व्यक्तीकडून दुस?या व्यक्तीकडे पसरतो आणि श्वसनाच्या माध्यमातून पसरतो, असे मानले जाते.

●●●●●●●●●

# वर्किंग वुमन्स : सकाळी घाईत ऑफिसला न्या पौष्टिक जेवण



हल्लीच्या व्यस्त जीवनशैलीमुळे अनेक वर्किंग वुमन ज्या स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात आणि सकाळच्या घाईत टिफिनमध्ये अशा पदार्थांचा समावेश करतात ज्या त्यांच्या आरोग्यासाठी चांगल्या नसतात.

कामाच्या दरम्यान मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी आहाराकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**व्हेजिटेबल ओट्स उपमा**

व्हेजिटेबल ओट्स उपमा बनवण्यासाठी सर्वप्रथम एका कढईत कांदा, गाजर, मटार आणि शिमला मिरची या भाज्यांसोबत ओट्स चांगले भाजून घ्या. त्यानंतर यात गरजेनुसार पाणी घालून सोयीनुसार मसाले आणि मीठ घालून शिजवून घ्या. फायबरयुक्त ओट्स केवळ पचनसुधारत नाहीत तर दिवसभर आपल्याला ऊर्जावान देखील ठेवतात.

**मूग डाळीचा चीला**

मूग डाळीचा चीला बनवण्यासाठी सर्वात प्रथम मूगडाळ काही तास पाण्यात भिजवून ठेवा. त्यानंतर काहीवेळाने मिक्सरमध्ये बारीक पेस्ट तयार करा. एका भांड्यात तयार झालेली पेस्ट काढून त्यात तुमच्या आवडीच्या बारीक चिरलेल्या भाज्या घाला व त्यात मीठ मसाला घालून नीट मिक्स करा. यानंतर हे मिश्रण जास्त पातळ व जास्त घट्ट न करता मध्यम प्रमाणात तयार करा. नंतर नॉन स्टिक पॅनमध्ये हे मिश्रण टाकून माध्यम आकाराचे पोळे काढून घ्या. तयार झालेले पोळे दही किंवा पुदिन्याच्या चटणीबरोबर टिफीनला घेऊन जाऊ शकता. मुगाच्या डाळीपासून तयार केलेला हा चिला प्रथिनांचा उत्कृष्ट स्त्रोत आहे.

**पोहा पुलाव**

एका भांड्यात गरजेनुसार पोहे घेऊन थोडे हलके भिजवून घ्या. त्यानंतर एका कढईत वाटाणा, गाजर, कांदा आणि टोमॅटो सारख्या भाज्यांसह परतून घ्या. यानंतर यात भिजवलेले पोहे घालून त्यात मीठ व मसाले घाला आणि छान परतून घ्या. यानंतर यात शेंगदाणे आणि लिंबाचा रस घाला. पोहा पुलाव तयार आहे. कमी वेळेत झटपट तयार होणार हा पोहा पुलाव एक हलकी आणि निरोगी टिफिन रेसिपी आहे.

**क्विनोआ सलाड**

क्विनोआला उकडून घ्या. त्यानंतर त्यात काकडी, टोमॅटो, शिमला मिरची आणि कोथिंबीर घाला. लिंबाचा रस आणि चवीनुसार थोडे मीठ घालून छान मिक्स करा. एक उच्च-प्रथिने, कमी-कॅलरी सलाड आहे जे वजन कमी करण्यास देखील मदत करते. त्यामुळे झटपट हे क्विनोआ सलाड बनवून टिफिनला घेऊन जाऊ शकतात.

**स्प्राउट्स सलाड**

रात्रभर भिजवून ठेवले मिक्स कडधान्य घेऊन ते थोडे फार उकडवून घ्या. उकडलेल्या कडधान्यांमध्ये काकडी, टोमॅटो, कांदा आणि लिंबाचा रस घाला. तयार आहे तुमचं स्प्राउट्स सलाड हे प्रथिने आणि अँटीऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे, ज्यामुळे ते तुमच्यासाठी एक निरोगी आणि ताजेतवाने पर्याय बनते.

**ब्रेड व्हेज सँडविच**

ब्राऊन ब्रेडला पुदिन्याची हिरवी चटणी लावून घ्या. त्यानंतर त्यात तुम्ही काकडी, टोमॅटो, चीज घालून सँडविच बनवा. ते ग्रिल करा किंवा ग्रिल न करता पॅक करा. हे लवकर तयार होते आणि याच्या सेवनाने तुम्हाला दिवसभर ऊर्जा प्रदान करते.

■ ■ ■

## धनुर्मास महात्म्य

वाचक लिहितात

ज्यावेळी सूर्य धनु राशीत प्रवेश करतो तेव्हा त्याला धनु संक्रांति किंवा धनुर्मास म्हणतात. धनुर्मास 30 दिवसांचा असतो. मार्गशीर्ष महिन्याच्या मध्यापासुन पौष महिन्याच्या मध्यापर्यंतचा काळ म्हणजे धनुर्मास होय. धानुमार्साला कामुर्कामास, शून्य मास, चापमास असे सुद्धा म्हणतात. या मासाची उपास्य देवता विष्णु आहे. म्हणुन या मासात वैकुंठनाथाच्या पूजनाला विशेष महत्त्व आहे. धनुर्मास विशेषतः दक्षिण भारतातला प्रमुख उत्सव आहे.

यावर्षी 16 डिसेंबर ते 13 जानेवारी पर्यंत धनुर्मास आहे. यावेळी उपवासाला विशेष महत्त्व आहे, उपवास म्हणजे ईश्वरा समीप राहणे होय. त्या काळात तामसी आहार करु नये. तसेच सूर्योदयापुर्वी स्नान व पुजा करतात, यालाच ब्रह्म मुहूर्त पुजा असेही म्हणतात. भगवान विष्णूची पुजा व दानधर्म करतात. या दिवसापासून मकर संक्रांति पर्यंत देवाला रोज मुगाची डाळ आणि तांदूळ यांच्या खिचडीचा नैवेद्य अर्पण करतात. या काळात केलेल्या साधनेचे फळ अन्य काळपेक्षा 1000 पटीने जास्त मिळते. रोज विष्णुसहस्त्रनाम आणि व्यंकटेश स्तोत्राचा पाठ करण्यात येतो. याच महिन्यात भगवान श्रीकृष्णाने आपले गुरु सांदीपनी ऋषींकडे विद्या संपादन केली होती, असे धर्मग्रंथात सांगितलेले आहे.

या काळात भौतिक कर्म वर्ज्य आहे, जसे लग्नकार्य, उपनयन इत्यादी. या महिन्यातल्या वैकुंठ एकादशीला निर्जळा उपवास करतात. असे या महिन्याचे महात्म्य आपल्या धर्मग्रंथात सांगितलेले आहे. या सोबतच काल महात्म्य लक्षात घेता स्वतः राष्ट्र आणि धर्म रक्षणासाठी आपल्या क्षमते नुसार साधना आणि दान धर्म करणे. तसेच इतरांमध्ये त्याविषयी जागृती करणे, हे सर्वश्रेष्ठ आहे.

■ **सौ. माधवी पत्की, नागपूर.**

## अशोकायन

### रस्सीखेच

**त्रिमुर्ती युती मध्ये सुरु**
**सत्तेसाठी रस्सीखेच**
**बहुमत असुनही त्वरीत**
**सुटला नाही**
**मुख्यमंत्रीपदाचा पेच..!**

**राजकारणाच्या सोईसाठी**
**मंत्रीमंडळात होतात बदल**
**जनतेच्या समस्यांची खरचं**
**भाऊ कोण घेतय दखल?**

**सर्वसमावेशकतेचा**
**करता करता विचार**
**मंत्रीमंडळ घेणार भौ**
**जम्बोजेटचा आकार..!**



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# इनव्हेटरस नॉलेज सोल्युशन्स लिमिटेडची प्राथमिक समभाग विक्री गुरुवार १२ डिसेंबर २०२४ पासून सुरू

■ **महासागर प्रतिनिधी, नवी दिल्ली, दि.१० :** राष्ट्रीय, ९ डिसेंबर २०२४: इनव्हेटरस नॉलेज सोल्युशन्स लिमिटेड (कंपनी) ने गुरुवार १२ डिसेंबर २०२४ रोजी इक्विटी शेअरची प्राथमिक समभाग विक्री (ऑफर) करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. प्रमुख गुंतवणूकदाराच्या बोलीची तारीख बोली/ऑफर खुली होण्याच्या एक कार्यालयीन दिवस आधी म्हणजे बुधवार ११ डिसेंबर २०२४ असणार आहे. बोली/ऑफर सोमवार १६ डिसेंबर २०२४ रोजी बंद होईल. प्रति इक्विटी शेअरसाठी १२६५ रुपये ते १३२९ रुपये पर्यंतचा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे. बोली किमान ११ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ११ इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल.



इनव्हेटरस नॉलेज सोल्युशन्स लिमिटेडच्या १ रु दर्शनी मूल्याच्या प्रती इक्विटी शेअर्ससाठी १८,७९५,५१० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल समाविष्ट आहे. या ऑफर फॉर सेल मध्ये आर्यमन झुनझुनवाला डिस्क्रिशनरी ट्रस्टद्वारे १,११९,३०० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, आर्यवीर झुनझुनवाला डिस्क्रिशनरी ट्रस्टद्वारे १,११९,३०० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, निष्ठा झुनझुनवाला डिस्क्रिशनरी ट्रस्टद्वारे १,११९,३०० पर्यंतचे इक्विटी शेअर्स (प्रमोटर सेलिंग शेअरहोल्डर्स), अश्रा फॅमिली ट्रस्टद्वारे ३,३७६,३११ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, राजेशकुमार राधेश्याम झुनझुनवाला यांच्याकडून २६,५१३ पर्यंतचे इक्विटी शेअर्स (प्रमोटर ग्रुप सेलिंग शेअरहोल्डर्स), अदीत शरद गोगटे यांच्याद्वारे ९८,२५० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, अजय माधवन मडतीपरांबिल यांच्याद्वारे १३९,०४२ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, अजित राजगोपाल मेनन यांच्याद्वारे ७२,०५१ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, ॲलन यांच्याद्वारे १०४,२८१ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, अंकुर चुग यांच्याद्वारे ६९,५२१ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, अनुराग श्यामसुंदरलाल शर्मा यांच्याद्वारे ३२३,५७२ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, अरिंद्रजित दत्ता यांच्याद्वारे ४९,१२६ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, अशीत कालरा यांच्याद्वारे ८३,४२५ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, बर्जिस मिनू देसाई यांच्याद्वारे ६७६,५४९ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, चार्ल्स एडवर्ड ब्राऊन यांच्याद्वारे ५,२९७ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, ख्रिस्तोफर जे स्क्लाफानी यांच्याद्वारे १०१,७९९ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, क्लेरन्स कार्लटन किंग यांच्याद्वारे ४७,०३५ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, गौरव जैन यांच्याद्वारे ३३,४०६ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, गौतम चार यांच्याद्वारे १,२५१,३७८ पर्यंतचे इक्विटी शेअर्स. जेफ्री फिलिप फ्रेमार्क यांच्याद्वारे १,१४१,००१ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, जॉन बेनार्डेलो यांच्याद्वारे ८६,९०१ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, जोसेफ बेनार्डेलो यांच्याद्वारे ३,०४१,८१२ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, के.सी. निशिल कुमार यांच्याद्वारे २३२,३४१ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, करीन रिबेरो मजुमदार यांच्याद्वारे ४९,१२६ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, कॅथरीन निकोल डेव्हिस यांच्याद्वारे २६६,७८१ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, मदथीपरांबिल कृष्णन माधवन यांच्याद्वारे १३०,५९४ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, मनीष गुप्ता यांच्याद्वारे ५५,६१७ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, मनू महमूद पारपीया (लिन मनू पारपीयासह संयुक्त) यांच्याद्वारे १६६,८५० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, मयूर प्रविणकांत संघवी यांच्याद्वारे ६१,२९० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, मितुल दीपक ठक्कर यांच्याद्वारे २११,१७० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, निखिल शर्मा यांच्याद्वारे ३,००० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, परमिंदर बोलिना यांच्याद्वारे १,२५१,३७८ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, पॅट्रिक बर्टन क्लाइन यांच्याद्वारे २५७,८७३ पर्यंतचे इक्विटी शेअर्स.

# भारतातील सर्वात वेगवान स्मार्टफोन आईकू १३

## ११ डिसेंबरपासून विक्रीसाठी उपलब्ध होईल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि.१० :** भारतातील सर्वात वेगवान आणि उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ने त्याचे नवीन प्रकार आईकू १३ लाँच करून मोबाइल उद्योगाचे मानक उच्च ठेवले आहेत. ज्यांना फक्त चांगले ब्रँड हवे आहेत त्यांच्यासाठी हे फ्लॅगशिप डिव्हाइस जबरदस्त कामगिरी, अत्याधुनिक वैशिष्ट्ये, प्रीमियम डिझाइनसह येते.



आईकू १३ ची १२जीबी + २५६जीबी व्हेरिएंटसाठी ५४,९९९ रुपये (प्रभावी किंमत: ५१,९९९ रुपये) आणि १६जीबी + ५१२जीबी व्हेरिएंटसाठी रुपये ५९,९९९ (प्रभावी किंमत: ५६,९९९ रुपये) किंमत आहे, जे दोन रंगीत आणि सुंदर पर्यायांमध्ये उपलब्ध असतील. नार्डो ग्रे. ग्राहक लॉन्च ऑफरचा लाभ घेऊ शकतात, ज्यात एचडीएफसी आणि आईसीआईसीआई बँक बँक क्रेडिट/डेबिट कार्ड्सवर ३,००० रुपयांची सवलत समाविष्ट आहे. वापरकर्ते नॉन-वीवो/ आईकू उपकरणांसाठी ३,००० रुपये आणि वीवो/ आईकूउपकरणांसाठी रुपये ५,००० चा एक्सचेंज बोनस देखील घेऊ शकतात. याव्यतिरिक्त, ९ महिन्यांपर्यंतचे विनाखर्च ईएमआई देखील उपलब्ध आहेत.

आईकू १३ वीवो विशेष स्टोअर्स, आईकू ई-स्टोअआणि अमेज़न डॉट इन वर उपलब्ध असेल. विवो अनन्य स्टोअर्स आणि इतर मेनलाइन स्टोअरमध्ये त्याच्या उपलब्धतेसह, हा विस्तार आईकू डिव्हाइस थेट अनुभवण्याची आणि खरेदी करण्याची सोय सुनिश्चित करतो.

आईकू १३ अत्याधुनिक क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ८ एलिट चिपसेटसह सुसज्ज आहे, आईकू ची प्रोप्रायटरी सुपरकॉम्प्युटिंग चिप क्यू-२ ही त्याच्या शक्तिशाली कार्यक्षमतेत भर घालत आहे, जी २के सुपर रिझोल्यूशन आणि १४४ एफपीएस गेम फ्रेम इंटरपोलेशनसह उच्च दर्जाच्या व्हिज्युअलसाठी नवीन मानके सेट करते. यात जगातील पहिला क्यू-१० २के १४४हर्ट्‌ज अल्ट्राआई केयर डिस्प्ले आकर्षक मॉन्स्टर हॅलो डिझाइनसह आहे. डिव्हाइसमध्ये १२०डब्ल्यू अल्ट्रा-फास्ट चार्जिंगसह एक मजबूत ६०००एमएएच बॅटरी आहे, केवळ ३० मिनिटांत पूर्ण चार्ज करून कमी बॅटरीची चिंता दूर करण्यासाठी डिझाइन केलेली आहे.

डिव्हाइसमध्ये ट्रिपल कॅमेरा सेटअप आहे: ५०एमपी सोनी आईएमएक्स ९२१+५०एमपी सोनी आईएमएक्स ८१६ टेलिफोटो+५०एमपी अल्ट्रा-वाइड लेन्स आणि वीसीएस ट्रू-कलर प्राथमिक कॅमेरा लेन्स. विवो च्या प्रगत इमेजिंग अल्गोरिदमचा फायदा घेत, आईकू १३ एक प्रीमियम फोटोग्राफी अनुभव देते.

एंड्रॉयड १५ वर आधारित नवीनतम फनटच ओएस १५ वर चालणारे, आईकू १३ एक साधा आणि चांगला वापरकर्ता अनुभव प्रदान करते. ब्रँडसाठी हा एक मैलाचा दगड आहे, जो उद्योगातील आघाडीची ४ वर्षांची एंड्रॉयड अद्यतने आणि ५ वर्षांची सुरक्षा अद्यतने ऑफर करतो.

# अवनीसोबतचे त्याचे कायम प्रगल्भ होत असलेले नाते टिपणे हे माझ्यासाठी सगळ्यात आव्हानात्मक होते

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १०** बस इतना सा ख्वाबमधील आपल्या व्यक्तिरेखेबद्दल योगेंद्र विक्रम सिंग सांगत आहे झी टीव्हीवरील नवीन मालिका बस इतना सा ख्वाब ही एक भावस्पर्शी कथा असून त्यातून गृहिणींचा दैनंदिन त्याग आणि आपल्या परिवाराच्या भविष्याला आकार देण्यासाठी त्या शांतपणे करत असलेली मेहनत पाहायला मिळेल. राजश्री ठाकूर साकारत असलेली कानपूरमधील ४२ वर्षीय गृहिणी अवनी त्रिवेदीची ही कथा असून यातून आपल्या परिवाराच्या मोठे घर घेण्याच्या स्वप्नामध्ये सक्रियपणे योगदान देण्यासाठीच्या तिच्या असाधारण प्रवासावर ही मालिका प्रकाश टाकेल. या मालिकेमध्ये अवनीच्या पतीच्या रुपात अभिनेता योगेंद्र विक्रम सिंग हा शिखर त्रिवेदीची भूमिका साकारत आहे. तो जुन्या विचारसरणीचा असून जसे सीता कायम रामाच्या पावलावर पाऊल ठेवून चालते तसे पत्नीने कायम पतीपेक्षा एक पाऊल मागे राहायला हवे असा विचार तो करतो. समाजातील काही पारंपरिक नियमांचा त्याच्या मनावर मोठा पगडा असून त्यामध्ये पुरुष आणि स्त्रिया यांच्या कामाची ठिकाणे यांच्या चौकटी आखलेल्या आहेत आणि या चौकटी मोडण्यासाठी तो तयार नाही. त्याला अवनीची चिंता आहे, पण अनेकदा अवनीचे परिवारासाठीचे योगदान त्याच्या लक्षातच येत नाही. आपले स्वतःचे मोठे घर बांधण्याचे त्याचे स्वप्न आहे. आपली व्यक्तिरेखा, तयारी आणि या मालिकेच्या संकल्पनेबद्दल योगेंद्र सांगत आहे.



१. शिखरच्या भूमिकेकडे तू कसा आकृष्ट झालास आणि या मालिकेमध्ये अवनीच्या प्रवासात तुझी व्यक्तिरेखा तिला कशाप्रकारे समर्थन किंवा आव्हान देते?

# मोटोरोलाने लाँच केला मोटो G35, 5G या सेगमेंटमधील सर्वात फास्ट ५G स्मार्टफोन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १०** मोटोरोला या भारतातील अग्रगण्य 5G स्मार्टफोन ब्रँडने आज मोटो G35, 5G स्मार्टफोन लाँच करून परवडणाऱ्या 5G स्मार्टफोनच्या बाजारात नवा मापदंड प्रस्थापित केला आहे. हा स्मार्टफोन सेगमेंटमधील सर्वाधिक १२ 5G बँड्ससह सर्वात वेगवान 5G कनेक्टिव्हिटी प्रदान करतो. यात कनेक्टिव्हिटी, ४४ , आणि ४ कॅरिअर ॲग्रिगेशन यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश आहे, ज्यामुळे अखंडित आणि भविष्य-सज्ज५ अनुभव मिळतो. मोटो G35, 5G एअरटेल व जिओसह सर्व 5G नेटवर्क ऑपरेटर्ससह सुसंगत आहे आणि -तसेच 5G नेटवर्क्सना सपोर्ट करतो, ज्यामुळे हा खरा 5G डिव्हाइस ठरतो. या फोनला टेकआर्कने अधिकृतपणे भारतातील या सेगमेंटमधील सर्वात वेगवान 5Gस्मार्टफोन म्हणून मान्यता दिली आहे. हे 5G संबंधित विविध निकषांचा अभ्यास करून सिद्ध झाले आहे. याशिवाय, मोटो G35 5G मध्ये सेगमेंटमधील एकमेव + ६.७ डिस्प्ले आहे, ज्यामध्ये व्हिजन बूस्टर टेक्नॉलॉजी आणि ६०-१२०व्हेरिएबल रिफ्रेश रेट आहे. यात १००० निट्स ब्राइटनेस आहे, ज्यामुळे खूप प्रकाश असलेल्या परिस्थितीतही स्पष्ट दृश्य अनुभव आणि स्मूथ ट्रान्झिशन अनुभवता येते. या डिस्प्लेला कॉर्निंग गोरिला ग्लास ३ चे संरक्षण लाभले आहे. यामध्ये सेगमेंटमधील एकमेव ५० क्वाड पिक्सेल कॅमेरा सिस्टम आहे, जो ४ व्हिडिओ रेकॉर्डिंगला सपोर्ट करतो. यासोबत ८ अल्ट्रावाईड कॅमेरा आणि सेगमेंटमधील आघाडीचा १६ सेल्फी कॅमेरा आहे, जो विस्मयकारक फोटोग्राफी आणि व्हिडिओ क्षमतांसाठी ओळखला जातो. हा स्मार्टफोन प्रीमियम व्हेगन लेदर डिझाइनसह उपलब्ध आहे, ज्यामध्ये लीफ ग्रीन आणि ग्वावा रेड रंग, तसेच मिडनाईट ब्लॅक रंगातील ३ -फिनिशचा पर्याय आहे. मोटो G35 5G मध्ये परफॉरमन्स, डिझाइन आणि मूल्य यांची उत्तम सांगड घालण्यात आली आहे. मोटो ३५ ५ ने सेगमेंटमधील सर्वात जलद 5G परफॉरमन्स देऊन 5G कनेक्टिव्हिटीसाठी नवीन मानक स्थापित केले. आहे.



टेकआर्कने छ१३,००० च्या श्रेणीत भारतातील सर्वात जलद ५ स्मार्टफोन म्हणून याला मान्यता दिली आहे. यात प्रभावी १२ ५ बँड्स आणि कनेक्टिव्हिटी आहे, ज्यामुळे हा रू ५ फोन सर्व नेटवर्क ऑपरेटर्स आणि -तसेच -५ बँड्ससह सुसंगत आहे. अत्याधुनिक ४४ तंत्रज्ञान आणि ४ कॅरिअर ॲग्रिगेशनसाठी सपोर्टसह, वापरकर्त्यांना अतुलनीय वेग आणि विश्वासार्हता अनुभवता येते. स्ट्रीमिंग असो, गेमिंग असो किंवा आठवणी कॅप्चर करणे असो, मोटो ३५ ५ भविष्यासाठी सज्ज आणि लॅग-फ्री५ अनुभव प्रदान करतो, ज्यामुळे तो आपल्या श्रेणीत इतरांपेक्षा वेगळा ठरतो.

मोटो ३५ ५ मध्ये सेगमेंटमधील एकमेव + ६.७ १२० डिस्प्ले आहे.

## आजचे राशिभविष्य

**मेष :** आज जवळचे मित्र आणि कुटुंबीयांना भेटाल. व्यवसायात मनापासून काम कराल. आकर्षक प्रस्तावांचा पाठपुरावा करण्यात यश मिळेल. वैयक्तिक बाबी आणि अभ्यासात रुची वाढेल.

**वृषभ :** आज तुम्ही नवीन गोष्टी करण्यासाठी आणि अनन्य उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी तुमचे प्रयत्न सुरू ठेवू शकता. महत्त्वाच्या कामाचे नेतृत्व करण्याची संधी मिळेल.

**मिथुन :** आज घरगुती समस्या सुटतील. मुलांच्या बाजूने सकारात्मकता वाढेल. निपुत्रिकांना चांगली बातमी मिळेल. आज कार्यक्षेत्रात सर्व कामे वेळेवर करण्याची सवय लावा.

**कर्क :** कुटुंबात शुभ कार्यक्रम होईल. नात्यात तीव्रता राहील. राजकारणात वर्चस्व वाढेल. क्रीडा जगताशी संबंधित लोकांना स्पर्धेला सामोरे जावे लागेल. आज कार्यक्षेत्रात अनावश्यक धावपळ होईल.

**सिंह :** व्यवसायात प्रगतीसह विस्तार होईल. कोर्टाच्या कामात यश मिळेल. राजकारणात पुरस्कार आणि प्रतिष्ठा वाढेल. कुटुंबाकडून चांगली बातमी मिळेल. व्यवसायात कठीण स्पर्धेला सामोरे जावे लागेल.

**कन्या :** अधिकाऱ्यांचे पूर्ण सहकार्य मिळेल. राज्याकडून तुम्हाला सकारात्मक माहिती किंवा आदर मिळू शकतो. राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल. बेरोजगारांना रोजगार मिळेल.

**तुळ :** करिअर आणि व्यवसायात चांगले स्थान राखाल. उत्पन्न खर्च अधिक होईल. राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल. आज तुम्हाला तुमच्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागेल.

**वृश्चिक :** आज आहार आणि जीवनशैलीवर लक्ष केंद्रित राहू शकते. कार्यक्षेत्रात तुमच्या इच्छेनुसार कामात रस दाखवाल. विरोधकांशी वाद व वादविवाद टाळा. राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल.

**धनु :** आज कुटुंबातील मर्यादित चर्चेत आपले मत मांडण्याची सवय ठेवा. जवळच्या व्यक्तींशी विनाकारण मतभेद होऊ शकतात. कामाच्या ठिकाणी कामाचा ताण जास्त राहील.

**मकर :** नोकरीत उच्च अधिका-यांशीअसलेले मतभेद संपतील. दुस-याच्याभांडणात पडू नका. अन्यथा तुमच्यासाठी समस्या उद्भवू शकतात. व्यवसायात कठोर परिश्रम करून अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही.

**कुंभ :** व्यवसायात केलेले बदल फायदेशीर ठरतील. आज आरोग्य अगदी सामान्य राहील. रोग किंवा दोष उद्भवण्याची शक्यता आहे. आवडत्या पदार्थांचे अतिसेवन टाळावे.

**मीन :** आज कामाच्या ठिकाणी सामाजिक सौहार्दावर लक्ष केंद्रित केले जाईल. नोकरीत स्थान बदलण्याची शक्यता


## आज का अंदाज

बुधवार ११ डिसेंबर २०२४

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| ३९० | २११ | ११४ | २२४ | २२९ | २२० | १२२ | ११६ |
| ४८० | ३६६ | २७७ | ५५८ | ३३७ | ६९९ | ७९९ | ४७७ |
| ५७० | ४४७ | ३३० | ४७७ | ४४५ | ४५५ | ३३९ | २८८ |
| २३ | ५३ | ६१ | ९१ | ३२ | ४० | ५१ | ८१ |
| २७ | ५७ | ६८ | ९८ | ३६ | ४७ | ५९ | ८७ |
| २४ | ५४ | ६० | ९० | ३० | ४२ | ५७ | ८९ |

११ डिसेंबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४३ | ७३ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल. १०० टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# महाराष्ट्राच्या ऊर्जा संक्रमणाला गती देण्यासाठी माननीय महाराष्ट्र वीज नियामक आयोग आणि जीईएपीपी भागीदार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १०** महाराष्ट्र वीज नियामक आयोग (एमईआरसी) आणि ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट (जीईएपीपी) यांच्यात नियामक आणि धोरणात्मक नवकल्पनांद्वारे महाराष्ट्राच्या ऊर्जा संक्रमणास चालना देण्यासाठी आशयपत्रावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. शाश्वत ऊर्जेसाठी सार्वत्रिक प्रवेश मिळविण्याच्या उद्दिष्टासह नवीकरणीय ऊर्जेचे एकत्रीकरण आणि सर्वसमावेशक विकासास प्रोत्साहन देण्यावर हे सहकार्य केंद्रित करते. जीईएपीपी आणि नीती आयोग यांच्यातील अशाच भागीदारीनंतर ही भागीदारी राज्य स्तरावर परिवर्तनकारी कृतींचा प्रभाव वाढवते. रेग्युलेटरी इनोव्हेशनमधील नेतृत्वासाठी ओळखल्या जाणाऱ्या एमईआरसीने नुकतेच वीज संसाधन पर्याप्तता आणि वीज मागणीची लवचिकता नियमांसह महत्त्वपूर्ण उपाययोजना सुरू केल्या आहेत, ज्याचे उद्दीष्ट संपूर्ण महाराष्ट्रात ग्रीड ऑपरेशन्स आणि स्थिरता वाढविणे आहे.



जीईएपीपी ऊर्जा ग्रीड मजबूत करून आणि सौर आणि पवन यासारख्या स्वस्त आणि नवीकरणीय स्त्रोतांचे एकत्रीकरण सुलभ करून अक्षय ऊर्जेकडे संक्रमण वेगवान करण्याच्या दिशेने कार्य करते. जीईएपीपीचे उद्दीष्ट क्षमता वाढविणे, नाविन्यपूर्णतेस प्रोत्साहन देणे आणि स्केलेबल व्यवसाय मॉडेलच्या विकासास समर्थन देऊन शाश्वत ऊर्जा प्रणालीसाठी आवश्यक परिस्थिती तयार करणे आहे.

जीईएपीपीसह सहकार्य नियामक नाविन्यपूर्णतेसाठी एक व्यासपीठ तयार करेल, ज्यात वितरण खर्च कमी करणे आणि ग्राहक कल्याण सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. ही भागीदारी ग्रीड व्यवस्थापन, नवीकरणीय ऊर्जा एकीकरण, वीज मागणीची लवचिकता, ऊर्जा कार्यक्षमता आणि दरांचा समावेश यासारख्या क्षेत्रांचा शोध घेईल, ज्यामुळे मूर्त, जमिनीवर परिणाम निर्माण करणारे नियामक दृष्टिकोन सादर करण्याचा प्रयत्न केला जाईल. जागतिक स्तरावरील सर्वोत्तम पद्धतींचा आधार घेत महाराष्ट्राच्या वाढत्या ऊर्जेच्या गरजा भागविण्यासाठी राज्य-विशिष्ट कौशल्य देखील तयार केले जाईल.

एमईआरसीचे अध्यक्ष संजय कुमार म्हणाले, जीईएपीपीबरोबरची ही भागीदारी महाराष्ट्राच्या वीज नेटवर्कबद्दल एक नवीन दृष्टीकोन प्रदान करेल, राज्याच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी उपाय शोधून सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय पद्धतींचा समावेश करेल. एमईआरसीच्या नेतृत्वाचे कौतुक करताना जीईएपीपीचे भारतातील उपाध्यक्ष सौरभ कुमार म्हणाले, वीज मागणीची लवचिकता आणण्यात एमईआरसीच्या पुरोगामी नेतृत्वामुळे महाराष्ट्र राज्यस्तरीय ऊर्जा संक्रमणासाठी एक बेंचमार्क स्थापित करीत आहे. शाश्वत, स्केलेबल आणि ग्राहक-केंद्रित्समाधान तयार करण्यासाठी लक्ष्यित समर्थन आणि कौशल्य प्रदान करून जीईएपीपी ही गती वाढविण्यास उत्सुक आहे. आम्ही एकत्रितपणे समन्यायी, लवचिक आणि उद्याच्या संधींसाठी तयार असलेले ऊर्जा भविष्य घडवत आहोत. हे सहकार्य महाराष्ट्रसाठी शाश्वत, लवचिक आणि सर्वसमावेशक ऊर्जा भवितव्य घडविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल आहे, ज्यामुळे देशभरात राज्यस्तरीय ऊर्जा हस्तांतरणाची पायाभरणी होईल.

**ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट (जीईएपीपी) बद्दल:**

ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट (जीईएपीपी) ही परोपकार, सरकार, तंत्रज्ञान, धोरण आणि वित्तीय भागीदारांची युती आहे. आगामी दशकात महत्वपूर्ण हवामान उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी जागतिक समुदायाला पाठिंबा देताना सार्वत्रिक ऊर्जा प्रवेश आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासाला चालना देणारे, उदयोन्मुख आणि विकसित अर्थव्यवस्थांना स्वच्छ ऊर्जेसाठी सक्षम करणे हे आमचे सामूयिक अभियान आहे. एक युती म्हणून, आम्ही भविष्यातील कार्बन उत्सर्जनाचे ४ गिगाटन कमी करणे.

# अविवा इंडिया युगाची नवी सुरुवात

## ग्राहक, भागीदार आणि संस्थेसाठी जीवन विमा क्षेत्रातील एक धाडसी नवीन दृषटिकोन

■ **महासागर प्रतिनिधी, नवी दिल्ली, दि.१० :** अविवा लाइफ इन्शुरन्स इंडिया ग्राहकांच्या आरोग्य, पारदर्शकता आणि उपलब्धतेसाठी क्रांतिकारी वचनबद्धतेसह जीवन विमा क्षेत्रात परिवर्तन घडवून आणत आहे. एक प्रगतीशील दृष्टिकोनानुसार मार्गदर्शन करत, अविवाने नाविन्यपूर्ण उत्पादने आणि उपक्रम सुरू केले आहेत जे उद्योगात एक नवा मानक स्थापित करतात, आणि भारताच्या इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी (आयआरडीएआय) च्या इन्शुरन्स फॉर ऑल मिशनसह सुसंगत आहेत.

AVIVA Life Insurance

संपूर्ण कल्याणावर लक्ष केंद्रित करणे अविवाच्या दृष्टिकोनाचा मुख्य आधार म्हणजे त्याच्या ग्राहकांसाठी संपूर्ण कल्याणावर लक्ष केंद्रित करणे, जे पाच प्रमुख स्तंभांवर आधारित आहे: शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक चांगलेपण, सक्रिय आरोग्य तपासणी, संतुलित पोषण, आणि आर्थिक सुरक्षा. कल्याणाच्या या संपूर्ण दृष्टिकोनाचे प्रतिबिंब अविवा यांच्या प्रमुख उत्पादनांमध्ये दिसून येते, ज्यात एक प्रतिबंधात्मक कल्याण पॅकेज आहे, जे स्मार्ट आरोग्य साधने जसे की स्मार्ट स्केल, बीपी मॉनिटर, स्मार्टवॉच, ए.आय. आधारित आहार मार्गदर्शन, जीनोम चाचणी आणि पोषणतज्ञांसोबत सल्ला प्रदान करते. कल्याण साधनांचा हा संच पॉलिसीधारकांना त्यांच्या आरोग्यात सक्रिय भूमिका घेण्यासाठी प्रोत्साहित करतो आणि अविवा आपल्या ग्राहकांच्या जीवनात आणलेली मूल्यवर्धन वाढवतो.

अविवा इंडिया चे सीईओ आणि एमडी श्री. आसित रथ म्हणतात, जीवन विमा प्रदाता म्हणून, आम्ही विश्वास ठेवतो की खरी सुरक्षा म्हणजे फक्त आर्थिक संरक्षण नाही; हे आमच्या ग्राहकांना निरोगी जीवन जगण्यासाठी सक्षम करण्याबद्दल आहे. आमचा कल्याण-केंद्रित दृष्टिकोन जीवन विमा एक संसाधन म्हणून रुपांतरित करतो, जे पारंपारिक सीमा ओलांडून आमच्या ग्राहकांच्या आरोग्याच्या प्रवासाला समर्थन देते.

अविवा सिग्नेचर उत्पादनांच्या माध्यमातून पारदर्शकता आणि विश्वास

अविवाची पारदर्शकता आणि नैतिक पद्धतींच्या प्रति वचनबद्धता तिच्या अविवा सिग्नेचर उत्पादन मालिकेमध्ये स्पष्टपणे दिसून येते, ज्याचा उद्देश चुकीच्या विक्रीला थांबवणे आणि प्रत्येक उत्पादन ग्राहकांच्या अनोख्या गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य असावे याची खात्री करणे आहे. नैतिक उत्पादनांच्या या वचनबद्धतेमुळे ग्राहकांचा विश्वास आणि टिकाऊपण वाढला आहे, ज्यामुळे अविवा जीवन विमा क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करत आहे.

अविवाच्या उत्पादन पोर्टफोलिओमध्ये केलेले नाविन्य ग्राहकांना दीर्घकालीन सल्लागार करिअरसाठी टिकाऊ आणि फायद्याची निवड बनवण्यासाठी अविवाच्या सल्लागारांना प्रतिस्पर्धात्मक दीर्घकालीन कमिशन मॉडेलची मदत करण्यासाठी डिझाइन केली.

# कलाकार परिवर्तनात्मक साठी सज्ज !

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**

नववर्ष चा शुभारंभ होणार असताना कलाकार उत्साही असण्यासोबत निश्चय आणि नवीन संकल्प ठरवत आहेत. आपली अभिनय कला निपुण करण्यासोबत नवीन क्षमतांचा शोध घेण्यापर्यंत एण्ड टीव्ही कलाकार रवी महाशब्दे (मालिका 'अटल'मधील क्रिष्णन बिहारी वाजपेयी), स्मिता साबळे (मालिका 'भीमा'मधील धनिया), आर्यन प्रजापती (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील ऋतिक) आणि रोहिताश्व गौड (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील मनमोहन तिवारी) नववर्षासाठी त्यांच्या संकल्पांबाबत सांगत आहेत.

मालिका 'अटल'मध्ये क्रिष्णन बिहारी वाजपेयीची भूमिका साकारणारे रवी महाशब्दे म्हणाले, '' मध्ये माझा प्रमुख संकल्प म्हणजे मी माझ्या कुटुंबासोबत अधिक वेळ व्यतित करण्याचा प्रयत्न करणार आहे. मी समाधानकारक करिअरसाठी आनंदी असलो तरी मला आपल्या प्रियजनांसोबत वेळ व्यतित करण्याचे महत्त्व समजले आहे. नववर्षात मी त्यांच्यासोबत दीर्घकालीन आठवणींचा संग्रह करणार आहे, नवीन ठिकाणी पर्यटनाला जाणार आहे, विविध संस्कृती अनुभवणार आहे आणि प्रत्येक क्षणाचा आनंद घेणार आहे. शांत हिल स्टेशन असो किंवा आंतरराष्ट्रीय गंतव्य असो, मी संस्मरणीय साहसांचा आनंद घेण्यासह त्यांच्यासोबतचे नाते अधिक दृढ करण्यास उत्सुक आहे. माझे कामासह माझ्या कुटुंबासोबत वेळ व्यतित करण्याची खात्री घेण्यावर लक्ष केंद्रित आहे. मी नववर्ष घेऊन येणाऱ्या आनंदासाठी उत्सुक आहे.''



मालिका 'भीमा'मध्ये धनियाची भूमिका साकारणाऱ्या स्मिता साबळे म्हणाल्या, ''नववर्ष मध्ये मी परिवर्तन करण्यासोबत स्वत:ची काळजी घेणार आहे. माझा मुख्य फोकस आरोग्य आणि फिटनेसवर असणार आहे. मी शिस्तबद्ध

# पोरीसाठी अन्य देशीसाठी मरण्यापेक्षा देशासाठी प्राण द्यावे!



## सत्यपाल महाराजांचा कीर्तनातून शेंदुरजना बाजार येथे अंधश्रद्धा, बुवाबाजीवर प्रहार

■ महासागर प्रतिनिधी,

**तिवसा, दि. १० :** तिवसा आजकालची तरुणाई ही देशासाठी मरण्यापेक्षा पोरीसाठी व देशीसाठी मरताना आपण पाहतो, तर दुसरीकडे ३३ कोटी देवांना फुले वाहतो. ही देवभक्ती दाखवण्यापेक्षा देशभक्ती दाखवून आपल्या मुलांचे भविष्य घडवा. आजच्या तरुणांनी देशीसाठी व पोरीसाठी मरण्यापेक्षा देशासाठी मरावे. पालकांचे व गावाचे नाव मोठे करावे, असे आवाहन समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांनी केले. तिवसा तालुक्यातील शेंदुरजना बाजार येथे दत्तजयंती महोत्सव व संत अच्युत महाराज यांच्या जन्मशताब्दी समारोपीय उत्सवानिमित्त कीर्तन आयोजित केले होते. सत्यपाल महाराज म्हणाले, आपण आपल्यासाठी जगतो व मरतो. परंतु, संत श्री अच्युत महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे अनेक महापुरुष हे आयुष्यभर दुसऱ्यासाठी जगले म्हणून त्यांची जयंती आजही साजरी होते. दुसऱ्यासाठी जगण्याचा सल्ला देत महापुरुषांच्या कार्याची प्रेरणा घेण्याची व त्यांच्या विचाराने चालण्याची गरज आज खऱ्या अर्थाने समाजाला असल्याचे सत्यपाल महाराज यांनी आपल्या कीर्तनातून सांगितले. या प्रसंगी प्रामुख्याने सचिन देव, कनेरकर महाराज, डॉ. अनिल सावरकर, सुधीर दिवे उपस्थित होते. कीर्तनाला पंचक्रोशीतील हजारो नागरिक उपस्थित होते. कीर्तनातून त्यांनी अंधश्रद्धा, बुवाबाजी, वाईट व्यसन, जातीयवादावर प्रहार करत जनजागृती केली. या वेळी सत्यपाल महाराजांना हार्मोनियमवर गजानन चिंचोळकर, तबल्यावर रोशन राऊत यांच्यासह सुनील चिंचोळकर, राजेश काइगे यांनी साथसंगत केली. हार्ट हॉस्पिटल हाच एक चमत्कार : अंगारेवाला, तवेवाला बाबांच्या चमत्काराच्या मागे लागण्यापेक्षा जेथे खऱ्या अर्थाने नागरिकांचे जीव वाचवले जातात, असे कार्य करणाऱ्या संतांनी केलेल्या कार्याच्या, विचारांच्या मागे लागा. जीवनाचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल. संत अच्युत महाराजांनी लोकांचे जीव वाचवण्यासाठी हार्ट हॉस्पिटलची निर्मिती केली. तेथे आजवर हजारो शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्यात. हाच खूप मोठा चमत्कार असल्याचेही सत्यपाल महाराज आपल्या प्रबोधनातून म्हणाले. कीर्तनातून समाज प्रबोधन करताना सत्यपाल महाराज व चमू. या प्रसंगी उपस्थित नागरिक. संत अच्युत बाबा, कर्मयोगी संत गाडगेबाबा यांनी कधी त्यांच्या पायाला हात नाही लावू दिला. परंतु, आपण आजही बुवाबाजीवर विश्वास ठेवून दारू सोडवण्यासाठी बुवाबाजी करणाऱ्यांकडे जातो. तेथे महिलासह युवतीसुद्धा अत्याचाराला बळी पडतात. अशा ढोंगी बाबांच्या मागे न लागता थोर संत, महापुरुषांचे विचार आत्मसात करून जगाचे कल्याण करण्याचा सल्ला सत्यपाल महाराजांनी आपल्या कीर्तनातून महिलांसह उपस्थित नागरिकांना दिला आहे.

# गॅस सिलिंडरची चोरी करणाऱ्या चोरट्यांना चार दिवसात अटक

■ महासागर प्रतिनिधी,

**दारव्हा, दि.१० :** दारव्हा तालुक्यातील बोदेगाव येथील गॅस एजंसीच्या गोदामातून गॅस सिलेंडरची चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना एलसीबीसह दारव्हा पोलिसांच्या पथकाने अटक केली. ही कारवाई रविवारी रात्रीच्या सुमारास करण्यात आली असून २७ लाख ६४ हजार रूपयांचा मुद्देमाल त्यांच्याकडून जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील उर्वरित आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल.

अशी माहिती यवतमाळ जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी दारव्हा येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे. या प्रकरणी पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, दारव्हा तालुक्यातील बोदेगाव येथील अमोल ठाकरे यांनी दि. ५ डिसेंबरला पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. तक्रारीनूसार, त्यांच्या गुरु माऊली ग्रामिण वितरक इंडेन गॅस एजन्सी बोदेगाव येथील गॅस सिलेंडर गोडाऊनमधून चोरट्यांनी रिकामे व भरलेली असे एकूण ५२५ गॅस सिलिंडर किमंत १३ लाख १३ हजार ७८४ रुपयांचे सिलिंडर लंपास केले होते. या प्रकरणी दारव्हा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला होता. संशयीत



वाहनाचा क्रमांक (एमएच-२६-एडी-०६४७) असा प्राप्त केला. त्यानंतर वाहन मालकीबाबत माहीती घेवून संशयीत ट्रक चालक मोहसीन कुरेशी अब्दुल वाहेद कुरेशी वय ३५ वर्ष याला नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर गाठून शोध घेतला असता, तो हिंगोली जिल्ह्यातील डोंगरकडा येथे बारा टायर मालवाहू ट्रकसह मिळून आला. दरम्यान त्याला ताब्यात घेवून सखोल चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. तसेच त्याच्या सोबत मित्र अजीज रा. नांदेड याच्या सांगण्यावरून बोदेगाव येथील गोडाऊनमधून गॅस सिलेंडर चोरी करुन ते ट्रकमध्ये भरुन चोरीचे गॅस सिलेंडर हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस येथील दत्ता करपे याच्या शेतात उतरवल्याची कबुली दिली. यावरुन पथकाने मोहसीन यांच्यासह डिग्रस येथे पोहचून दत्ता करपे याच्या शेतात जावून दत्ता करपे याला ताब्यात घेतले.

त्याचबरोबर त्याच्या शेतातून १२० रिकामे गॅस सिलेंडर, गुन्ह्यात वापरलेला ट्रक असा एकूण २७ लाख६४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणातील मुख्य सुत्रधार दोघे अद्याप फरार असून त्यांचा देखील शोध पोलिस घेत आहेत. ही कारवाई एलसीबी प्रमुख पोलिस निरीक्षक ज्ञानोबा देवकते, पोलिस निरीक्षक विलास कुलकर्णी, सहायक पोलिस निरीक्षक विजय महाले, पोलिस उपनिरीक्षक शिवशंकर कायंदे, पोलिस अंमलदार बबलु चव्हाण, सोहेल मिर्झा, किशोर झेंडेकर, मिथुन जाधव, अमित झेंडेकर, जितेंद्र चौधरी, महेंद्र भुते, अमोल सारोख, युवराज चव्हाण यांनी पोलिसांनी कारवाई करत दोन आरोपींना अटक केली.

# वाघ नखे जप्तीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांवर ग्रामस्थांचा हल्ला



■ महासागर प्रतिनिधी,

**अकोट , दि. १०:** आदिवासी बहुल बल्लारखेड गावात वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या कारवाईच्या पद्धतीवरून ग्रामस्थांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे ८ डिसेंबर रोजी घडलेल्या घटनेवरून दिसून येत आहे. रात्री आरोपीच्या शोधत आलेल्या वन विभागाच्या एका वाहनावर संतप्त जमावाने दगडफेक करून वाहनांच्या काचा फोडल्या होत्या. परिणामी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना पळ काढावा लागला. या घटनेनंतर अकोट ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहनावर दगडफेक करणाऱ्यांविरोधात कारवाई केली आहे. जेमतेम ३०० लोकसंख्या असलेले बल्लारखेड हे कोरकू आदिवासी बहुल गाव अकोट शहरापासून २० किलो मीटर अंतरावर आहे. हे गाव चर्चेत आले ते येथून जवळच असलेल्या १०३२ क्रमांकाच्या वन खंडातील वस्तापूर नियत क्षेत्रातील रात्री नव्हे, दिवसा कारवाई करा संपूर्ण गाव दहशतीत आहे. वन विभागाचे अधिकारी कधीही कोणालाही केव्हाही ताब्यात घेऊन जातील, हे सांगता येत नाही. ही कारवाई दिवसा करा, एवढीच आमची मागणी आहे.रात्री दहशत निर्माण करू नये.

**-कृष्णा बेलसरे, उपसरपंच, बल्लारखेड.**

# दिव्यांग रोहनला शिक्षणासाठी मित्रांची मदत

## मलकापूरच्या चांडक विद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना

■ महासागर प्रतिनिधी,

**मलकापूर, दि. १०:** एखाद्याने मनाशी खूणगाठ बांधली तर नियतीला ही त्याच्या पूढे झुकावे लागते, असं म्हटले जाते. इच्छाशक्तीच्या जोरावर अपंगत्वावर मात करून शिकण्याची व काही करून दाखवण्याची धडपड येथील लि.भो.चांडक विद्यालयात इयत्ता १० वीत शिकणाऱ्या रोहन या विद्यार्थ्यांमध्ये दिसून आली आहे. असे म्हणतात की, तुमचा उद्देश प्रामाणिक असला तर देवाच्या कृपेने असंख्य हात मदतीला धावून येतात अगदी त्याच धर्तीवर त्याचे सहकारी प्रत्येकवेळी पुढे येत आहेत. त्यामुळे माणूसकी अधोरेखित होते.



एखाद्या चित्रपटातील काल्पनिक कथानक वाटावे, असे वास्तव शहरातील चांडक विद्यालयात नित्यनियमाने एका दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वर्गातील विद्यार्थ्यांची सहकार्याची धडपड करत असल्याचे दिसून येते. इयत्ता दहावीमध्ये शिकणारा रोहन शिवाजीराव पाटील हा विद्यार्थी दोन्हीही पायांनी बालपणापासूनच अपंग आहे. त्याला सहजरित्या चालणे, उभे राहणे, किंवा बसणे सुद्धा शक्य नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीमधून आपणही शिकावं व काहीतरी करून दाखवावे अशी प्रचंड इच्छाशक्ती मनात धरून तो शाळा शिकत आहे. मात्र दैनंदिन नित्य कर्म करणे त्याचबरोबर चालणे, बसणे शक्य नसल्याने अशा परिस्थितीत त्याच्या वर्गातील सर्वच वर्ग मित्र त्याला सहकार्य करतात. एवढेच नव्हे तर ज्यावेळी त्याला जेवायला घरी जायचे असते किंवा नैसर्गिक विधी पार पाडायचा असतो, त्यावेळी सुद्धा त्याचे वर्गमित्र व्हील चेअरच्या साह्याने त्याला घरापर्यंत नेतात व घरून परत शाळेपर्यंत आणतात. यासाठी त्यांना कुठलाच आळस वाटत नाही. उलट ते हिरिरीने त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य करतात. रोहनचे वडील शेतकरी तसेच घरची परिस्थिती जेमतेम असून आई घरकाम करते. त्यात आपला मुलगा सुद्धा शिकवा आणि काही तरी व्हावा, अशी अपेक्षा दोघांची.

त्यात रोहन हा अभ्यासात सुद्धा हुशार असल्याची माहिती वर्गशिक्षक मिलिंद काळे यांच्याकडून मिळाली. प्रतिकूल परिस्थिती असताना सुद्धा रोहन दैनंदिन अभ्यास करतो.

सामान्य असणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणे च तो वावरतो.

अशी प्रतिक्रिया वर्ग शिक्षकांनी दिली. ऑटोमॅटिक स्वयंचलित व्हीलचेअर असण्यासाठी वयोमर्यादेची अट असल्याने त्याच्याकडे साध्या प्रकारची व्हीलचेअर आहे. त्यामुळे त्याला इतरांची मदत घ्यावी लागते. अशा गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन अशा दिव्यांगांच्या गरजा पूर्ण करायला हव्या अशा अपेक्षा सुद्धा या निमित्ताने उपस्थित होत आहेत.

# शॉक लागून शेतकऱ्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,

**बाभूळगाव, दि. १०:** बाभूळगाव तालुक्यातील गोंधळी येथील रहिवाशी असलेले शेतकरी शंकर लक्ष्मण राऊत (वय५५ ) वर्ष यांना शेतातील तार कुंपणात सोडलेल्या विद्युत प्रवाहाचा शॉक लागल्याने जागीच मृत्यू झाला. ही घटना रविवारी सकाळी ४ वाजताच्या सुमारास वडगाव शेत शिवारात घडली.



शेतकऱ्याने तूर पिकाचे वन्य प्राण्यांपासून संरक्षण व्हावे, यासाठी शेतात तार कुंपण टाकून त्यात वीज प्रवाह सोडला होता. दरम्यान शेतकरी आज नेहमीप्रमाणे शेतात पिकाची पाहणी करण्यासाठी गेला होता. सकाळी शेतात धुके मोठ्या प्रमाणात असल्याने शेतकऱ्याला जिवंत विद्युत तार न दिसल्याने जिवंत वीज ताराचा स्पर्श डोक्याला झाला.

याचा जोरदार झटका बसून शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला.

त्याच वेळी शेजारील शेतात शंकर पटाची तयारी करीत असलेल्या नागरिकांना काही वेळानंतर शेतकरी मृत अवस्थेत आढळून आला.

# मध निर्मितीतून अंधारवाडीला मिळाला प्रकाश





## आदिवासी गाव झाले मधाचे गाव

■ महासागर प्रतिनिधी,

**अंधारवाडी, दि. १० :** शासनाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या मधाचे गाव ही योजना टिपेश्वर अभयारण्याच्या सीमेवर असलेल्या एका छोट्याशा गावामध्ये राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत होणाऱ्या मध निर्मितीच्या माध्यमातून अंधावरवाडी नाव असलेल्या या आदिवासी गावला जणू उजेडाचा मार्गच गवसला असल्याचे दिसत आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा येथील प्रकल्प अधिकारी सुहास गाडे यांच्या संकल्पनेतून हे संपूर्ण गावच मधाचे गाव करण्यात आले आहे.

शासनाच्यावतीने आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध प्रकारच्या योजना राबवल्या जातात. या समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा यामागचा उद्देश आहे. त्यातच शासनाच्या वतीने मधाचे गाव ही योजना सुरु करण्यात आली आहे. आदिवासी समाज जंगालांवर प्रेम करणारा रानावनात राहणारा समाज आहे.

मध संकलनाचे प्रशिक्षण देऊन त्यांना या व्यवसायातून आर्थिक समृध्दीकडे नेता येऊ शकते, या उद्देशाने पांढरकवडाचे प्रकल्प अधिकारी सुहास गाडे यांनी खादी व ग्रामोद्योग विभागाच्या सहकार्याने अंधारवाडी मधाचे गाव करण्याचा संकल्प केला आणि तो संकल्प आता पुर्णत्वास आला आहे. अंधारवाडी गावाची लोकसंख्या असून गावात एकून ६५ कुटुंब आहे. आदिवासी उपयोजनेंतर्गत नाविन्यपुर्ण योजनेद्वारे मधाचे गाव ही योजना या ठिकाणी राबविण्यात आली.

# स्पेक्ट्रम फाउंडेशनद्वारे जागतिक मृदा दिवस



■ महासागर प्रतिनिधी,

**बाभुळगाव, दि. १० :** तालुक्यातील येरणगाव येथील बबनराव वानखेडे यांचे रिजेनरेटिव अ‍ॅग्रीकल्चर प्लांटवर दि. ५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन स्पेक्ट्रम फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्य निर्मला झोड, स्पेक्ट्रम फाउंडेशनचे पी.यू. व्यवस्थापक नरेश बाजरे मंचकावर उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर प्रास्ताविकातून नरेश बाजरे यांनी उत्तम मार्गदर्शन केले. यात शेतकऱ्यांना जीवनासाठी माती अत्यावश्यक का आहे व ती आपल्याला अन्न, वस्त्र, निवारा आणि औषधी यासह जीवनाच्या चार प्रमुख साधनाचा स्त्रोत असल्यामुळे मातीचे संवर्धन ही काळाची गरज आहे, शिवाय माती ही वेगवेगळ्या प्रमाणात खनिज, सेंद्रिय पदार्थ आणि हवा यांनी बनलेले असते. जीवनासाठी ते अत्यंत महत्त्वाचे आहे. माती प्रदूषण थांबवण्यासाठी प्लास्टिकचा वापर टाळावा, बायोचारचा वापर व कार्यक्रम स्थळावर असलेले रीजेनरेटिव अग्रिकल्चर डेमो प्लॉटचे वैशिष्ट्ये आदी माहिती दिली. तसेच कार्यक्रमा दरम्यान शेतकरी बबनराव वानखडे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रक्षेत्र अधिकारी लक्ष्मण येडस्कार यांनी केले. या कार्यक्रमाकरिता स्पेक्ट्रम फाउंडेशनचे प्रक्षेत्र अधिकारी शुभम डफळे, वैभव मेघळ, हितेश भोयर, नागसेन सुटे, आनंद मांढरे, संदीप जगताप, वैभव इजपाडे, अंकुश न्हाने, कृषी सखी प्रियांका होटे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# सोनचिखल्याचे ३ दिवसांत ४८०० किमी उड्डाण



**अमरावती, दि. १० :** हिवाळ्यात हजारो किलोमीटर अंतर पार करून उत्तर गोलार्धातील विविध देशांमधील स्थलांतरित पक्षी दक्षिण गोलार्धाकडे जाताना सेंट्रल एशियन फ्लाय-वेईस्ट एशियन ऑस्ट्रेलियन फ्लाय-वेएशियन ईस्ट आफ्रिकन फ्लाय-वेया तीन हवाई मार्गाने भारतात दाखल होतात आणि विसावतात. जैवविविधतेने परिपूर्ण पश्चिम विदर्भातील सर्वात मोठ्या अप्पर वर्धा धरणावर दरवर्षी हिवाळ्यात विविध प्रजातीचे पक्षी मोठ्या संख्येने स्थलांतर करून येतात. यात सोनचिखल्या हा पक्षी वैशिष्ट्यपूर्ण आहे. तो तीन ते चार दिवसांत ४ हजार ८०० किमी.चे न थांबता एकच उड्डाण भरून अलास्कावरून हवाई बेटांवर पोहोचतो, अशी माहिती पक्षी तज्ज्ञांनी दिली आहे. बदक व हंस प्रवर्गातील पाणपक्षी मोठ्या संख्येत जिल्ह्यातील विविध जलाशयांवर आले. उत्तरेतील कडाक्याच्या थंडीपासून बचावासोबतच अन्नासाठी स्थलांतरित पक्षी युरोप, आशिया, सायबेरिया, कजाकिस्तान, मंगोलिया आणि रशिया या भागातून स्थलांतर करून अप्पर वर्धा जलाशयासह जिल्ह्यातील५७ तलावांवर येतात. यात नॉर्दन शॉव्हेलर (थापट्या), स्पून बिल (चमचाबाज), नॉर्दन पिंटेल (तलवार बदक), रूडी शेल्डक (चक्रवाक), युरेशियन कुट (वारकरी), कॉमन टिल (चक्रांग बदक), गडवाल (मलीन बदक), गार्गीनी (भुवई बदक), युरेशियन व्हिजन (तरंग बदक), रेड क्रेस्टेड पोचर्ड (लालसरी) आदी बदक प्रजातीचे पक्षी स्थलांतर करून येतात. तसेच हंस प्रजातीमधील बार हेडेड गुज (पट्टकादंब), ग्रेलॅग गुज (कलहंस) तसेच या भागासाठी दुर्मिळ असलेला व्हाईट फ्रंटेड गुज (पांढऱ्या माथ्याचा कलहंस) स्थलांतर करून येतो.


## कार्यालय नगरपरिषद वानाडोंगरी
ता. हिंगणा, जि. नागपुर

Email:mcwanadongari2016@gmail.com

जावक क्र./नपवा/स्व./पा.पु.वि./३१८७/२०२४ दिनांक : १०/१२/२०२४

### निविदा सुचना

मुख्याधिकारी नगर परिषद वानाडोंगरी येथे खालील विवरणाच्या निविदा द्वी लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर निविदा करिता अधिकृत पुरवठाधारका / अनुभवी एजेन्सीकडून खाली नमूद कामासाठी निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अनामत रक्कम | निविदा किंमत | सादर करावयाचे दर | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | सन २०२४-२५ या वर्षात नगर परिषद हद्दीतील वॉटर ए.टी.एम देखभाल दुरुस्ती करणे. | २०००/- | २००/- | पुरवठा धारकाने सर्व करासहित दर सादर करावे. | १२ महिने |

ई-निविदा प्रसिद्धीचा तपशील

| | |
|---|---|
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक | दिनांक ११/१२/२०२४ ला सकाळी १०.०० वाजता पासून |
| निविदा प्रपत्र विक्रीचा दिनांक व वेळ | दिनांक ११/१२/२०२४ ते १८/१२/२०२४ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक १८/१२/२०२४ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २०/१२/२०२४ ला दुपारी १२.०० वाजता किवा नगर परिषदेच्या सोईनुसार |

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, वानाडोंगरी**


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# जोश

**शेर की जुबानी**

* तसल्ली से पढे होते... तो समझ
में आते हम,
जरूर कुछ पन्ने,
बिना पढे ही पलट दिए होंगे।

गुस्से में कुछ और भी
हसीन लगते हो,
बस यही सोच कर
तुमको खफा रखा है।

ख्वाहिशों का आदी दिल काश
ये समझ सकता,
कि सांस टूट जाती है, एक आस
टूट जाने से।

**स्मार्ट टिप्स**

## अकाउंट हॅक झालंय?

सध्या अकाउंट हॅक होण्याचं प्रमाण बरंच वाढलं आहे. फेसबुक, इन्स्टाग्रामसारखी सोशल नेटवर्किंग ॲप्स हॅक होऊ शकतात. म्हणूनच आपण काळजी घ्यायला हवी. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी इन्स्टाग्रामची मूळ कंपनी मेटाने नवं व्यासपीठ सादर केलं असून यामुळे युजर्सना हॅक झालेली खाती परत मिळवता येणं शक्य होणार आहे. इन्स्टाग्रामवर युजर्स बनावट क्रिप्टोकरंसी रिटर्न्सच्या माध्यमातून युजर्सना लुभावण्याचं काम करतात आणि त्याद्वारे त्यांच्या खात्यावर ताबा मिळवतात. इन्स्टाग्राम डॉट कॉम/ हॅक्ड नावाचं हे व्यासपीठ असून त्यावर खातं हॅक झाल्याची तक्रार नोंदवता येऊ शकते. या नव्या व्यासपीठावर खात्याच्या सुरक्षेसंबंधीची सगळी टूल्स उपलब्ध असून या माध्यमातून युजर्सची खाती सुरक्षित ठेवणं शक्य होणार आहे.

**सोशल मीडिया**

## रेकॉर्ड करा व्हॉट्स ॲप कॉल




आपल्याला व्हॉट्स ॲपवरील कॉल रेकॉर्ड करण्याची गरज भासते. पण हा कॉल कसा रेकॉर्ड करायचा हे कळत नाही. पण व्हॉट्स ॲप कॉलही रेकॉर्ड होऊ शकतो. यासाठी क्यूब कॉल रेकॉर्डर हे ॲप डाउनलोड करा. यानंतर व्हॉट्स ॲप कॉल करा. कॉल सुरू झाल्यानंतर हे ॲप बॅकग्राउंडमध्ये कॉल रेकॉर्डिंग सुरू करेल. कॉल बंद झाल्यानंतर रेकॉर्डिंगही बंद होईल. रेकॉर्ड झालेला कॉल ॲपच्या नोटिफिकेशन बारमध्ये दिसेल. अशा पद्धतीने तुम्ही कामासाठी व्हॉट्स ॲप कॉल करून तो रेकॉर्ड करू शकता.

**गॅझेट वर्ल्ड**

## पाणी कमी पिताय?



सध्या विविध प्रकारची गॅझेट्स लोकप्रिय झाली आहेत. काही गॅझेट्स ॲप्सच्या मदतीने तुमच्या आरोग्याची काळजी घेतात. तर असंच एक गॅझेट म्हणजे हायट्रेस स्पार्क २. ही एक बाटली आहे. पाणी पिण्याचं महत्त्व तर आपण जाणतोच. ही बाटली ॲपशी कनेक्ट होऊ शकते आणि तुम्ही दिवसभरात किती पाणी प्यायलात याचा हिशेबही ठेवते. म्हणूनच ही बाटली तुमच्याकडे असायला हवी.

**सोशल अवेअरनेस**

## फोन स्वच्छ करताय?



आपल्या स्मार्टफोनच्या स्क्रीनवर अनेक रोगजंतू असू शकतात. कोरोनाकाळानंतर अनेक जण सॅनिटायझरने फोनचा स्क्रीन स्वच्छ करतात. मात्र अशा पद्धतीने फोनचा स्क्रीन स्वच्छ करताना काळजी घ्यायला हवी. अन्यथा तुमचा फोन खराबही होऊ शकतो. स्मार्टफोना स्क्रीन अत्यंत नाजूक अशा घटकांपासून तयार करण्यात आलेला असल्यामुळे अल्कोहोलयुक्त सॅनिटायझरमुळे त्यावरील कोटींग निघू शकतं. याच कोटींगमुळे फोनच्या स्क्रीनचा पाणी तसंच तेलापासून बचाव होता. यासोबतच स्मार्टफोनच्या जॅक्सनाही द्रव पदार्थांनी स्वच्छ करू नये. द्रवामुळे हे जॅक खराब होऊ शकतात.

# थंडीतही सुरू ठेवा व्यायाम

**फिटनेस**



हुडहुडी भरवणाऱ्या थंडीत सकाळी उठून व्यायाम करणं जीवावर येतं. अंगावरचं पांघरून बाजूला करावंसं वाटत नाही. पण तासभर झोपण्यासाठी आपण आपल्या आरोग्याकडे, फिटनेसकडे दुर्लक्ष करतो. एखाद्या दिवशी झोपणं ठीक आहे. पण दररोजचा आळस उपयोगाचा नाही. थंडीच्या दिवसातही स्वत:ला व्यायामासाठी कसं सज्ज करता येईल याबाबतच्या काही टिप्स...

1. थंडीत घराबाहेर पडायचं नसेल तर घरीच व्यायाम करा. योगा, जॉगिंग, डान्स असं काहीही करता येईल. घरच्या घरी करण्यासारखे साधेसोपे व्यायामप्रकार आहेत. हे व्यायाम करून तुम्ही फिट राहू शकता.
2. दररोज एकाच प्रकारचा व्यायाम करून कंटाळा येतो. मग व्यायाम टाळला जातो. व्यायाम एकसुरी होत असेल तर डान्स, जीम, योगा, धावणं असं वैविध्य आणण्याचा प्रयत्न करा. यामुळे तुम्हाला दररोज व्यायाम करावासा वाटेल.
3. व्यायाम करण्यामागची कारणं टिपून ठेवा. काही जण वजन कमी करण्यासाठी किंवा फिटनेससाठी व्यायाम करतात. आपल्याला व्यायामाची गरज का आहे, त्यामागचा आपला उद्देश काय हे लिहून ठेवलं की तुम्हाला व्यायामाची प्रेरणा मिळेल.
4. व्यायामासाठी एखादा जोडीदार सोबत घ्या. फिटनेसची आवड असणाऱ्या मित्राची किंवा मैत्रिणीची निवड करा. ही मंडळी तुम्हाला व्यायामाची प्रेरणा देतील.

# विक्री हस्तकलेच्या वस्तूंची

**स्वयंरोजगार**

सध्या हस्तकलेच्या वस्तूंना बरीच मागणी आहे. गृह सजावटीच्या या वस्तू अनेकांना आकर्षित करतात. तुमच्या अंगी अशा वस्तू बनवण्याची कला असेल किंवा हस्तकलेच्या वस्तूंच्या विक्रीचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्हाला चांगली संधी मिळू शकते. या वस्तू वेबसाईट्सच्या माध्यमातून विकल्या जातात. यासाठी स्वत:ची वेबसाईट तयार करता येईल किंवा ई कॉमर्स वेबसाईट्सवरून या वस्तूंची विक्री करता येईल. हस्तकलेच्या अनोख्या किंवा ॲंटिक वस्तू विकण्याचा व्यवसाय करायच्या विचारात असाल तर या टिप्स उपयोगी पडतील.



- आपल्याकडच्या वस्तू वेगळ्या किंवा ॲंटिक असतील याची खात्री करून मगच त्या विक्रीसाठी उपलब्ध करा. लोकांना काहीतरी वेगळं, हटके हवं असतं. त्यामुळे अशाच वस्तू विका. तसंच झोकून देऊन काम करा.
- आपल्याकडच्या उत्पादनांचे प्रभावी फोटो पोस्ट करा. तसंच या उत्पादनांची माहिती अनोख्या पद्धतीने मांडा.
- सुरूवातीला ठराविक उत्पादनांचीच विक्री करा. वस्तूंची संख्या हळूहळू वाढवा. हस्तकलेच्या वस्तूंचा दर्जा टिकवून ठेवणं गरजेचं आहे. उत्तम आणि दर्जेदार वस्तूंची विक्री केली तरच तुम्ही ग्राहकांना जोडून घेऊ शकता.

# टेस्टी कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, एखाद्या संध्याकाळी चटपटीत पण वेगळा पदार्थ खावासा वाटला तर कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स ही डिश बनवून बघा.

*साहित्य : दोन बटाटे, एक लाल सिमला मिरची, आल्याचा छोटा तुकडा, थोडी कोथिंबिर, एक चमचा ऑलिव्ह ऑईल, अर्धा चमचा जीरं, हिंग, मीठ, पाव चमचा हळद, एक चमचा धने, एक चमचा बडिशेप, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा आमचूर पावडर, अर्धा चमचा गरम मसाला.*

**कृती :** बटाटे सोलून लांब काप करून घ्या. लाल सिमला मिरचीचीही लांब कापून घ्या. आल्याचे छोटे तुकडे करा. एका कढईत ऑलिव्ह ऑईल गरम करून त्यात जीरं घाला. मग हिंग आणि हळद घाला. आल्याचे तुकडे घालून परता. धने आणि बडिशेप कुटून घ्या. आता यात बटाटा आणि सिमला मिरचीचे काप घाला. थोडे शिजू द्या. मग सगळे मसाले आणि मीठ घाला. परतून घ्या. शिजल्यावर वरून कोथिंबिर घाला. मस्तपैकी कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स खा.



इस्रोसारख्या संघटना अंतराळात यशस्वी झेप घेत आहेत. आज आपल्याला युवा अंतराळवीरांची गरज आहे. हे अंतराळवीर पुढे भारताचं भविष्य ठरू शकतात. रात्रीच्या निरभ्र आकाशात असंख्य तारे-तारका दिसत असतात. अनेकांना आकाश निरिक्षण करायला आवडतं. यात लहानग्यांची संख्या बरीच जास्त आहे. मात्र ही संधी प्रत्येकाला मिळतेच असं नाही. म्हणूनच अवघ्या २१ वर्षांचा आर्यन मिश्रा अंतराळविषयक प्रयोगशाळा उभारण्यासाठी प्रयत्नशील आहे.



# खगोलशास्त्राच्या प्रेमापोटी

**अचिव्हर**



आर्यन मिश्रा... अवघ्या २१ वर्षांचा तरुण. आर्यनला भारतभरात ५०० अंतराळविषयक प्रयोगशाळा उभारायच्या आहेत. आर्यनचे वडील पेपर विक्रेता. अशाच एका रात्री आर्यन कुटुंबासोबत गच्चीवर झोपायला आला. ते उन्हाळ्याचे दिवस होते. अवघ्या सात वर्षांच्या आर्यनला आकाशात असंख्य तारे पहायला मिळाले. तो अक्षरश: हरखून गेला. हे तारे मुठीत घ्यावे असं त्याच्या मनात आलं. या आवडीचं रुपांतर छंदात झालं. आकाश निरिक्षणाच्या छंदाने आर्यनला झपाटून टाकलं. इथूनच त्याच्या प्रवासाला सुरूवात झाली. सातवीत असताना त्याला टेलिस्कोपची माहिती मिळाली. टेलिस्कोपमधून आकाश निरिक्षण करणं हा अनोखा अनुभव असतो हे त्याच्या लक्षात आलं. मग त्याने घरच्यांकडे टेलिस्कोपची मागणी केली.

टेलिस्कोप घेऊन देणं आर्यनच्या वडीलांसाठी बरंच खर्चिक होतं. घरच्यांनी समजवायचा प्रयत्न केला. पण आर्यनला आकाश निरिक्षणाच्या वेडाने पछाडून टाकलं. टेलिस्कोपसाठी त्यानेच पैसे जमवायला सुरूवात केली. आर्यन शाळेत चालत जावू लागला. एकवेळचं जेवणही कमी केलं. त्याच्याकडे पाच हजार रुपये साठले, छानशी टेलिस्कोप आर्यनच्या घरात आली. आर्यन फिजिक्स शिकतो आहे. यासोबत अंतराळविषयक प्रयोगशाळेच्या माध्यमातून तो मुलांना अनोख्या सुविधाही उपलब्ध करून देत आहे. त्याच्या प्रयत्नांमुळे अंतराळच शाळेच्या वर्गात अवतरू लागलं आहे.

२०१९ मध्ये त्याने या उपक्रमाला सुरूवात केली. गुजरात, पंजाब, दिल्ली आणि हरयाणा इथल्या पाच शाळांमध्ये आर्यनने आपली प्रयोगशाळा स्थापन केली. यामुळे इथल्या मुलांना अंतराळ संशोधनाची गोडी लागली. या उपक्रमाची दखल केंद्र सरकारनेही घेतली. केंद्रीय विद्यालयांमध्ये या प्रयोगशाळा स्थापन करता येतील का, याबाबत सरकारी अधिकाऱ्यांनी त्याच्याशी चर्चा केली. सूर्यमाला, ग्रह, तारे यांचे काही फोटो पुस्तकात असले तरी मुलांना प्रत्यक्ष अनुभूती घेता आली नव्हती. हीच परिस्थिती बदलावी, असं आर्यनला वाटतं. प्रयोगशाळांच्या माध्यमातून तो नवे खगोल शास्त्रज्ञ घडवतो आहे. त्याला ५०० प्रयोगशाळा सुरू करायच्या आहेत. त्याच्या प्रयत्नांमुळे देशाला नवे खगोल शास्त्रज्ञ मिळतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

# प्रेम का उच्चशिक्षण?

**मॅच मेकिंग**



माझं एका मुलीवर प्रेम होतं. आमचं तीन वर्षांचं नातं संपलं. पण तिच्याशिवाय मला करमत नव्हतं. मन रमत नव्हतं. तिची खूप आठवण यायची. म्हणून हे नातं पुन्हा जोडण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तिला संपर्क करत राहिलो. पण तिने. प्रतिसाद दिला नाही. तिच्या बहिणीची मदत घ्यायचं ठरवलं. पण या आघाडीवरही निराशाच हाती आली. मैत्रिणीच्या बहिणीने माझा अपमान केला आणि तिच्या आयुष्यातून निघून जायला सांगितलं. या मुलीकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. माझे वडील आजारी असतानाही तिने संपर्क केला नाही. पण तिच्यावर खूप प्रेम असल्यामुळे हा दुरावा सहन होत नाही. जर्मनीत एमबीएची संधी चालून आली आहे. पण मधल्या काळात या मुलीचं लग्न होऊ शकतं. मग तिला कायमचं गमावून बसेन. काय करू?

उत्तर : मित्रा, तीन वर्षं जपलेलं नातं संपवून नव्याने आयुष्य सुरू करणं खूप कठीण आहे. पण आयुष्यात काही कठोर निर्णय घ्यावेच लागतात. स्वत:च्या भवितव्याचा विचार करावा लागतो. जर्मनीत एमबीए करण्याची संधी सगळ्यांना मिळत नाही. त्यामुळे ही संधी सोडू नकोस. शिक्षणामुळे तुझं भवितव्य घडणार आहे. त्यातच या मुलीकडून तुला कोणताही प्रतिसाद मिळत नसताना तिच्यासाठी आयुष्यभराची संधी सोडण्यात अर्थ नाही. एखाद्या व्यक्तीसोबत आयुष्य घालवणं यालाच प्रेम म्हणत नाहीत. प्रेम ही भावना खूप उदात्त आहे. प्रिय व्यक्तीच्या आनंदात आनंद मानणं हे सुद्धा प्रेमच आहे. त्यामुळे जर्मनीला जाण्याचा निर्णय घे. हेच तुझ्यासाठी योग्य आहे. योग्य वेळी योग्य व्यक्ती तुझ्या आयुष्यात येईल.

# निवड पर्यावरणपूरक कपड्यांची

**फॅशन पॅशन**



वस्त्रोद्योगामुळे बरंच प्रदूषण होतं. पर्यावरणाची हानी होते. आता आपल्या कपाटातली एक जीन्स तयार करण्यासाठी काही लीटर पाणी वापरलं जातं. जीनचं कापड धुण्यासाठी १० ते १५ लीटर पाणी लागतं. जीनची पॅंट किंवा जॅकेट तयार करण्याच्या प्रक्रियेत जवळपास पाच हजार लीटर पाण्याचा वापर होतो. वस्त्रोद्योग पर्यावरणपूरक व्हावा, यासाठी प्रयत्न होत असले तरी ते अपुरेच आहेत. म्हणूनच ग्राहकांनीही थोडे प्रयत्न करायला हवेत. आपलं कपड्यांचं कपाट पर्यावरणपूरक असावं, यासाठी काय करता येईल हे जाणून घेऊ.

- तुमच्याकडे कपड्यांच्या जास्त जोड्या असायला हव्यात. त्यातही जीन्सची संख्या अधिक असणं गरजेचं आहे. वर्षभरात तीन ते चार जोड्या कपडे वापरण्याऐवजी आठ ते नऊ जोड्या खरेदी करा. त्यातही जीन्स अधिक प्रमाणात खरेदी करा. जास्त कपडे अधिक काळ टिकतात. तसंच कमी वेळा धुतले जातात. शिवाय धुतलेले कपडे पुन्हा धुण्याआधी दोनदा वापरता आले तर उत्तम.
- जीन्स वारंवार धुवू नका. जीन्स नऊ ते दहा आठवडे न धुता वापरता येईल. वापरलेली जीन्स काही काळ उन्हात ठेवा. यामुळे जीन्सला वास येणार नाही.
- जीन्सची नीट देखभाल करावी लागते. जीन्स उसवली असेल तर ती लगेच शिवून घ्यायला हवी. एखाद्या चांगल्या बुटिकमध्ये जाऊन जीन्सची डागडुजी करता येईल. यामुळे तुमची जीन्स बराच काळपर्यंत टिकून राहिल.
- रस्त्यावर स्वस्तात मिळणारे कपडे अजिबात विकत घेऊ नका. या कपड्यांचा दर्जा फार चांगला नसतो. त्यामुळे हे कपडे लवकर खराब होतात आणि कचऱ्याच्या डब्यात जातात. यामुळे कचऱ्यात भरच पडते.
- कपडा उत्पादक कंपन्या शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करतात. याबाबतची माहिती कपड्यावर लावण्यात आलेल्या लेबलवर लिहिलेली असते. त्यामुळे ही लेबल्स वाचून मगच कपडे खरेदी करा.



# सफर कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानाची

**थंडीच्या दिवसात भटकंती करणं हा धमाल अनुभव असतो. बोचरे वारे, हुडहुडी भरवणारी थंडी फिरण्याचा आनंद द्विगुणीत करतात. थंडीच्या दिवसात फिरण्यासाठी योग्य ठिकाणाच्या शोधात असाल तर कुद्रेमुखची निवड करा. तुंग, भद्रा आणि नेत्रावती या दक्षिण भारतातल्या प्रमुख नद्या. या नद्यांचं उगमस्थान कुद्रेमुखमध्ये आहे. कुद्रेमुखचं राष्ट्रीय उद्यान अनेक अर्थांनी अनोखं आहे. या परिसरात ट्रेकिंगही करता येतं. पावसाळ्यात आणि हिवाळ्यात इथे मस्त भटकंती करता येते.**

**भटकंती**

कुद्रेमुख म्हणजे घोड्यासारखं मुख. कुद्रेमुख परिसरातल्या डोंगररांगांमध्ये घोड्याचा तोंडाचा भास होत असल्यामुळे या भागाला कुद्रेमुख हे नाव पडलं. या डोंगरांमधल्या गुहेत देवी भगवतीचं मंदिरही आहे. कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानात वाघ, बिबट्या, हत्ती, हरणं, माकडं तसंच इतर काही प्रजातींचे प्राणी आणि पक्षी पहायला मिळतात. वन्यजीवनाच्या छायाचित्रणाची आवड असेल तर कुद्रेमुखसारखं उत्तम ठिकाण नाही. कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानाच्या आसपासच्या गावांमध्ये होम स्टेची सुविधा आहे. या होम स्टे दरम्यान तुम्ही इथल्या स्थानिक संस्कृतीची ओळख करून घेऊ शकता.

इथे १८ किलोमीटरचा ट्रेक आहे. हा ट्रेक पूर्ण करून संध्याकाळी घरी येता येईल. होम स्टे दरम्यान अस्सल कानडी भोजनाचा आस्वादही घेता येईल. या दरम्यान तुम्ही गाईडही घेऊ शकता. बंगळूरू किंवा मंगळूरहून कुद्रेमुखला जाता येईल. मग कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानाला नक्की भेट द्या.



# लोकशाही वाचवण्याची लढाई - नाना पटोले

■ **वृत्तसंस्था, मारकडवाडी, दि. १० :**



मतांचा अधिकार संपुष्ट आणण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. मारकडवाडी गावातील गावक ?यांनी उठाव केला. तो उठाव पाहण्यासाठी मी येथे आलो असल्याचे ते म्हणाले. नाना पटोले यांनी मारकडवाडी गावात दाखल झाल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सरकार, पोलिस प्रशासन आणि निवडणूक आयोग यांच्यावर टीका केली.

भाजपच्या नेत्यांना सत्तेची गुरमी चढली असेल, तर तो त्यांचा प्रश्न आहे. मात्र, खऱ्या अर्थाने निवडणूक आयोगाची भूमिका संशयास्पद असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे. आम्ही जे आक्षेप घेतले, त्या आक्षेपाला उत्तर देण्याची मागणी त्यांनी केली. 76 लाख मते कशी वाढली? यावर आमचा आक्षेप आहे. मॉकपोलला निवडणूक आयोग आणि पोलिसांचा विरोध का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. मारकडवाडी ग्रामस्थांनी लोकशाही वाचवण्यासाठी भूमिका घेतली आहे. आता निवडणुका पुन्हा होणार नाही, मात्र लोकांची मते जाणून घेणे महत्त्वाचे असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे.

मारकडवाडीच्या भूमिकेकडे आता देशाचे लक्ष लागले असल्याचा दावा पटोले यांनी केला आहे. शेतकरी आंदोलनावर लाठीचार्ज केला जात आहे. तरुण आपला हक्क मागण्यासाठी जातात तर त्यांच्यावर देखील लाठीचार्ज केला जात आहे. ही हुकूमशाही आहे का? असा प्रश्न उपस्थित करीत निवडणूक आयोगाने ईव्हीएम मशीनवर निवडणुका न घेता बॅलेट पेपरवर निवडणूक घेणार असे आदेश काढावे, त्यानंतर राजीनामा द्यायला आम्ही देखील तयार असल्याचेही पटोले यांनी म्हटले आहे.

निवडणूक आयोग कोणाची कठपुतली झाली आहे, हे सर्वांना माहिती आहे. 76 लाख मत कशी वाढली याचा हिशोब निवडणूक आयोग का देत नाही? देशातील नागरिकांचे जे मत आहे, त्याचाच आवाज उठवण्याचा काम मारकडवाडी येथील लोकांनी केले आहे. ही लोकशाही वाचवण्याची लढाई आहे. या लढाईत सर्वांनी सामील व्हायला हवे, ही आमची भूमिका असल्याचे पटोले म्हणाले.

# संत्र्याचा कॅलिफोर्निया काटोल परिसराचा आंतरराष्ट्रीय पातळीवर लौकिक व्हावा

## आमदार चरणसिंग ठाकूर यांची अपेक्षा फळ पीक पाहणी व मार्गदर्शन चर्चासत्र

■ **महासागर प्रतिनिधी**
**अकोला / काटोल, दि. १० :**

पूर्वी संत्रा पिकाचे हब म्हणून काटोल परिसर आता कृषि विद्यापीठे आणि इतर संस्थांचे सहभागातून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा पुरस्कार करीत अधिक प्रगत होत केंद्र व राज्य शासनाकडून अपेक्षित आर्थिक पाठबळावर उभारी घेत आहे, भविष्यात संत्रा पिकाचा कॅलिफोर्निया म्हणून काटोल परिसराचा आंतरराष्ट्रीय पातळीवर लौकिक व्हावा असा आशावाद आमदार चरणसिंग ठाकूर यांनी केले.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल तथा कृषि विभाग महाराष्ट्र शासनद्वारा संयुक्तरित्या आयोजित फळ पीक पाहणी व मार्गदर्शन चर्चासत्र कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

यापूर्वसंगी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, वनराईचे अध्यक्ष गिरीश गांधी, भारतीय कृषी वैज्ञानिक भरती मंडळाचे अध्यक्ष डॉ. चारुदत्त मायी, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य मोरेश्वर वानखेडे, संत्रा फळगळ समितीचे सदस्य मनोज जवंजाळ, रमेश जिचकार, शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक नरेश आरसडे, विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, विसर शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, संचालक शिक्षण डॉ. शामसुंदर माने, अधिष्ठाता उद्यानविद्या डॉ. देवानंद




पंचभाई, नागपूर विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाडगे, जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे, उपविभागीय कृषी अधिकारी बी ए सातपुते, पंचायत समिती सभापती संजय डांगोरे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. विलास अतकरे, डॉ. प्रकाश कडू, डॉ. राजेंद्र काटकर, फळ शास्त्र विभाग प्रमुख डॉ. शशांक भराड, भाजीपाला शास्त्र विभाग प्रमुख डॉ. अरविंद सोनकांबळे, कृषी विभागाचे मिलिंद शेंडे, डॉ. अर्चना कडू, प्रादेशिक संशोधन केंद्र काटोलच्या प्रमुख डॉ. मेघा डहाळे प्रामुख्याने उपस्थित होते . सहकारी डॉ. हितेंद्र गोरमनगर, डॉ. सचिन पोतकीले, डॉ. युवराज खोब्रागडे, डॉ. एकता बागडे, मध्यवर्ती संशोधन केंद्र संचालक डॉ. वर्षा टापरे, बियाणे संशोधन अधिकारी डॉ. आम्रपाली आखरे, डॉ. सुचेता गुप्ता, डॉ. गोविंद जाधव, कुलगुरूंचे तांत्रिक सचिव डॉ. नितीन कोष्टी, विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर बिडवे, सेवानिवृत्त किटक शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप दवणे यांचे सह अकोला नागपूर कृषी विद्यापीठ तथा कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी आणि बहुसंख्येने संत्रा उत्पादक शेतकरी यांची सभागृहात उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शरद गडाख आपल्या भाषणात म्हणाले, देशांतर्गत फलोत्पादन क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान असून सकल कृषि मूल्यवर्धित उत्पादनामध्ये सुमारे ३३% योगदान आहे. फळे आणि भाजीपाला उत्पादनात चीन नंतर आपला देश जगात दुसऱ्या क्रमांकावर तर लिंबू उत्पादनात पहिल्या क्रमांकावर आहे. बदलती भारतीय जीवनशैली आणि आरोग्य जागरूकता यामुळे फलोत्पादनाखालील क्षेत्र झपाट्याने वाढ होतांना दिसून येत असून, लागवडीच्या केवळ १६% क्षेत्रातून कृषी जीडीपी मध्ये २४.५०% हातभार हा फळ पिकांचा आहे.

गेल्या दोन दशकांत फळपिकांचे क्षेत्र आणि उत्पादन १२.८ वरून २५.४ दशलक्ष इतके वाढले असून सन २०२३-२४ मध्ये फळ पिकांपासून ८१७८ कोटी रुपयाचे चलन भारताला प्राप्त झाल्याचे देखील डॉ. गडाख यांनी सांगत महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, पंजाब, राजस्थान, मेघालय, आसाम हे लिंबूवर्गीय फळपिके उत्पादन करणारे महत्वाचे राज्य असल्याचे ते म्हणाले.

विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य मोरेश्वर वानखेडे यांनी काटोल येथे शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय पुढील शैक्षणिक वर्षांपासून सुरु व्हावे तथा सिट्रस इस्टेट अंतर्गत काटोल परिसरात अत्याधुनिक संत्रा छाटणी यंत्र उपलब्ध करून द्यावे असे आवाहन केले.

डॉ. गिरीश गांधी यांनी शेतकऱ्यांच्या समस्या विस्तारित करीत आधुनिक शेती तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचविण्यात अकोला कृषि विद्यापीठ प्रयत्न करत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. विद्यापीठाचा फायदा घेत आर्थिक संपन्न शेती कृतीत आणण्यासाठी शासकीय मदत स्वरूपात घेत कुटुंबाने स्वमेहेनतीने शेती व्यवसायातून उन्नती साधावी, शेतकऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या भूमिकेत शेती विषयक चर्चासत्र प्रशिक्षण घेतले पाहिजे, विदर्भ विकासासाठी प्रत्येकाने पुढे यावे, असे आवाहन देखील त्यांनी केले.

डॉ. चारुदत्त मायी यांनी पश्चिम महाराष्ट्रातील द्राक्षशेतीची प्रगती आणि विदर्भातील संत्रा पिकाची खुंटलेला विकास, त्यांची कारणे आणि त्यावरील उपाययोजना अतिशय पोटतिडकीने विस्तारित करताना शेतकरी, शासन आणि विद्यापीठ यांच्या जबाबदाऱ्या अधोरेखित केल्या . इमारत, कर्मचारी आणि इतर सुविधासह शासकीय कृषि महाविद्यालय मंजूर व्हावेत असा आशावाद देखील व्यक्त केला.

याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, अधिष्ठाता उद्यानविद्या डॉ. देवानंद पंचभाई, शेतकरी प्रतिनिधी मनोज जवंजाळ, रमेश जिचकार आदींनी मनोगत व्यक्त केले. उपस्थित मान्यवर तथा शेतकरी बंधू-भगिनींनी शिवार फेरी करीत प्रादेशिक फळ संशोधन केंद्रातील विविध संशोधनात्मक उपलब्धतेचे अवलोकन केले. चर्चासत्र कार्यक्रमाचे संचालन श्रीमती भारती दवणे यांनी केले तर डॉ. योगेश धार्मिक यांनी आभार मानले. प्रादेशिक फळ संशोधन केंद्र एक दृष्टिक्षेप या पुस्तिकेचे तसेच दोन घडी पत्रिकांचे विमोचन करण्यात आले. संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे तथा अधिष्ठाता उद्यान विद्या डॉ. देवानंद पंचभाई यांचे मार्गदर्शनात प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोलच्या प्रमुख डॉ. मेघा डहाळे व त्यांचे सर्व सहकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यास परिश्रम घेतले.

# ...त्यांना पाकिस्तानात रवाना करा

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १० :**

जम्मू काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांच्या कन्या इल्तिजा मुफ्ती यांनी हिंदुत्व हा एक आजार आहे, असे वक्तव्य नुकतेच केले. या वक्तव्यामुळे इल्तिजा मुफ्ती चर्चेत आल्या आहेत. त्यांच्यावर टीकाही होते आहे.



आता भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी इल्तिजा मुफ्ती यांच्या वक्तव्याचा निषेध करतानाच आणखी एक वादग्रस्त केले आहे. ज्यांना जय श्रीरामच्या नाऱ्याचा त्रास होतो, ज्यांना हिंदुत्वाविषयी द्वेष आहे, त्यांना सरकारने पाकिस्तानात पाठवून द्यावे, असे नवनीत राणा यांनी म्हटले आहे.

हिदुस्तानात राहणाऱ्या सर्व हिंदूंना आता हिंदूइझम काय आहे, हे मेहबुबा मुफ्ती यांच्या मुलीकडून शिकावे लागणार आहे. मी केंद्र सरकारला देशातील सर्व हिंदू लोकांच्या वतीने हात जोडून विनंती करते की, ज्यांना जन्म या हिदुस्थानच्या भूमीवर झाला आहे हिंदू आणि हिंदूइझमपासून त्रास होत असेल, जय श्रीराम या नाऱ्याचा त्रास असेल, तर या सर्व लोकांना पाकिस्तानात पाठवावे. असे नवनित राणा म्हणाल्या.

# शंभर शकुनी मेल्यानंतर एक..

■ **वृत्तसंस्था**
**मारकडवाडी, दि. १० :**

भाजपचे नेते गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांच्या उपस्थितीमध्ये मारकडवाडी गावात सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत महाविकास आघाडीच्या वतीने फेक नरेटीव्ह पसरवण्यात येत असल्याचा आरोप भाजपने केला आहे.

शंभर शकुनी मेल्यानंतर एक शरद पवार जन्माला आले, अशा शब्दात गोपीचंद पडळकर यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली आहे. यावेळी पडळकर यांनी शरद पवार यांचा उल्लेख एकेरी भाषेत केला.

शरद पवारांनी मुद्दाम मारकडवाडी हे गाव आंदोलनासाठी निवडले असल्याचे पडळकर यांनी म्हटले आहे. या मतदारसंघांमध्ये शंभर गाव आहेत. मात्र, केवळ धनगर समाज लोकशाही मानत नाही, हे दाखवण्याचा प्रयत्न करण्यासाठीच शरद पवार यांनी हे गाव निवडले असल्याचे गोपिचंद पडळकर यांनी म्हटले आहे.

# चांदीच्या गणपतीला स्वेटर अन् शॉल



**नाशिक :** महाराष्ट्रात सध्या थंडी वाढत असल्याचे दिसत आहे. नाशिक येथे देखील चांगलाच गारठा वाढला आहे. थंडीपासून रक्षण करण्यासाठी येथील कारंजा परिसरातील चांदीच्या गणेश मूर्तीला स्वेटर आणि शाल परिधान करण्यात आले आहे. गोदावरी नदीकाठी अनेक मंदिरे आहेत. येथे येणाऱ्या भाविकांना जशी थंडी जाणवते तशीच येथील मंदिरातील देवांना सुद्धा थंडी जाणवते अशी भक्तांची भावना आहे.

## सामान्यातील असामान्य छोटा गणितज्ञ तक्षित




लोकमानस

वय वर्ष तीन हे खेळण्या बागडण्याचे वय. या वयात मुलं मज्जा, मस्ती करतात. परंतु, याच वयाचा चेन्नईतील एस तक्षिक मात्र गणित विषयात अतिशय हुशार असलेला मुलगा गणितातली ५० सूत्र अतिशय जलद गतीने पाठ करण्याचा जागतिक विक्रम करून सर्वांनाच थक्क करून सोडतो. खरोखर हे एक नवलच म्हणावं लागेल.

चेन्नई तामिळनाडू येथे २७ सप्टेंबर २०२३ रोजी एस तक्षित या अवघ्या ४ वर्षाच्या मुलाने ६ मिनिट आणि ३० सेकंदात गणिताची ५० सूत्र पाठ केली आणि वर्ल्डवाईड बुक ऑफ रेकॉर्डसाठी जागतिक विक्रम प्रस्थापित केला. तेज बुद्धीच्या आणि दृढनिश्चयी एस तक्षित याने अवघ्या ४ या वयात हा गणिताची किचकट सूत्र पाठ करून संपूर्ण जगाला थक्क केले आहे. तामिळनाडू मध्ये दोलायमान शहरात संपन्न झालेल्या या गणिताच्या स्पर्धेत एस तक्षित अतिशय आत्मविश्वासाने आणि दृढ निश्चयाने मंचावर आला.

या स्पर्धेचे परीक्षक आणि या स्पर्धेसाठी जमलेले इतर स्पर्धक आणि प्रेक्षक देखील या लहान स्पर्धकाला पाहून आश्चर्य चकित झाले. मात्र,जराही विचलित न होता छोट्या तक्षितने आपल्या अफाट स्मरणशक्तीच्या जोरावर एकामागोमाग एक अशी गणिताची ५० सूत्रे क्रमाने पाठ करण्यास सुरवात केली,आणि त्यानंतर तितक्याच वेगाने ही सूत्र सर्वांच्या साक्षीने म्हणून देखील दाखविली. गणितातील सूत्राचा प्रत्येक फॉर्मुला निर्दोषपणे सादर केल्याने एस तक्षितने समोरच्या प्रेक्षकांना देखील अचंबित करून सोडले.

एवढ्या कोवळ्या वयात जटिल गणिती संकल्पना आठवण्याची आणि स्पष्ट करण्याची त्याची क्षमता त्याच्या विलक्षण प्रतिभेचे दर्शन घडविणारीच होती. अवघ्या सहा मिनिटे आणि साठ सेकंदामध्ये एस तक्षित ने गणिती सूत्र तोंडपाठ म्हणण्याचा हा विक्रम वर्ल्डवाईड बुक ऑफ रेकाईसने देखील अपवादात्मक कामगिरी म्हणून तक्षितच्या नावावर नोंदविला. आपल्या वयाच्या सीमारेषा ओलांडत तक्षित ने जागतिक स्वरूपाचा हा विक्रम प्रस्थापित केला जो अवघ्या भारतीयांची मान जगभरात अभिमानानं उंचावणारा होता.

तक्षित गणितात प्रचंड हुशार असून भविष्यात त्याला गणितज्ञ बनून अवकाश विज्ञान क्षेत्रात आपले करिअर करायचे आहे अशी इच्छा तो व्यक्त करतो. एकूणच,एस तक्षित सारखा वयाने अतिशय लहान परंतु बुद्धिमत्तेच्या कसोटीवर अतिशय महान कामगिरी करणारा मुलगा हा भविष्यातील एक नामांकित गणितज्ञ म्हणून नावलौकिकास येणार यात शंका नाही. ■ ■ ■

## भटक्या कुत्र्यांना आवर कोण घालणार?

माझं मत

**महेंद्र जगताप (बँक कर्मचारी)**

भटक्या कुत्र्यांची समस्या हि दिवसेंदिवस वाढतेच आहे. या कुत्र्यांची मोठ्या प्रमाणात पैदास होत असल्याने या कुत्र्यांचा त्रास देखील वाढलेला आहे. खर तर अशा भटक्या कुत्र्यांना पकडून कोंडवाड्यात ठेवणे ही महापालिकेची किंवा स्थानिक प्रश्नासनाची जबाबदारी आहे. परंतु, या संस्थांच्या दुर्लक्षित पणामुळेच भटक्या कुत्र्यांची समस्या वाढतेय.

**मनोज शृंगारपुरे (वैद्यकीय कर्मचारी)**

अलीकडच्या काळात रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांचे प्रस्थ प्रचंड वाढलेले दिसतेय. हे भटके कुत्रे रानटी श्वापदाप्रमाणे प्रसंगी छोट्या मुलामुलींवर थेट हल्ला करतात. आणि अनेकदा अशा मुलांना रस्त्यावरच रक्तबंबाळ करून त्यांचा जीव घेतात. या कुत्र्यांची दहशत बंद करण्यासाठी मुळात या कुत्र्यांची पैदास रोखणं गरजेचं आहे आणि त्यासाठी अशा भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण आवश्यक आहे.

**शीतल म्हात्रे (गृहिणी)**

रस्त्यावरची भटकी कुत्री जणू जंगली कुत्रीच आहेत असं वाटत. ओळखीच्या किंवा अगदी अनोळखी माणसावर भुंकण्यापासून ते माणसांना पाठीमागून हलला करत चावा घेण्यापर्यंत या कुत्र्यांची मजल जाते. अशा कुत्र्यांना पकडून त्यांचा शासनाने स्वतंत्र बंदोबस्त करायला हवा.

**विद्या वाघेला (शिक्षिका)**

कुत्रा हा इमानदार प्राणी असला आणि तो पाळीव प्राणी जरी असला तरी रस्त्यावर भटकणारी कुत्री हि लोकांसाठी धोकादायकच आहेत. माणूस एकटा दिसला की हेच कुत्रे झुंडीने हलला करतात कधी चावे घेतात. अशा भटक्या कुत्र्यांसाठी शहरापासून दूर निर्मनुष्य परिसरात व्यवस्था होणं गरजेचं आहे. ■ ■

## दिल्ली कॉमिक कॉनमध्ये यामाहाची राइडिंग

चलती का नाम गाडी

इंडिया यामाहा मोटरने ६ ते ८ डिसेंबर २०२४ दरम्यान NSIC ग्राउंड्स, ओखला, नवी दिल्ली येथे आयोजित दिल्ली कॉमिक कॉनमध्ये चाहत्यांसाठी आणि राइडिंग उत्साहींना एक अविस्मरणीय अनुभव दिला. या कार्यक्रमाने हजारो उत्साही, प्रभावशाली, कॉमिक बुक प्रेमी, ॲनिमचे चाहते आणि मोटरसायकल प्रेमींना आकर्षित केले, जे पॉप कल्चर आणि ब्लू-थीम असलेल्या यामाहा एक्सपिरियन्स झोनचे हे मनमोहक मिश्रण एक्सप्लोर करण्यास उत्सुक आहेत.

यामाहा एक्सपीरियंस झोन हा महोत्सवाचा केंद्रबिंदू होता, ज्याने उपस्थितांना रोमांचित करणारे अनेक उपक्रम दिले. अभ्यागतांनी मोटोजीपी गेमिंग सेटअपचा आनंद लुटला, व्हर्च्युअल रेसिंगच्या ॲड्रेनालाईनमध्ये स्वतःला मग्न केले. सामुराई-थीम असलेले टळ-03 हे एक आवडते फोटो स्पॉट बनले, तर YZF-R15 ने रेसट्रॅकच्या कोप?यातील गदीर्चे अनुकरण करून, नाट्यमय झुकलेल्या कोनात पोझ देण्याचा अनोखा अनुभव दिला.




उत्साहात भर घालत, Ray ZR स्ट्रीट रॅलीमध्ये झटपट फोटो-सामायिकरण वैशिष्ट्यीकृत केले गेले, ज्यामुळे चाहते त्यांच्या प्रिय आठवणी कॅप्चर करून घरी घेऊन जाऊ शकले. अभ्यागतांनी मोटारसायकल चालवण्यात उत्तम स्वारस्य दाखविल्याने आणि यामाहाबद्दलची त्यांची आवड व्यक्त केल्याने इव्हेंटमध्ये लक्षणीय सहभाग दिसून आला. याला प्रतिसाद म्हणून, कंपनीने कॉमिक कॉन सुपर फॅन बॉक्स आणि यामाहाच्या खास कॉमिक कॉन थीमवर आधारित माल, इतर यामाहा वस्तूंसह सर्वात आकर्षक कॉस्प्लेअर्स तसेच कॉमिक्स आणि मोटरसायकल उत्साही यांना ऑफर केली. ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com



# ट्रक आणि कारचा भीषण अपघात
# तीन जण जागीच ठार

■ **वृत्तसंस्था, अंबाजोगाई, दि. १० :**

शहरापासून जवळ असलेल्या वाघाळा पाटी जवळ आज मंगळवारी (दि.१०) कार आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील तिघे जागीच ठार झाले तर तिघे गंभीर जखमी झाले आहेत.

जखमींना अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांनी दिली. कारमधील सर्व प्रवाशी कारेपूर (ता. रेणापूर) येथील असल्याची प्राथमिक माहिती आहे.

# अपहरण करून सरपंचाचा खून

■ **वृत्तसंस्था, केज (बीड), दि. १०**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष पंडीतराव देशमुख यांच्या निर्दयी हत्येप्रकरणी सुदर्शन घुले (रा. टाकळी ता. केज) व इतर पाच आरोपींवर केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. आरोपींना अटक होत नसल्याने केज तालुक्यातील ग्रामस्थात प्रचंड रोष आहे.

केज शहरात आणि मस्साजोग येथे रास्ता रोको आंदोलन सुरु आहे. या पार्श्वभूमीवर अपर पोलीस अधीक्षक पांडकर, चेतना तिडके यांनी घटनास्थळी धाव घेऊन पोलीस निरीक्षक उस्मान शेख, प्रशांत महाजन यांना आदेशित करून आरोपींच्या शोधासाठी तात्काळ पथके रवाना केली आहेत.

सदरील आरोपींचा वाशी, धाराशिव परीसरात शोध घेत असतांना मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलिसांनी जयराम माणिक चाटे (रा. तांबवा ता.केज) आणि महेश सखाराम केदार (रा. मैंदवाडी ता.धारुर) या दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. सध्या त्यांची कसून चौकशी सुरु असून त्यांच्याकडून इतर आरोपींची माहिती घेण्याबाबत प्रयत्न सुरु आहेत. गुन्हयात सहभागी प्रत्येकावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून नागरिकांनी अफवावर विश्वास ठेऊ नये असे आवाहन प्रभारी पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी केले आहे.

मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

# १३ आणि १४ डिसेंबरच्या रात्री
# मिथुन राशीतील उल्का वर्षाव

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला , दि. १० :**

निरभ्र रात्री आकाशात अचानक एखादी प्रकाशरेषा क्षणार्धात चमकुन जाते यालाच आपण तारा तुटणे असे म्हणतो, परंतु या घटनेचा ताऱ्यांशी काहीएक संबंध नसतो. तर ती उल्का असते.

सूर्यकुलाचेच घटक असलेले धुमकेतू, ग्रह, लघुग्रह वा उपग्रहांदीचे वस्तू कण भ्रमण कक्षेत विखुरलेल्या स्वरुपात असतात, जेंव्हा आपली पृथ्वी या लहानमोठ्या कणांजवळुन फिरते तेव्हा या वस्तू गुरुत्वाकर्षणाने आपल्याकडे ओढल्या जाऊन वातावरणात घर्षणामुळे पेट घेतात आणि त्यांच्या उंची व घटकांप्रमाणे लाल, पिवळ्या, पांढऱ्या व निळ्या रंगात चमकताना दिसतात. बहुतांशी उल्का ह्या वातावरणातच नष्ट होतात.अपवादात्मक एखादी पूर्णांशाने न जळता पृथ्वीवर येऊन आदळते तिला अशनी म्हणतात.

येत्या १३ आणि १४ डिसेंबरच्या रात्री फेथेन लघुग्रहाचे वस्तूकण उल्कांचे रूपात पडताना पाहता येतील. आदर्श स्थितीत दरताशी सरासरी १२० या प्रमाणात पडतील. यासाठी अधिक अंधाऱ्या भागातुन कमी प्रदूषीत जागा अधिक सोयीची असेल. हेमंत ऋतूतील गुलाबी थंडीत मिथुन राशीतील उल्का वर्षाव पूर्वेच्या समृद्ध आकाशात रात्री नऊ नंतर सुरू होऊन पहाटे पर्यंत वाढत्या संख्येने बघता येईल

पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राजवळ उल्कांचे




उगमस्थान असल्याने उल्कांची तेजस्वीता काहीशी कमी दिसेल.

शांत, निवांत जागी झोपलेल्या स्थितीत बघणे सोईचे होईल. याचवेळी दोन्ही दिवशीचे पहाटे इंटरनॅशनल स्पेस स्टेशन अर्थात फिरत्या चांदणीचा आकाश नजारा पहिल्या दिवशी ६.०९ ते ६.१५या वेळेत पश्चिम ते उत्तर बाजूस तर दूसऱ्या दिवशी पहाटे ५.२४ ते ५.२६ या वेळेत उत्तर आकाशात स्पेस स्टेशन पाहता येईल.

# महासागर वृत्तसागर

नागपूर

■ बुधवार, दि. ११ डिसेंबर २०२४ ■


## ट्रेलरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** भरधाव ट्रेलरखाली आल्याने एका दुचाकीस्वार इसमाचा मृत्यू झाला. राजकुमार ब्रिजलाल दखने (37) रा. पावनगाव असे मृताचे नाव आहे.

सोमवारी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास राजकुमार एमएच-49/सीसी-5869 क्रमांकाच्या दुचाकीने चिखली चौकातून एमबी टाऊनकडे जात होते.

शारदा ट्रेडिंग कंपनीसमोर ट्रेलर क्र. एमएच-04/एफजे-9453 च्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवून राजकुमार यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. राजकुमार दुचाकीसह खाली पडले. याच दरम्यान ट्रेलरच्या चाकाखाली येऊन ते गंभीर जखमी झाले.

स्थानिक नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. कळमना पोलिस घटनास्थळी पोहोचले. राजकुमार यांना उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी राजकुमार यांचे भाऊ रामप्रकाशच्या तक्रारीवरून ट्रेलर चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास सुरू आहे.

नागपूर शहरात अपघातांची मालिका सुरूच असून, गेल्या महिनाभरात रस्ते अपघातात अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे शुक्रवारी आगमन...

# स्वागतासाठी नागपूरकर सज्ज!

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :** महायुतीला भरभक्कम मिळालेल्या यशानंतर पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी पदभार सांभाळा. त्यानंतर प्रथमच शुक्रवारी दुपारी ३ वाजता त्यांचे गृहशहरात आगमन होत आहे. त्यांच्या स्वागतासाठी नागपूरकर सज्ज झाले. विमानतळावर स्वागत झाल्यावर लक्ष्मीनगर चौकात जनतेशी संवाद साधणार आहेत.

देवेंद्र फडणवीस यांची गटनेते व त्यानंतर राज्याच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाल्यानंतर शहरात जल्लोश करण्यात आला होता. त्यानंतर प्रथमच आता मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर ते गुरुवारी नागपुरात येत असल्यामुळे त्यांच्या विमानतळावर स्वागतासाठी जय्यत तयारी केली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झालायनंतर ते विमानतळ परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतील.



यानंतर विमानतळ चौकातील प.पू. हेडगेवार स्मारक स्थळी वंदन करतील. विमानतळ ते त्यांच्या धरमपेठ निवासस्थानापर्यंत मार्गावर त्यांचे स्वागत केले जाणार आहे. देवेंद्र फडणवीस पहिल्यांदाच नागपूर शहरात दाखल होत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. त्यांच्या स्वागताची जंगी तयारी केली जात असून सर्वत्र मोठे होर्डींग लावले जात आहे. प.पू. हेडगेवार स्मारक स्थळापासून मिरवणुकीला सुरुवात होईल. सोमलवाडा चौक, राजीव नगर चौक, रेडिसन ब्ल्यू हॉटेल चौक, छत्रपती चौक येथून डावीकडे खामला चौक येथून उजवीकडे तात्या टोपे चौक, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर चौक, बजाजनगर चौक, शंकरनगर चौक मागार्ने लक्ष्मीभुवन चौक येथे रॅली येईल.

लक्ष्मीभुवन चौकामध्ये मुख्यमंत्री जनतेला संबोधित करणार आहे आणि त्याठिकाणी रॅलीचा समारोप होईल.मिरवणुकीमध्ये विविध लोकनृत्य देखील सादर केली जाणार आहेत. मार्गावर विविध मंडळांकडून त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. रेडिसन ब्ल्यू हॉटेल चौकामध्ये भारतीय जनता पार्टी पूर्व नागपूर यांच्यातर्फे तर छत्रपती चौकामध्ये भारतीय जनता पार्टी दक्षिण नागपूर, स्नेहनगर पेट्रोल पंपाजवळ लाडक्या बहिणींकडून औक्षवण, लक्ष्मीनगर, बजाज नगर, शंकर नगर चौकात स्वागत करण्यात येणार आहे.

संपूर्ण देशात नागपूर शहराची मान अभिमानाने ताठ करणारे शहराचे गौरव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागतासाठी सर्व नागरिकांनी विमानतळ परिसरात तसेच मिरवणुकीच्या रॅलीच्या मार्गावर देखील मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपातर्फे स्वागत समितीचे संयोजन संदीप जोशी व शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांनी केले आहे.

## किलोभर सोन्याच्या लोभात गमावले १८ लाख

■ **महासागर प्रतिनिधी कोंढाळी, दि. १० :** ७० लाख रूपये किमतीचे १ किलो सोने केवळ २८ लाख रूपयात मिळत असल्याने त्याला लोभ सुटला. मात्र, या सौद्यात त्याला १८ लाख रूपये गमवावे लागले. वरून जखमीही व्हावे लागले.

या प्रकरणाची हकीकत अशी की, वरुड, जि. अमरावती येथील निवासी गजानन सुखदेव ब्राह्मणे (४३) यांचा मासेमारीचा व्यवसाय आहे. महिनाभरापूर्वी गजानन आणि आरोपींनी एक किलो सोन्यासाठी २८ लाख रुपये देण्याचा सौदा झाला होता. मात्र या दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या काळात कडेकोट बंदोबस्त असल्याने आरोपींनी फिर्यादी गजानन यांच्याशी सोन्याच्या देवाणघेवाणीबाबत नंतर सौदा करू असे सांगितले होते.

विधानसभा निवडणुक संपन्न झाल्यानंतर करारानुसार आरोपी व गजानन ब्राह्मणे यांच्यात सोने देवान घेवाण करण्यासाठी सौदा ठरला. त्यानुसार ९ डिसेंबर रोजी राष्ट्रीय महामार्गावरील कोंढाळीनजिकच्या अंकलेश्वर ढाब्यावर एक किलो सोने खरेदीसाठी गजानन ब्राह्मणे सोने विकणाऱ्यांच्या प्रतिक्षेत बसला होता.

एक तासानंतर सोने विकणारी टोळी अंकलेश्वर ढाब्यावर पोहोचली. गजानन व आरोपी यांच्यात २८ लाखात एक किलो सोन्याचा सौदा झाला. आरोपींनी गजाननला सोने दाखवल्यानंतर गजाननने या व्यवहारासाठी आरोपींना १८ लाख रुपये रोख दिले . उर्वरित १० लाख रुपये देण्यासाठी गजानन आणि आरोपी कारने वरुडकडे जात होते.

दरम्यान कारंजा टोलनाक्याजवळ आरोपींनी कार मागे वळवून काटोलच्या दिशेने जायला निघाले. काटोल गजकेसरी हॉटेलजवळ पोहोचताच दोन वाहनांतील आठ जण पोलिसांच्या वेषात आले. तोतया पोलिसांच्या ताफ्याने गजानन ब्राह्मणे असलेली गाडी अडवली.

तोतया पोलिसांनी गजानन ला मारहाण करून गाडीखाली ढकलून दिले आणि पळ काढला. या घटनेची माहिती गजाननने त्याच्या मित्राला दिली. ही घटना कोंढाळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने घटनेची माहिती रात्री उशिरापर्यंत कोंढाळी पोलीस ठाण्यात देण्यात आली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन काटोल उपविभागीय पोलीस अधिकारी बापूसाहेब रोहम यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढाळीचे ठाणेदार राजकुमार त्रिपाठी व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनेची माहिती दिली. राजकुमार त्रिपाठी व कर्मचारी अधिक तपास करत आहेत.

ग्रामीण पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी १० डिसेंबर रोजी घटनास्थळी भेट देवून पाहणी करीत माहिती घेतली. उपविभागीय पोलीसअधिकारी बापूसाहेब रोहोम यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढाळीचे ठाणेदार राजकुमार त्रिपाठी, नागपूर जिल्हा गुन्हे शाखेचे अधिकारी यांना आरोपींचे शोधकामी विविध पथके नेमण्यात आली आहे. या घटनेतील आरोपींचा कसून शोध सुरू आहे.

## अनैतिक संबंधातून जन्मलेल्या बाळाला रस्त्यावर फेकले

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :** प्रेमसंबंधातून गर्भवती राहिलेल्या तरुणीने एका गोंडस बाळाला जन्म दिला. बदनामीच्या भीतीपोटी मध्यरात्रीच्या सुमारास नागपुरातील वांझरा ले- आऊटकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला फेकून पळ काढला.

पहाटेच्या सुमारास ते बाळ फिरायला जाणाऱ्या एका व्यक्तीच्या नजरेस पडले. त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी बाळाला ताब्यात घेऊन त्याच्या आईचा शोध घेतला. बाळाची आई न मिळाल्यामुळे पोलिसांनी अज्ञात महिलेवर गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी पहाटेच्या सुमारास यशोधरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वांझरा ले- आऊटमधील अब्दूल रशिद यांच्या घरामागील रस्त्यावर एक नवजात बाळ रडत असल्याचे सकाळी फिरायला निघालेल्या रहमत खान यांना आढळून आले.

त्यांनी त्या दिशेने धाव घेतली. एका पिवळ्या रंगाच्या कापडात एक दिवस वय असलेली चिमुकली दिसली. आजुबाजूला कुत्र्यांची गर्दीसुद्धा दिसली. त्यामुळे त्यांनी लगेच कुत्र्यांना पिटाळून लावले आणि पोलीस नियंत्रण कक्षाला माहिती दिली.

यशोधरानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश खुणे यांनी लगेच पोलिसांचे एक पथक रवाना केले. सहायक पोलीस निरीक्षक मेघा गोखरे आणि पोलीस कर्मचारी सपना राणे हे घटनास्थळावर पोहचले. रडत असलेल्या त्या चिमुकलीला मेघा गोखरे यांनी कवेत घेतले. बाळाला कापडाने स्वच्छ करुन लगेच रुग्णालयात रवाना केले.

घटनास्थळावरील पंचनामा करीत नागरिकांकडे चौकशी केली. त्या चिमुकलीच्या आईचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. वस्तीत अनेक ठिकाणी फिरुन बाळाबाबत माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. मात्र, बाळाच्या आईचा पत्ता न लागल्यामुळे त्यांनी त्याला अनाथालयात दाखल केले.

या प्रकरणी बाळ जन्माची लपवणूक केल्याप्रकरणी अज्ञात तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल केला. सध्या बाळ सुखरुप असून त्याची देखरेख अनाथालयात करण्यात येत असल्याची माहिती ठाणेदार रमेश खुणे यांनी दिली.

या बाळाचा जन्म एका अविवाहित असलेल्या तरुणीच्या घरी झाला असून बदनामी होऊ नये म्हणून त्या तरुणीने बाळ रस्त्यावर फेकल्याची चर्चा संपूर्ण परिसरात आहे.

### बाळ मला दत्तक द्या

एक दिवस वय असलेले बाळ सापडल्यानंतर वस्तीत राहणारे एक दाम्पत्य तेथे पोहचले. त्या निपुत्रिक दाम्पत्यांनी पोलिसांकडे बाळाचा ताबा देण्याची विनंती केली. साहेब मला लेकरु नाय हो, साहेब मला या लेकराला मला द्या..मी चांगला सांभाळ करेल, अशी विनवणी करीत होती. मात्र, पोलिसांनी कायद्याची अडचण असल्याचे सांगितले. त्यामुळे दाम्पत्य निराश झाले.

## जिल्हास्तरीय क्रीडा सप्ताहाचे १२ डिसेंबरपासून आयोजन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने 12 ते 18 डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. 12 डिसेंबर सायंकाळी 5 वाजता जिल्हा क्रीडा कार्यालय नागपूर येथे या सप्ताहाचे उद्घाटन होईल.

13 डिसेंबर रोजी आरोग्य तपासणी तसेच 10 वर्षे व 12 वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी जिम्नॅस्टिक, 14 डिसेंबर रोजी हँडबॉल 15 वर्षे मुले व मुली, 15 डिसेंबर रोजी फुटबॉल 12 वर्षे मुले व मुली 16 डिसेंबर रोजी बॉक्सिंग 12 वर्षे मुले व मुली, व्हॉलिबॉल 16 वर्षे मुले व मुली, सॉफ्टबॉल 14वर्षे मुले व मली, टेबल टेनिस 12 वर्षे मुले व मुली, 17 डिसेंबर बॅडमिंटन 19 वर्षे मुले व मुली, 18 डिसेंबर रोजी समुपदेशन व बक्षिस समारोह होणार आहे.

सर्व स्पर्धांचे आयोजन मानकापूर स्टेडियम येथे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी दर्शना पंडित , निशांत पाटील, अथर्व भोसले, स्वप्नील बन्सोड यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक यांनी केले आहे.

## मॅटच्या इतिहासात प्रथमच लोक अदालत

**१२६ जणांना नोकरी**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मॅट) इतिहासात ३३ वर्षांत प्रथमच लोकअदालत घेण्यात आली. त्यात ५४२ सेवाविषयक प्रकरणांपैकी १३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

लोक अदालतीमध्ये नागपूर, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर या तिन्ही खंडपीठातील ५४२ प्रकरणांपैकी १३८ निकाली निघाली. यामध्ये मुंबई खंडपीठाच्या- २३८ प्रकरणांपैकी ३९ तर नागपूर-खंडपीठाच्या १५० पैकी ६३ आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या १५४ प्रकरणांपैकी ३६ प्रकरणांचा समावेश आहे.

न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला. तीन पॅनल आयोजित करण्यात आले होते. पॅनल प्रमुख म्हणून न्यायमूर्ती विनय जोशी, सेवानिवृत्त सदस्य (न्या) ए. पी. कुऱ्हेकर, आर. बी. मलिक यांनी काम पाहिले. नितिन गद्रे (नागपूर), विजयकुमार (औरंगाबाद), विजया चौहान, संदेश तडवी, आर.एम. कोलगे आणि एम.बी. कदम यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. अनेक वर्षे प्रलंबित प्रकरणांची मुख्य सादरकर्ता अधिकारी स्वाती मणचेकर यांनी तपासणी केली.

**शासकीय नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा**

लोक अदालतीत तीन प्रकरणात तडजोड झाल्याने १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जलसंधारण विभागाच्या १७१ आणि कृषी विभागाच्या २१८ जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित होत्या. यामध्ये सर्व जागांसाठी माजी सैनिक उमेदवार मिळू शकले नाहीत. त्यामुळे लोक अदालतीत तडजोडीनंतर उर्वरित रिक्त जागा इतर उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात आल्या. या निर्णयामुळे १२६ उमेदवारांना शासकीय नोकरी मिळू शकणार आहे.

## आमदार उमेश यावलकर यांना मंत्रिमंडळात घ्या...




■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :** साठ वर्षापासूनचा ज्यांच्या घराण्याला राजकीय व सामाजिक वारसा लाभलेला आहे, असे उच्च शिक्षित भाजपचे अमरावती जिल्ह्यातील मोर्शी मतदारसंघातून प्रचंड मताने निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांना राज्याच्या मंत्रिमंडळात सहभागी करावे अशी मागणी अखिल भारतीय माळी महासंघ व विविध संघटनेच्या माध्यमातून पत्र परिषदेत करण्यात आली.

राज्यात माळी समाज हा दुसऱ्या क्रमांकावर असून माळी समाजाची संख्या विदर्भातपन्नास लाखापेक्षा अधिक आहे असे असताना भाजपने उमेदवारी दिलेले माळी समाजातील विदर्भातील एकमेव आमदार उमेश यावलकर मोर्शी मतदार संघातून मोठ्या मतांनी निवडून आले.

ओबीसी मध्ये गणल्या जाणाऱ्या माळी समाजाच्या विविध मागण्यांच्या पूर्ततेच्या हेतूने माळी समाजाच्या विविध संघटनेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना निवेदन देऊन आमदार उमेश यावलकर यांना मंत्रिमंडळात घ्यावी अशी मागणी केली असल्याचे महासंघाचे राज्य वकील आघाडीचे अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर यांनी पत्र परिषदेत सांगितले.

पत्रकार परिषदेत अखिल भारतीय माळी महासंघाचे राष्ट्रीय विश्वस्त गोविंद वैराळे, अखिल भारतीय माळी महासंघाचे विभागीय अध्यक्ष कैलास ताणकर, महानगर अध्यक्ष मधुसूदन देशमुख, सरचिटणीस शिवराम गुरूनुले, एड. प्रभाकर वानखेडे, सुभाष मालपे, पंजाब फरकाडे, कैलास जामगडे उपस्थित होते.

## अशासकीय सदस्याच्या नियुक्तीसाठी अर्ज आमंत्रित

**राज्य दिव्यांगत्व संशोधन समिती**

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :** महाराष्ट्र राज्य दिव्यांगत्व संशोधन समितीसाठी अशासकीय सदस्यांच्या नावांसाठी नियुक्ती करीता 13 डिसेंबरपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून कार्यक्षेत्रातील दिव्यांग कल्याण क्षेत्रात कार्यरत नामवंत व तज्ञ व्यक्ती व दिव्यांगांच्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारे दिव्यांग पदाधिकारी व सदस्य यांची नावे शासनास कळवायची आहेत. राज्य शासनाने दिव्यांग व्यक्ती मधून सदस्य म्हणून नामनिर्देशित केलेल्या सात व्यक्ती किंवा अधिनियमाच्या कलम 2 च्या कलम (झेड) अंतर्गत नोंदणीकृत संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारे सदस्य असावेत. शिफारस केलेल्या नामनिर्देशित सदस्याचे नाव, पत्ता, संपकार्चा क्रमांक व ई-मेल शिफारस केलेल्या नामनिर्देशित सदस्यांची संपूर्ण वैयक्तीक माहिती आणि शिफारस केलेल्या नामनिर्देशित सदस्यांनी उल्लेखनीय कार्य केल्याची कामगिरी विवरणपत्रात जोडावी.

अधिक माहितीसाठी जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा परिषद,सिव्हील लाईन, नागपूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## भरोसा सेलने मिळवून दिली वृद्धेला आर्थिक मदत

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** कौटुंबिक कलहामुळे एका वृद्धेचा पती 28 वर्षांपासून त्यांच्यापासून वेगळा रहात होता. उदरनिवार्हासाठी तो त्यांना दरमहिन्याला काही पैसे द्यायचा. मात्र गत दोन वर्षांपासून पतीने पैसे देणे बंद केले.

उदरनिवार्हाचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने वृद्धेवर उपासमारीची वेळ आली. त्यांनी भरोसा सेलकडे मदत मागितली. सेलने पतीचे समुपदेशन केले आणि त्यांना वृद्ध पत्नीला आर्थिक मदत देण्यासाठी तयार केले.

पोलिस विभागाच्या भरोसा सेलमध्ये 2017 सालापासून वरिष्ठ नागरिक कक्ष कार्यरत आहे. या माध्यमातून 60 वर्षांहून अधिक वयोगटातील वरिष्ठ नागरिकांच्या समस्यांचे समाधान केले जाते. गत 4 डिसेंबर रोजी एका 62 वर्षीय महिलेने भरोसा सेलकडे लिखित तक्रार केली. त्यात गत 28 वर्षांपासून कौटुंबिक कलहामुळे पती वेगळा राहत असून उदरनिवार्हासाठी पैसेही देत नाही. त्यामुळे त्या मुलांवर आश्रित असल्याचे नमूद होते.

भरोसा सेलच्या प्रमुख पोलिस निरीक्षक सीमा सुर्वे यांनी सोमवारी महिला आणि त्यांच्या 65 वर्षीय पतीला बैठकीसाठी बोलावले. या दरम्यान महिलेने सांगितले की, त्यांना दोन मुले आणि एक मुलगी असून त्यांचे लग्न झाले आहे. सर्वजण आप-आपल्या कुटुंबासह वेगळे राहतात. पती एमएसईबीतून निवृत्त आहेत आणि 28 वर्षांपासून वेगळे राहतात. आधी ते उदरनिवार्हासाठी पैसे देत होते, मात्र गत दोन वर्षांपासून ना ते घरी आले आणि ना त्यांनी आर्थिक मदत केली.

भाडेकरूंकडून येणाऱ्या भाड्यावर त्यांचा उदरनिर्वाह सुरू होता, मात्र आता घर जीर्ण झाले असल्याने भाडेकरूही घरसोडून गेले आणि त्यांच्याकडे उदरनिवार्हाचे दुसरे कुठलेही साधन नाही.

पोलिसांनी पतीचे समुपदेशन केले आणि पत्नीला उदरनिवार्हासाठी पैसे देण्यास सांगितले, मात्र पती तयार झाले नाही. त्यानंतर सपोनि शुभांगी तकीत, पोउपनि रवी भोस्कर आणि पोशि रोशनी यांनी पतीला कायद्यातील तरतुदींची माहिती दिली. तसेच पत्नीने मेन्टेनंससाठी कोर्टात खटला दाखल केला तर दोघांनाही त्रासदायक ठरेल. मात्र आपसात समझवता केला तर कोर्टात जाण्याची गरजच पडणार नाही, असे सांगितले. अखेर पती खर्च देण्यास तयार झाले. महिलेने त्यावर संतोष व्यक्त करीत पतीवर कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करण्याचे लिखित पत्र दिले.

## पदपथावर पुन्हा सजली खाद्यपदार्थ विक्रीची दुकाने

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :** आयटी पार्क ते माटे चौक या रस्त्यावरील पदपथावर खाद्यपदार्थांची दुकाने पुन्हा सजली आहेत. अतिक्रमणविरोधी कारवाई टाळण्यासाठी या विक्रेत्यांनी आता एक नवीन शक्कल लढवली आहे. दुकानासमोर कार थांबवू नये, असे फलक त्यांनी दुकानांच्या दर्शनी भागावर लावले आहेत.

परंतु, हे फलक केवळ दाखवण्यासाठी प्रत्यक्षात या फलकांसमोरच ग्राहकांची चारचाकी वाहने उभी राहत आहेत. विशेष म्हणजे, वाहतूक पोलीस व महापालिकेनेच विक्रेत्यांना ही पळवाट दाखवल्याची चर्चा आहे.

आयटी पार्क ते माटे चौक या रस्त्यावर खाद्यापदार्थांची शंभरावर दुकाने आहेत. या दुकानांचा पसारा पदपथाच्याही खाली आला आहे. येथे येणारे ग्राहक दुकानांसमोर चारचाकी वाहने उभी करतात. त्यामुळे अर्धा रस्ता वाहनांनी व्यापला जातो. परिणामी, रस्त्यावर रोज वाहनकोंडी होते. परिसरातील सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो.




काही दिवस खाद्यापदार्थांची दुकाने बंद होती. परंतु, नंतर सोनेगाव वाहतूक पोलीस, बजाजनगर आणि प्रतापनगर पोलीस तसेच महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दुकानदारांची भेट घेतली. त्यांनी खाद्यपदार्थ दुकानदारांना नवी शक्कल सुचवल्याची माहिती आहे.

चारचाकी वाहने थांबवू नये, असे लिहिलेले फलक लावून दुकाने रस्त्यावर पुन्हा सुरू करण्यास सांगण्यात आल्याचे कळते. त्यानुसार जवळपास दीडशेवर दुकाने पुन्हा सुरू झाली आहेत. पूर्वीप्रमाणेच आता रस्त्यावर कार थांबवून ग्राहक वाहतूक कोंडी करीत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिक आणि वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

**हप्तेखोरीसाठी प्रोत्साहन**

या परिसरात जवळपास दीडशेवर दुकानदारांकडून वाहतूक पोलीस, प्रतापनगर, बजाजनगर पोलीस आणि महापालिकेचा अतिक्रमण विरोधी विभाग महिन्याकाठी लाखोंचे हप्ते घेतो, असा स्थानिक नागरिकांचा आरोप आहे. या रस्त्यावरील दुकाने बंद राहिली तर पोलीस व महापालिकेच्या पथकाचे मोठे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे पोलीस आणि महापालिकेचे कर्मचारीच दुकानदारांच्या भेटी घेऊन रस्त्यावर दुकाने लावण्यासाठी प्रोत्साहन देत असल्याची चर्चा आहे.

स्वामी विवेकानंद चौकातून अंबाझरी टी-पॉईंट चौकापर्यंतचा रस्ता एकेरी सुरू असल्यामुळे वाहनांची वर्दळ माटे चौकातून जास्त आहे. पायी चालणाऱ्यांनी पदपथावरून चालणे अपेक्षित असते.

मात्र, आयटी पार्क परिसरातील रस्त्यावरील पदपथावर चक्क खुर्च्या-टेबल टाकून ग्राहकांना खाद्या पुरवले जात आहेत. आधीच दुकानांनी अर्धा रस्ता व्यापला आहे. त्यात पुन्हा ग्राहकांना बसण्याची सोय करून देण्यात आली आहे. त्यामुळे पायी चालावे कुठून हा प्रश्न पडला आहे.

# १.७६ लाखाच्या मालावर डल्ला

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** कुटुंब लग्न समारंभासाठी बाहेर गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत रोकड व दागिन्यांसह एकूण १ लाख ७६ हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना इमामवाडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी विलास वासुदेव समरोत (४०) रा. वकीलपेठच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.
शनिवारी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास समरोत कुटुंब घराला कुलूप लावून लग्न समारंभासाठी बीडीपेठ येथे गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील सोन्याचांदीचे दागिने व रोख १,५५,००० रुपये असा एकूण १.७६ लाखांचा माल चोरी करून पसार झाला. रविवारी सकाळी समरोत कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# घरफोडीचे आरोपी जेरबंद

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** कपिलनगर पोलिसांनी तांत्रिक तपास आणि गोपनिय माहितीच्या आधारावर ठाण्यात नोंद घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपींच्या मुसक्या आवळल्या. देवांग उर्फ मिंट्या नरेंद्र मराठे (१९) आणि आशुतोष उर्फ टिट्या धीरज उके (३०) दोन्ही रा. कपिलनगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. फिर्यादी चित्तरंजन विद्याधर अवनिकर (६४) रा. एनआयटी क्वॉर्टर, नारी रोड, उप्पलवाडी हे गत १ डिसेंबरच्या सकाळी घराला कुलूप लावून कुटुंबासह समतानगर येथील चर्चमध्ये गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करीत कपाटातील रोख ५,५०० आणि सोन्याचांदीच्या दागिने असा एकूण २ लाख ६ हजार ५०० रुपयांचा माल चोरी केला होता. सायंकाळी ५ च्या सुमारास अवनिकर कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले आणि पोलिसात तक्रार करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. तांत्रिक तपास आणि गोपनिय माहितीच्या आधारावर वरील आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी दोघांनाही अटक करून १ लाख ५४ हजारांचा माल जप्त केला. पुढील तपास सुरू आहे.

# एटीएममध्ये चोरीच्या प्रयत्नातील आरोपी गजाआड

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** पारडी ठाण्यांतर्गत एचडीएफसी बँकेचे एटीएममध्ये चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे. रितिक उर्फ जाबो केशव घवघवे (२४) रा. महाराजपुरा, पारडी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दुर्गेश अरुण कोळमकर (४०) रा. कळमेश्वरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला होता. कोळमकर हे एचडीएफसी बँकेत एटीएम अधिकारी पदावर कार्यरत आहेत. १ डिसेंबरच्या मध्यरात्री अज्ञात आरोपीने पारडी ठाण्यांतर्गत एचडीएफसी बँकेचे एटीएममध्ये चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती मिळाली. त्यांनी एटीएमचे निरीक्षण केल्यानंतर पोलिसात तक्रार दाखल केली. पारडी पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. तांत्रिक तपास व गोपनिय माहितीच्या आधारावर पोलिसांनी रितिकला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. झडतीमध्ये पोलिसांना रितिकजवळ एक चाकूही मिळाला. पोलिसांनी चाकू जप्त करून त्याला अटक केली. पुढील तपास सुरू आहे.

# घरगुती गॅसचा काळाबाजार

## विविध कंपन्यांचे १४ सिलिंडर जप्त

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** नंदनवन पोलिसांनी अन्न वितरण विभागाच्या कर्मचाऱ्यांसोबत मिळून ठाण्यांतर्गत अवैधरित्या घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यावर धाड टाकली. आरोपीला अटक करून विविध कंपन्यांचे १४ सिलिंडर जप्त केले. आरोपी घरगुती सिलिंडरमधील गॅस काढून अवैधरित्या वाहनांमध्ये भरत होता. राकेश राधेलाल श्रीवास्तव (४१) रा. बापूनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.
सोमवारी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास नंदनवन पोलिसांचे एक पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान आरोपी राकेश हा घरीच अवैधरित्या घरगुती सिलिंडरमधील गॅस काढून वाहनांमध्ये भरत असल्याची माहिती मिळाली. याबाबत अन्न वितरण विभागाला सूचना देण्यात आली. दोन्ही विभागांच्या संयुक्त पथकने राकेशच्या घरी धाड टाकली. झडतीमध्ये त्याच्याजवळ विविध कंपन्यांचे १४ घरगुती गॅस सिलिंडर व १ गॅस रिफील मशीन मिळाली. राकेशला अटक करून सर्व माल जप्त करण्यात आला.

### महाल परिसरातही कारवाई

अन्न वितरण विभागाच्या पथकाने सोमवारी महाल परिसरातही कारवाई करून चायनीज आणि चौपाटी वाल्याकडून घरगुती सिलिंडर जप्त केले. घरगुती सिलिंडरचा व्यवसायिक उपयोग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा विभागाकडून देण्यात आला आहे.

# भाड्याने घेतलेले वाहन भाड्याने दिले

## १२०० रुपये रोजप्रमाणे २ महिने वापरले

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** अॅपच्या माध्यमातून एक कार दोन दिवसांसाठी भाड्याने घेतली. नंतर पुन्हा २ दिवस वाढवून घेतले. मात्र भाडे देण्यासाठी पैसे नसल्याने एकाने ती कार दुसऱ्याला भाड्याने दिली. दुसऱ्याने तिसऱ्याला भाड्याने दिली. अशाप्रकारे १२०० रुपये रोज प्रमाणे २ महिने वाहनाचा वापर केला. फिर्यादीच्या तक्रारीवरून सोनेगाव पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तिघांना अटक केली. न्यायालयाच्या आदेशाने त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली. अमोल गजभिये (२४) रा. कन्हान, शेख अश्फाक (२९) रा. पिवळी नदी, पिरखान (३४) रा. शिवनी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. यातील मुख्य आरोपी मोबीन अहमद (४५) रा. यशोधरानगर हा फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. राजीवनगर येथील रहिवासी फिर्यादी बाळू रामटेके (५२) यांच्याकडे एक चारचाकी वाहन आहे. वाहन भाड्याने देण्यासाठी त्यांनी एका अॅपवर त्याची नोंदणी केली आहे. अमोलला भाड्याने कार पाहिजे होते. त्याने अॅपवर सर्च करून ऑनलाईन बुकींग केली. त्याने दोन दिवसांसाठीच बाळू यांची कार बुक केली होती. मात्र नंतर त्याने पुन्हा दोन दिवस वाढवून घेतले. काम झाले, मात्र कारचे भाडे देण्यासाठी त्याच्याकडे पैसे नव्हते. दरम्यान त्याला आरोपी मोबीन मिळाला. त्याने कारचे भाडे देण्याचे आमिष देत अमोलकडून बाळू यांची कार भाड्याने घेतली. मोबीनने तब्बल दोन महिने कारचा वापर केला. तो मागणीप्रमाणे परस्पर वाहन भाड्याने देत होता. १२०० रुपये रोज या प्रमाणे त्याने २ महिने कारचा वापर केला. दरम्यान अमोलने बरेच दिवस होऊनही कार परत केली नसल्याने बाळू यांची चिंता वाढली. त्यांनी अमोलचा शोध घेतला आणि वरील प्रकार उघडकीस आला. त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून वरील तिन्ही आरोपींना अटक केली. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांची कारागृहात रवानगी केली. यातील मुख्य आरोपी मोबीन हा फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

# पीएम पोषण शक्ति निर्माण योजनेतील आहार शिजवून देणाऱ्या स्वयंपाकी, मदतनीसांचे मानधन रखडले

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. १० :**
नागपूर तालुक्यातील खाजगी व जिल्हा परिषद शाळे मधील वर्ग १ ते ८ मधील विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ति निर्माण योजनेअंतर्गत पोषण आहार शिजवून देणाऱ्या स्वयंपाकी, मदतनीस यांचे मानधन गेल्या अडीच महिन्यांपासून रखडले आहे. हातावर पोट असणाऱ्या महिलांवर हा अन्याय असून तातडीने त्यांचे रखडलेले मानधन मिळावे, अशी अपेक्षा स्वयंपाकी, मदतनीस यांनी केली आहे. नागपूर पंचायत समीती अंतर्गत असणाऱ्या शाळामधील प्रधानमंत्री पोषण शक्ति निर्माण योजनेअंतर्गत पोषण आहार शिजवून देणाऱ्या स्वयंपाकी आणि मदतनीस महीलांची संख्या ३१० कार्यरत आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या गलथान कारभाराचा फटका हातावर पोट असणाऱ्या महिलांना बसला आहे. वास्तवात या महिलांना मिळणारे मानधन रुपये म्हणजेच तुटपुंजे आहे. गरीब व वंचित वर्गाकडे दुर्लक्ष असून त्यांना तातडीने मानधन अदा करणे गरजेचे झाले आहे. स्वयंपाकी आणि मदतनीस यांच्या मानधनासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या हिश्शातून एकत्रीत निधी दिला जात आहे तरीही आमच्यावर अन्याय होत असल्याचे स्वयंपाकी महिलांचे म्हणणे आहे.

**प्रतिक्रिया**

ऑक्टोबर व नोव्हेंबर महीन्याचे मानधनचे दोन फाईल तयार असुन मंजुर करून ठेवले आहे. शासनाकडून अजुनपर्यंत निधी उपलब्ध झालेला नाही. आठ दिवस पर्यंत निधी उपलब्ध होणार अशी माहीती मिळाली आहे. निधी उपलब्ध झाल्यास त्वरीत स्वयंपाकी व मदतनीस यांचे मानधन त्यांच्या खात्यात जमा करणार.
आरती साळुंके
**अधिक्षक, पोषण आहार**
**नागपूर पंचायत समिती**

आचार संहीतेत सर्वांचे पगार वेळेवर झाले. फक्त आमच्या मानधनसाठी आचार संहीता होती का ? स्वयंपाकी आणि मदतनीस यांच्या मानधनासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या हिश्शातून एकत्रीत निधी दिला जात आहे तरीही आमच्यावर अन्याय होत आहे. आम्ही गरीब लोकं , आमच्यासाठी २५०० रुपये म्हणजे २५ हजारासारखे आहे. ऐन दिवाळी सणाला आम्हाला आमच्या हक्काचे मानधन मिळाले नाही. सरकारने मंत्री मंडळाचा विस्तार मग करावा पहीले आमचे मानधन लवकर दयावे हीच अपेक्षा आहे.

# शिष्यवृत्ती योजनेच्या अनुषंगाने किट्स मधे तालुकास्तरीय कार्यशाळा

रामटेक :-(प्रतिनिधी)
शिष्यवृत्ती योजनेच्या अनुषंगाने कविकुलगुरु इंस्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी एंड सायंस (किट्स) मधे शैक्षणिक सत्र - करिता तालुकास्तरीय कार्यशाळा दि. डिसेंबरला आयोजित करण्यात आली होती. समाज कल्याण विभाग नागपुर चे समाज कल्याण निरिक्षक पराग वासनीकर, लिपिक नीलेश बोबडे, लिपिक सतीश ढोबले, लिपिक शैलेश मेश्राम, रामटेक, कामठी, पारशिवणी व मौदा येथील महाविद्यालयातील प्राचार्य व सहायक कर्मचारी उपस्थित होते.
समाज कल्याण निरिक्षक पराग वासनीकर यानी शैक्षणिक सत्र - करीता महाडिबीटी पोर्टलवरुन भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजना, राजर्षी शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व व्यावसायिक पाठ्यक्रमासाठी विद्यावेतन योजनांसाठी अर्जाची नोंदणी करणे, महाविद्यालयात प्रवेशित सर्व पात्र विद्यार्थ्यांचे महाडिबीटी पोर्टलवर नोंदणी करणे तसेच अर्ज स्विकारण्याची कार्यवाही करणे इत्यादी विषयाच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणी संबंधी माहिती दिली ते म्हणाले की भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व फ्रिशिप या योजनांचा लाभ सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी प्रत्येक विद्यार्थांना लाभ द्यावे असे ते म्हणाले. डिसेंबर पर्यंत शिष्यवृत्तीचे काम पूर्ण करा असे ते म्हणाले. कार्यशाळा करीता किटसचे संस्था सचिव व्ही. श्रीनिवासराव, प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांचे सहकार्य लाभले. प्रस्तावना किट्सचे शिष्यवृत्ति विभाग प्रमुख डॉ. महेश मावळे यांनी केले.



# बैलवाडा जि.प. शाळेची दिव्यांग आरोही चौरे नृत्य स्पर्धेत प्रथम

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. १० :**
नागपूर तालुक्यातील बैलवाडा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेची दिव्यांग विद्यार्थीनी आरोही गजानन चौरे हिने नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. खापरी ( रेल्वे )जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत दिव्यांग सप्ताह निमित्ताने गटसाधन केंद्र पंचायत समिती नागपूरच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांचे विविध खेळ व नृत्याचे सादरीकरण केले. उत्कृष्ठ सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषीक देण्यात आले.प्रास्ताविक गुळसुंदरे यांनी केले. विलास भोतमांगे यांनी दिव्यांग कायदे याची माहिती दिली. तर नारायण चापले यांनी शासनाच्या विविध योजना समजावून दिल्या.संचालन संतोष पढाल यांनी तर आभार मंगला सातपुते यांनी मानले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किरण मडावी, सदस्य सुषमा ठाकरे, शिक्षण विस्तार अधिकारी नारायण चापले , मुख्याधिकारी विलास भोतमांगे, शिक्षिका कल्पना भांगे, वर्षा पदीर, रविंद्र बोबडे, कांता खोंडे ,गटसाधन केंद्रातील दिलीप गुळसुंदरे, सीमा आष्टनकर, संतोष पढाल, दिव्यांग शिक्षिका प्रिती लिंगलवार, मंगला सातपुते, स्वप्नील काकडे, पप्पू मस्के, मिथुन खोब्रागडे, स्वप्नील काकडे, प्रणाली पाटील, किशोर चौधरी, विनोद नाकाडे, संदिप गिरडकर, पप्पू मस्के, ललिता तट्टे, मनिषा बमनोटे उपस्थित होते.

# विज्ञानक्षेत्रात शिक्षिका वसुंधरा धोटे (किटुकले ) यांची उत्कृष्ठ कामगिरी

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. १० :**
आयआयटी गुवाहाटी ( आसाम )येथे आयोजित १० व्या भारत आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सव ( आयआयएसएफ ) ३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबर पर्यंत पार पडला. या कार्यक्रमात गावसुत जि.प.उ.प्रा.शाळेच्या विज्ञान पदविधर शिक्षिका वसुंधरा गजानन धोटे ( किटुकले ) यांची वैज्ञानिक गुणवत्तेच्या आधारावर निवड करण्यात आली. त्यामुळे नागपुर जिल्हा परिषदेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. रोजच्या अध्यापन कार्यात विद्यार्थ्यांना याचा निश्चीतच फायदा होईल आणि त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होईल असे प्रतिपादन शिक्षिका वसुंधरा धोटे यांनी केले. चार दिवसीय मेगा विज्ञान महोत्सवात २४ प्रकारचे विविध कार्यक्रमात हजार प्रतिनिधी आणि ४५ हजार लोक मोठ्या संख्येने उपस्थीत होते. आयआयएसएफचे महत्वाचे आर्कषण म्हणजे चंद्राची वास्तविक पृष्ठभाग प्रतिकृती होय . चंद्राची १० मी उंच प्रतिकृती अंतराळ विज्ञानात भारताची प्रगती दर्शविते . यावर्षी काही नविन कार्यक्रम जोडले गेले होते. लोकांना पृथ्वी विज्ञानाच्या विविध क्षेत्रामध्ये जसे की ,हवामानशास्त्र ,समुद्र विज्ञान ,इकॉलॉजी आदी विषयांवर लोकांना सहभागी करुन घेणे आणि शिक्षित करणे हा उद्देश होता. या इव्हेंटद्वारे आयआयएसएफ पर्यावरणीय समस्यांवर जनजागृती करणार आहे. देशाच्या विकासाला चालना देण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञावर भर दिला गेला. जागतिक आव्हांनांना सामोरे जाण्यासाठी शास्त्रज्ञ, संशोधक आणि संस्थांमधे आंतरराष्ट्रीय सहयोग ,भागीदारी आणि संवादांची देवाणघेवाण वाढविणे हे उद्दिष्ये आहे. फ्युजन फोरम अॅटॉमिक असेंम्बली इव्हेंटमधे विद्युत निर्मिती ,अनुऔषध ,कृषी , अँडीट्यु मॅनीफॅक्चरींगसह विविध क्षेत्रासाठी भारतातील अनुऊर्जा लागु करण्यासाठी वर्तमान दृष्टीकोन , भविष्यातील फायदे आणि महत्वाची आव्हाने यावर विस्तृत चर्चा करण्यात आली .विज्ञान सोप्या भाषेत लोकांपर्यंत पोहचविण्यात विग्यानिका इव्हेंटने महत्वपुर्ण भुमिका बजावली . कार्यक्रमाचा उद्देश विज्ञान संभाषणकार यांच्यातील दरी कमी करणे व बालवैज्ञानिक, बालसंशोधक यांना प्रोत्साहित करणे आणि विज्ञान क्षेत्रामधे भारताची प्रगती करणे हाच उद्देश आहे. या इव्हेंटसाठी संपुर्ण भारतामधुन १५० विज्ञान शिक्षकाची निवड करण्यात आली होती.




# वंचितच्या चार ग्रामपंचायत सदस्यांना अखेर मिळाला न्याय

## मोठ्या थाटामाटात ग्रा.पं. कार्यालयात रुजू

### मिठाई वाटून साजरा केला आनंदोत्सव

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, १०**
दवलामेटी ग्रामपंचायतची २०२१ मध्ये झालेल्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे १७ पैकी ७ सदस्य विजयी झाले होते.कॉंग्रेसच्या पाठिंब्यावर दवलामेटी ग्रामपंचायतवर वंचितची सत्ता स्थापन झाली होती. पण, गावातीलच व्यक्तीने अतिक्रमणाच्या मुद्यावरून चार सदस्यांविरोधात याचिका दाखल केली. अपिलानंतर चौघांचे सदस्यत्व रद्द झाले. यावर
नागपूर उच्च न्यायालयाने सदस्यत्व रद्द करण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली. त्यामुळे चारही सदस्य पुन्हा दवलामेटी ग्रामपंचायतमध्ये रुजू झाले असून त्यांनी वाजतगाजत कार्यालय गाठले. व आनंदोत्सव साजरा केला. श्रीकांत रामटेके, प्रकाश मेश्राम, शुभांगी पाखरे, अर्चना बनसोडे असे ग्रामपंचायत सदस्याचे नाव आहे. जिल्ह्यात वंचितची सत्ता असलेली पहीली दवलामेटी ग्रामपंचायत होती. पण विजय पिसोडे यांनी श्रीकांत रामटेके, प्रकाश मेश्राम, शुभांगी पाखरे, अर्चना बनसोडे यांच्याविरोधात नागपूर अपर जिल्हा अधिकारी कार्यालयात याचिका दाखल होती. यामध्ये चौघांचेही सदस्यत्व रद्द झाले. नंतर चौघांनी विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल केले. पहिला निर्णय बाजूने लागला. या निर्णयाविरोधात पुन्हा अपील करण्यात आल्याने पुन्हा चौघांचे सदस्यत्व रद्द केले.तेव्हा चारही सदस्यानी नागपूर उच्च न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाने फेरविचारासाठी पुन्हा विभागीय आयुक्तांकडे प्रकरण पाठविले. पण, येथेही अपयश आल्याने चौघांनी पुन्हा हायकोर्ट गाठले. न्यायालयाने याचिकेवर सुनावणी करीत बडतर्फीला स्थगिती दिली.गुरूवार ५ डिसेंबर रोजी श्रीकांत रामटेके, प्रकाश मेश्राम, शुभांगी पाखरे, अर्चना बनसोडे यांनी थाटात पद्धार स्वीकारला. तसेच मिठाई वाटून आनंद व्यक्त केला. यावेळी वंचित आघाडीचे नेते प्रबोधनकार अनिरुद्ध शेवाळे, मनीष बोरकर, माधुरी खोब्रागडे, माजी सरपंच रिता उमरेडकर , राहुल लांमसोंगे, राजेंद्र गजभिये, गाणार बालाजी मून, विनायकराव धुमटकर, रोहित राऊत, राजेश वानखेडे, प्रवीण अंबादे, सुमेध फुलझेले, रईस डोंगरे, दीपक कोरे, शरद ढोके, अनिल गणवीर, प्रवीण मून, नीतेश पुंडकर, मोनू बागडे, सुषमा भलाधरे, जोत्सना बेले, प्रीती वाकडे, चैत्रा पाटील, चंदा बोबडे, श्वेता सुखदेवे, ज्योती शिंगाळे, वर्षा बारमाटे, ज्योती गेडाम तसेच वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन नागेश बोरकर यांनी केले तर आभार दर्शन बेले यांनी मानले.



# चाकूसह तरुणास अटक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १०**

कळमणा पोलिसांनी ठाण्यांतर्गत गस्तीदरम्यान गोपनिय महितीवरून एका तरुणास ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याजवळ चाकू मिळाला. पोलिसांनी चाकू जप्त करून तरुणाला अटक केली. ओमप्रकाश उर्फ झाऊ पुनव लहरे (२२) रा. मिनीमातानगर, कळमणा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.
रविवारी रात्री २.४० वाजताच्या सुमारास कळमणा पोलिसांचे एक पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान जानकीनगर परिसरात स्टील कारखान्याजवळ एक तरुण शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून ओमप्रकाशला ताब्यात घेतले.
झडतीमध्ये त्याच्याजवळ चाकू मिळाला. पोलिसांनी चाकू जप्त करून त्याला अटक केली. त्याच्याविरुद्ध मनाई आदेशाचे उल्लंघनासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

# वाडी न.प.कार्यालयात आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबीर

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. १० :**
वाडी नगर परिषदच्या स्वच्छता विभागाच्यावतीने कार्यालयात मुख्याधिकारी संदीप बोरकर यांच्या मार्गदर्शनात आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. मानव विकास बहुउद्देशीय ग्रामीण सेवा संस्थेच्या सहकार्याने पार पडलेल्या शिबिराचे उदघाटन स्वच्छता विभाग प्रमुख सुषमा भालेकर यांच्या हस्ते दिप प्रज्वलित करून करण्यात आले.टीआय मायग्रेट प्रकल्प अंतर्गत या शिबिरात स्वच्छता निरीक्षक मुकेश महातो, लेखापरीक्षक अतुल सरदार, लेखापाल अमोल सोनसरे, स्वच्छता ब्रॅण्ड एम्बेसिडर नरेशकुमार चव्हाण, शहर समन्वयक आशिष गुंडूकवार, मेयो आयसीटीसी सल्लागार संजय ठवरे, टेक्निशियन सरिता नासरे, डॉ.ऋषिकेश कांबळे, डॉ.प्रशांत भरबत प्रामुख्याने उपस्थित होते. आरोग्य शिबिरात गुप्तरोग तपासणी, एचआयव्ही तपासणी, कावीळ मलेरिया सह सामान्य आजाराची तपासणी करण्यात आली.



## नावात बदल

**मी शुभम गिरीधर बालपांडे** माझी दहावीची परीक्षा मार्च 2011 ला झाले, त्यामध्ये माझ्या रिजल्ट आणि डिप्लोमा मध्ये माझ्या आईचे नाव शुभा असे लिहिण्यात आले आहे. तरी माझ्या आईचे खरे नाव हे **शोभा गिरिधर बालपांडे** (Shobha Giridhar Balpande ) असे आहे. त्यासाठी माझ्या पासपोर्ट मध्ये अळथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे मी हे अर्ज दोन न्युज पेपर मध्ये देत आहे. माझ्या आईच्या नावामध्ये दुरुस्ती करण्यात यावी ही विनंती माझ्या आईचे नाव **शोभा गिरिधर बालपांडे** असे आहे. माझे नाव शुभम गिरिधर बालपांडे शोभा बालपांडे (Shobha Giridhar Balpande) आहे.



# संत रविदास पुण्यतिथी साजरी

■ महासागर प्रतिनिधी
कुही , दि. १० :
श्री संत शिरोमणि रविदास महाराज यांची रविवार दि.८ (रविवार) ला पुण्यतिथी संत रविदास नगर, कुही येथे रविदास चर्मकार कमेटी मित्रपरिवार यांच्या तर्फे साजरी करण्यात आली. पुण्यतिथि निमित्य श्री संत रविदास महाराज यांच्या जीवन चरित्र वर तसेच त्यांच्या समाज कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. रविदास महाराजांच्या विचारांचे आचरण करून त्यांच्या सर्व धर्म व जातीच्या कल्याणासाठी असलेल्या मौलिक विचारांचा प्रसार होणे गरजेचे आहे, असे मत आपल्या अध्यक्षीय भाषणातून संत रविदास चर्मकार कमेटी चे संचालक संजय राजपांडे सर यांनी व्यक्त केले. याप्रसंगी अध्यक्ष रजत राजपांडे, उपाध्यक्ष विशाल राजपांडे, सचिव कार्तिक तिलातिय, योगेश राजपांडे, विशाल राजपाडे, बादल राजपांडे, करन चौसरे, हिमेश राजपांडे, प्रिंस राजपाण्डे, रोहन राजपांडे, सुमित चौसरे, सर्व चर्मकार समाज बंधु उपस्थित होते.

# भारतीय मजदूर संघाचे श्रमिक अभियान

■ महासागर प्रतिनिधी
दि. नागपूर , १० :
मातृ संस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असलेला भारतीय मजदूर संघ ७० वर्ष पूर्ण करत आहे. भारतीय मजदूर संघाचे संस्थापक श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडीजी यांनी आपले जीवन कामगार हितार्थ समर्पित केले कायम, कंत्राटी, संघटित, असंघटीत कामगारांचे नेतृत्व करत शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रहित उद्योगहित कामगार हित या त्रिसूत्रीवर काम करत त्याग तपस्या आणि बलिदान देणारे अनेक कार्यकर्ते संघाने घडवले. आज दोन कोटी पेक्षा सदस्य संख्या असलेले देशातील मजबूत व बलाढ्य असे हे संघटन आहे.




भारतीय मजदूर संघाच्या वीज कंत्राटी कामगार संघाने डिसेंबर महिन्यात श्रमिक संपर्क अभियान आयोजित केले असून तळागाळातील शोषित पीडित वंचित वीज कंत्राटी कामगारांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या समस्यां जाणून घेण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जाऊन कामगारांशी संवाद साधणार असल्याची माहिती संघटनेचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी दिली. कोरोना काळात आघाडी सरकारने नेहमी प्रमाणे या वीज कंत्राटी कामगारांकडे दुर्लक्ष केले. जनतेला वीज सेवा देताना अनेक कामगार शहिद झाले, अनेक कंत्राटदारांनी शासकीय संविधानिक देण्याची लूट संगनमताने केल्याने कामगारांचे करोडो रुपये लुटले गेले. मात्र आघाडी सरकारने नेहमी प्रमाणे या वीज कंत्राटी कामगारांकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केले.

महायुती सरकारच्या अडीच वर्षे कार्यकाळात संघटनेने विधानसभा मुंबई नागपूर, आझाद मैदान, मंत्रालय, नागपुरात येथे आंदोलन करत संघर्ष केल्यामुळे तिन्ही वीज कंपनीतील वीज कंत्राटी कामगारांना दिवाळीत पगार, बोनस, १९% पगार वाढ, या पगारवाढीचा फरक, तसेच भरतीमध्ये वयात ४५ वर्षापर्यंत सवलत, जादा १० गुण, अपघाती मृत्यू पश्चात वारसाला ४ लाख आर्थिक निधी, ५ लाख रुपयांचे विमा कवच, राष्ट्रीयकृत बँकेत वेतन खाते, आय टी आय करण्यास मुदत वाढ व नोकरीत थोडे संरक्षण असे अनेक लाभ ४२००० कंत्राटी कामगारांना संघटनेने सरकार विरोधात संघर्ष मिळवून दिल्याने कामगार वर्ग खुश झाला. माजी उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस, चंद्रशेखरजी बावनकुळे, कामगारमंत्री सुरेश खाडे व अपर प्रधान सचिव ऊर्जा, तिन्ही वीज कंपनी प्रशासनाचे संघटनेला विशेष सहकार्य लाभले. पुणे येथे झालेल्या प्रदेश कार्यकारणी मध्ये नवीन स्थापन झालेल्या सरकारच्या अभिनंदनाचा ठराव संघटनेने पारित केला. नवीन सरकार मधील मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री, ऊर्जामंत्री व कामगार मंत्री हे आगामी काळात संघटनेला नक्कीच सकारात्मक सहकार्य करून बदमाश कंत्राटदारावर कारवाई, कंत्राटदार विरहित रोजगाराच्या हरियाना पॅटर्न, जॉब सिक्युरिटी, तिन्ही कंपनीत समान वेतन, भरतीमध्ये प्राधान्याने आरक्षण व अन्य अनेक प्रलंबित समस्यांवर निश्चितच तोडगा काढतील असा विश्वास संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात यांनी व्यक्त केले .

## नवजात मुलीला बेवारस सोडले

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** अनैतिक संबंधातून जन्माला आलेल्या गोंडस मुलीला रस्त्यावर बेवारस सोडून पळ काढणाऱ्या मातेविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. ही घटना सोमवारी दुपारी २.१५ वाजताच्या सुमारास यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत वांजरा लेआऊट परिसरात उघडकीस आली. मुलगी अवघ्या एक दिवसाची असल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वांजरा लेआऊट परिसरात राहणारे रहमत खान मोहम्मद खान (५२) यांना दुपारच्या सुमारास घरामागून बाळाच्या रडण्याचा आवाज आला. त्यांनी मागे जाऊन पाहिले असता कापडामध्ये गुंडाळलेली एक मुलगी आढळली. त्यांनी तत्काळ पोलिसांना सूचना दिली. यशोधरानगर पोलिस घटनास्थळी पोहोचले. मुलीला ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. रहमत यांच्या तक्रारीवरून अज्ञात मातेवर बाळ जन्माची लपवणूक केल्याचा गुन्हा नोंदवून तिचा शोध सुरू करण्यात आला आहे.

# आरआयबीची विद्यार्थिनी साक्षी रोहाडची निवड



■ महासागर प्रतिनिधी
कुही , दि. १० :
राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयातील साक्षी मोहन रोहाड या बी.कॉम. तृतिय वर्षाच्या विद्यार्थ्यांनीची निवड करण्यात आली. दिल्ली येथे महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करियर कट्टा युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी, नजरे समोर राष्ट्र.... हृदयात महाराष्ट्र प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्य कर्तृत्वाचा आलेख मांडणारी संवाद श्रृंखला. या अभ्यास केंद्रा अंतर्गत महाराष्ट्रातून ऊपक्रमात विचक्षण व चिकाटीपूर्ण तसेच गुणवत्ता, सातत्य व परीश्रम प्रियता या निकषाचे मूल्यांकनावरून निवड करण्यात आली. दि. ७ डिसेंबर ते १२ डिसेंबर २०२४ या कालावधीत दिल्ली येथे आय. एस.एस.मराठी अधिका-याच्यष्पन्नासहून अधिक विशेष मुलाखतीचे मार्गदर्शन सत्राचा लाभ या विद्यार्थ्यांना होणार आहे. विविध प्रशासकीय सेवेतील क्षमता, पात्रता, सेवा, संधी व प्रयास इत्यादी महत्त्वपूर्ण विषयावर सहभागी विद्यार्थ्यांना यात लाभ होणार आहे. म.मा.तं.स. केंद्राचे मा.अध्यक्ष श्री यशवंत शितोळे यांनी निवड केलेल्या राज्यातील पाच विद्यार्थ्यांमधे महाविद्यालयाच्या कु साक्षी रोहाड हीची निवड केल्या गेली. तिच्या या निवडीबद्दल ग्रा.वि.शि.मं.चे अध्यक्ष एच जी नागमोते, सचिव जी.एन.धवड व पदाधीकारी सदस्य यांनी अभिनंदन केले. दिल्ली येथील सहभागासाठी तिचे पालक मोहन रोहाड व कुटुंबीयांनी संमती दिली. साक्षीच्या झालेल्या या निवडीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा मानसिक न्यूनगंड मनातून हद्दपार करणारा असून विद्यार्थ्यांच्या मनात ऊर्जा ऊत्साह व आत्मविश्वास बळकट करणारा आहे असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन मांडेकर यांनी व्यक्त केले.

सहभागी विद्यार्थ्यामधे कु.स्नेहा पिळवटकर, गो.से..क.वा.व वि.म.खामगाव , पूर्वा र.वानखेडे, विद्या प्रतिष्ठान क.वा.व वि.म.बारामती, शंतनु व्ही.चिंचाळकर, आर्यन ए.कूकडे कमला नेहरू महा.नागपूर यांचा समावेश आहे. महाविद्यालयातील करीअर कट्टा विभागाचे समन्वयक व सहसमन्वयक सर्वस्वी डॉ प्रविण लामखाडे, डॉ गायत्री कुकडे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. साक्षीच्या निवडीबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# कचारी सावंगा येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी संपन्न

## शिक्षण विभाग, पंचायत समिती, काटोल यांचे आयोजन

**उच्च प्राथमिक गटात आदित्य शेंडे तर माध्यमिक गटात रितेश युवनाते यांनी पटकविला 'प्रथम' क्रमांक**



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १० :
विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या नवकल्पनांना चालना देण्यासाठी शिक्षण विभाग, पंचायत समिती काटोलतर्फे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कचारी सावंगा येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन काटोल-नरखेड विधानसभा क्षेत्राचे आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते पार पडले तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सभापती संजय डांगोरे तर प्रमुख अतिथी म्हणून जि.प.सदस्या पुष्पाताई चाफले, शाळेचे संस्थापक शिवदयाल दुबे, निलेश दुबे, दिलेश ठाकरे, किशोर गाढवे, अशोक काळे, प्रमोद चाफले,गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार जनबंधू, शिक्षण विस्तार अधिकारी जावेद इकबाल, प्राचार्य मुकेश दुबे, केंद्रप्रमुख महेश राकेश, केंद्रप्रमुख निळकंठ लोहकरे प्रामुख्याने उपस्थित होते. उच्च प्राथमिक गटात (वर्ग ६ ते ८) प्रथम क्रमांक -आदित्य शेंडे (जि.प.उच्च प्राथमिक शाळा, कलंभा), द्वितीय क्रमांक -वंश बोरजे (जि.प.उच्च प्राथमिक शाळा, फेटरी) व तृतीय क्रमांक -पलक आहुजा (ऑर्किड पब्लिक स्कूल, काटोल )तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात (वर्ग ९ ते १२) प्रथम क्रमांक -रितेश युवनाते (लाखोटिया भुतडा कनिष्ठ महाविद्यालय, कोंढाळी),

द्वितीय क्रमांक -अनुष्का बोंदरे (बी आर ज्युनिअर कॉलेज, काटोल) तर तृतीय क्रमांक-जुबेर शेख (आदर्श विद्यालय, कचारी सावंगा), यांनी पटकावला. सोबतच शैक्षणिक साहित्य निर्मिती गटात प्राथमिक शिक्षकांमधून गंगाधर गायकवाड (जि.प.उच्च प्राथमिक शाळा, धोतीवाडा)यांनी तर माध्यमिक शिक्षक गटातून भारत लखोटे (ग्रामविकास विद्यालय, मेटपांजरा) तसेच प्रयोगशाळा परिचर म्हणून प्रल्हाद जयपूरकर (लखोटीया भुतडा विद्यालय, कोंढाळी)यांनी अव्वल स्थान प्राप्त केले. विजेतांना अतिथींच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विज्ञान प्रदर्शनी मधील प्रतिकृतीचे मूल्यांकन नबीरा महाविद्यालय, काटोल येथील प्रा. पुष्पराज भुयार, प्रा. लिना मानकर , प्रा.जगदिश सिरस्कर , प्रा. निलिमा पाठे , प्रा. राहुल बन्सोड ,प्रा.रुपाली तिखे, प्रा. प्रिया भक्ते, प्रा. महेश भोसे यांनी केले. विज्ञान प्रदर्शनी उच्च प्राथमिक गटात ९३ तर माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात ५७ तसेच शिक्षक गटात ११ प्रतिकृती आलेल्या होत्या. पर्यावरण संवर्धन, ऊर्जा, शेती, आरोग्य,तंत्रज्ञान,गणित या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले. प्रदर्शनीला पालक, शिक्षक आणि स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गट शिक्षणाधिकारी प्रदीपकुमार जनबंधू, संचालन निलेश पोपटकर व प्रियंका जंगले तर आभार प्रदर्शन शिक्षण विस्तार अधिकारी जावेद इकबाल यांनी केले. यशस्वी करण्याकरिता केंद्रप्रमुख महेश राकेश,एकनाथ खजुरिया, गोविंद काळे, राजू बगवे,योगेश चरडे, महेंद्र साव, स्वाती बन्सोड, राजेंद्र बोरकर, घनश्याम भडांगे, राजेश मथुरे आदींनी अथक परिश्रम घेतले.

## वंचित बहुजन आघाडी तर्फे आयोजित ईव्हिएम विरोधी जनआंदोलन ईव्हिएम स्वाक्षरी मोहीमेला जनतेचा उत्फुर्स प्रतीसाद

**महासागर तालुका प्रतिनिधी कामठी** वंचित बहुजन आघाडी कामठी शहर चे वतीने कामठी शहरात वार्डा वार्डा मध्ये विरोधी जनआंदोलन ईव्हिएम स्वाक्षरी मोहीम श्री.प्रशांत नगरकर जिल्हा महासचिव पुर्व वंचित बहुजन आघाडी व दिपक वासनिक अध्यक्ष कामठी शहर वंचित बहुजन आघाडी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत आहे सदर आंदोलनास जनतेचा चांगला प्रतिसाद मिळत आहे सदर मोहिम दिनांक ७/१२/२०२४ पासून सुरू करण्यात आली असून सदर मोहिम १७/१२/२०२४ पर्यंत राबविण्यात वंचित बहुजन आघाडी कामठी शहर चे उपाध्यक्ष अविनाश गजभिये, नितेश नागदेवे , शकील भाई अहमद, डॉ संजय शेंदरे, महासचिव राजेश




ढोके, सचिव अजय मेश्राम, प्रवक्त्या यशवंत शेंडे, सदस्य तुषार खोब्रागडे, भाऊराव मेश्राम, सुनील बहादुरे, माजी नगरसेवक तथा माजी अध्यक्ष प्रमोद (दादा भाऊ) कांबळे युवा आघाडी पदाधिकारी दिनेश शंभरकर रवी वानखेडे, विदेश डोंगरे, अल्पेस वालदे , कार्यकर्ते अश्वजीत पाटील, अनिकेत वासनिक यांनी सहभाग घेतला आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ५६ प्रकरणांची नोंद






## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर , दि. १० : नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. मंगळवार (१०) रोजी शोध पथकाने ५६ प्रकरणांची नोंद करून ५०,७००/-रुपयाचा दंड वसूल केला. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी थुंकणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून २०० रुपयांची वसुली करण्यात आली. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/-दंड) या अंतर्गत १२ प्रकरणांची नोंद करून ४,८००/-रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत ३ प्रकरणांची नोंद करून ३०० रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/-दंड) या अंतर्गत ४ प्रकरणांची नोंद करून १,६००/-रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत १६ प्रकरणांची नोंद करून ३५,०००/-रूपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी बांधकामाचा मलबा / टाकवू कचरा टाकणे साठवणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १,००० रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास १४ प्रकरणांची नोंद करून २,८००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ५ प्रकरणांची नोंद करून ५,०००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच उपद्रव शोध पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत असल्लम रेहमान शेख यांनी परवानगीशिवाय विद्युत जोडणीसाठी खोदकाम करून सर्व्हिस रोडचे नुकसान केल्याबद्दल रू. १५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. धंतोली झोन अंतर्गत मे. ईरा कन्स्ट्रकशन यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्याकडेला टाकल्याबद्दल रू. १०,०००/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. दिपानी टेड्रर्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. लकडगंज झोन अंतर्गत मे.जी एन एन्टरप्रायझेस यांनी दुकानातील साहित्य रस्त्याच्या कडेला टाकल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. मंगळवारी झोन अंतर्गत मे. समाधान होमस यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्या कडेला टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. उपद्रव शोध पथकाने ५ प्रकरणांची नोंद करून रू. ४५,०००/-दंड वसूल केला.

# डॉ.बाबसाहेब आंबेडकर इंटरनेशनल पार्क नारा झालाच पाहिजे !




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर , दि. १० :
डॉ.बाबसाहेब आंबेडकर इंटरनेशनल पार्क नारा झालाच पाहिजे याकरिता ७० दिवसापासून आंदोलन सुरू आहे नागपुर शहर विकास आराखडा मध्ये १९९५ ला समाविष्ट केल्यामुळे आहे. महाराष्ट्र सरकारने २००० मध्ये १३० एकर जागेवर पार्क विकसित करण्यासाठी मंजुरी प्रदान केली. हा मुद्दा गत २५ वर्षापासून एरनिवर पडल्यामुळे पार्कची जागा बिल्डरच्या घशात घालण्याचा प्रयत्न काही प्रशासकीय अधिकारी व नेते मंडळी करत असल्यामुळे लोकांच्या मनात द्वेषाची भावना निर्माण झाली आहे. ७० दिवस उलटूनही प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे १९ डिसेंबर २०२४ ला विधान भवनावर धडक मोर्चा समिती च्यावतीने काढण्याचे ठरवले आहे. शासनाने लक्ष वेधून या प्रकरणाकडे बारकाईने लक्ष द्यावे अन्यथा पुढे शासनाला गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. उत्तर नागपूर मागासवर्गीय मतदार संघ असून या भागात मोठ्या संख्येने बौध्द, शीख, मुस्लिम, सिंधी व हिंदी समज मोठ्या संख्येने राहतो आहे. माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येऊ शकतात.करिता विकास आराखडा मध्ये असलेली पार्क ची जमीन संपादीत करून पार्क विकसित करावा अशी अपेक्षा करण्यात येत आहे.

## बांगला देशमध्ये हिंदूंवरील अत्याचाराच्या निषेधार्थ

# सकल हिंदू समाजातर्फे मोर्चा



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**

बांगलादेशमधील हिंदू व अल्पसंख्याकांवर होत असलेल्या अत्याचाराविरोधात आता संघाशी निगडित विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सकल हिंदू समाज या बॅनरखाली एकत्रित येऊन विश्व हिंदू परिषदेच्या वतीने सकल हिंदू समाजातर्फे जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त बांगला देशातील हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अत्याचारांचा निषेध करण्यासाठी मोर्चा आणि सभेचे आयोजन १० डिसे.२०२४ ला करण्यात आले होते. शहरातील सहाही विधानसभा मतदारसंघांतून वेगवेगळे भागातून सकल हिंदू समाजाद्वारे विधानसभा मतदारसंघनिहाय मोर्चा काढण्यात आला.

सतरंजीपुरा चौक (पूर्व नागपूर), छावणी चौक (पश्चिम नागपूर), कमाल चौक (उत्तर नागपूर), सक्करदरा चौक (दक्षिण नागपूर), बडकस चौक (मध्य नागपूर) तर अजनी चौक (दक्षिण-पश्चिम नागपूर) येथून मोर्चा काढण्यात आला. सर्वांचे व्हेरायटी चौकात एकत्रीकरण झाले.

त्यानंतर चौकात संघाचे अखिल भारतीय प्रचारप्रमुख सुनील आंबेकर यांच्या उपस्थितीत झाली. बांगलादेशातील हिंदू, शीख, जैन आणि बौद्ध धर्मीयांच्या घरांची जाळपोळ, लूट, तोडफोड केली जात आहे.

दिवसेंदिवस अत्याचाराच्या घट्ना वाढताहेत. मंदिरे आणि प्रार्थनास्थळांवर हल्ले करून मूतीर्ची विटंबना केली जात आहे. हिंदू मुली आणि महिलांवर बलात्कार, हत्या तसेच घरांची लूट व जाळपोळ सुरू आहे. बांगलादेशातील इस्कॉनचे महंत चिन्मयदास आणि इतर सोळा हिंदू नेत्यांना बांगलादेश सरकारने राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली आहे.

संघाने सातत्याने याविरोधात आवाज उचलला. सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनीदेखील भूमिका मांडली होती. केंद्र शासनाने तातडीने यावर उपाययोजना करावी व आंतरराष्ट्रीय दबाव आणून बांगलादेशमधील हे प्रकार नियंत्रणात आणावे आणि यावर तोडगा काढावा यासाठी जागतिक पातळीवर आवाज उठविण्याची गरज आहे. त्यामुळे या मोर्चाचे आयोजन करण्यात आले अशी माहिती दिली. यावेळी विहिंपचे महाराष्ट्र, गोवा प्रांतमंत्री गोविंद शेंडे, विदर्भ प्रांतमंत्री प्रशांत तितरे, अमोल ठाकरे, संस्कृत भारतीचे रमेश मंत्री आणि इतर पदाअधिकारी विविध भागातून मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## भारतीय राज्यघटनेपुढील धोके व आव्हाने यावर परिसंवाद

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**

भारतीय राज्यघटने पुढील धोके व आव्हाने लक्षात घेता लोकसेवा समता प्रतिष्ठान नागपूर द्वारा भारतीय राज्यघटने पुढील धोके व आव्हाने या विषयावर परिसंवाद आयोजित केले आहे.

या परिसंवादाचे आयोजन 14 डिसेंबरला दुपारी 2.30 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर तिरपुडे हॉस्पिटल शेजारी कामठी रोड नागपूर येथे आयोजित केले आहे.



या परिसंवादाला वक्ते म्हणून सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश न्या. बी.सी. चंद्रकापुरे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. व्ही.पी. पानतावणे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड प्रदीप वाठोरे, कृषी तज्ञ व सामाजिक कार्यकर्ते अविनाश काकडे, कामगार नेता वसंत मुंडले लाभणार आहेत, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या पत्रकार परिषदेत ॲड. विष्णू पानतावणे, ॲड. रवीप्रकाश वर्मा, ॲड. सतीश शेबे, सिद्धार्थ उके उपस्थित होते.

## दृश्यम स्टाईलने केली प्रेयसीची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**

विवाहित असतानाही दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. प्रेमाखातर मुले आणि पतीला सोडून त्याच्यासोबत पळून जाण्यास महिला तयार झाली. चिमूर येथून नागपूरला आली. मात्र येथे प्रियकरासोबत भांडण झाले.

प्रियकराने रागात गळा आवळून तिचा खून केला. त्यानंतर दृष्यम चित्रपटाप्रमाणे तिचा मृतदेह एका निमार्णाधिन इमारतीच्या सेप्टिक टँकमध्ये लपवला. ही खळबळजनक घटना मंगळवारी बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी आरोपीला अटक करून मृतदेह ताब्यात घेतला. अनुराधा (४०) रा. चिमूर असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. अटकेतील आरोपी नरेश उर्फ नरेंद्र पांडुरंग डाहुले (४०) रा. बेसा-घोगली आहे.

नरेश हा चंद्रपूर पोलिसात कार्यरत होता. अवैधकामांत सक्रीय असल्यामुळे त्याला याच वर्षी जानेवारी महिन्यात सेवेतून बडतर्फ करण्यात आले. तेव्हापासून तो घोगली परिसरात रहात होता. अनुराधाचे पती बँकेत वरिष्ठ अधिकारी आहेत. तिला एक मुलगाही आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नरेश आणि अनुराधा एकाच शाळेत शिकत होते. दहावीनंतर दोघांचाही संपर्क तुटला. ऑगस्ट महिन्यात फेसबुकच्या माध्यमातून दोघे पुन्हा संपर्कात आले. चॅटिंग सुरू झाली आणि मैत्रीचे रुपांतर प्रेमसंबंधात झाले. नरेशने अनुराधावर घरून पळून येत लग्न करण्यासाठी दबाव टाकला. २६ नोव्हेंबर रोजी अनुराधा ट्रॅव्हल्स बसने नागपुरात आली आणि नरेशला भेटायला गांधीबाग परिसरात गेली. नरेश तिला कारमध्ये बसवून रेशिमबाग परिसरात घेऊन गेला.

घरून पळून आल्यावरून दोघांमध्ये भांडण झाले. हा वाद वाढत गेला आणि रागात नरेशने अनुराधाच्या ओढणीनेच तिचा गळा आवळला. त्यानंतर तो कारमध्ये अनुराधाचा मृतदेह घेऊन शहरभर फिरला.

बुटीबोरी परिसरातही गेला, मात्र तेथे त्याला मृतदेहाची व्हीलेवाट लावण्यासाठी जागा मिळाली नाही आणि तो परतला. जवळपास ८ तासांपर्यंत इकडे-तिकडे फिरल्यानंतर त्याने अनुराधाचा मृतदेह वेळाहरी गावातील एका निमार्णाधिन इमारतीच्या सेप्टिक टँकमध्ये फेकला. त्यानंतर माती आणि कचरा टाकून टँक टीनाने बंद केले.

नरेशला वाटले की, अनुराधाचा मृतदेह कुजल्यानंतर सर्वांना घटनेची माहिती होईल. त्यामुळे त्याने परिसरातील एका कुत्र्याचीही हत्या केली आणि त्याचा मृतदेह सेप्टिक टँकजवळ फेकला.

स्वतःचा आणि अनुराधाचा मोबाईल बंद करून गांधीबाग परिसरात पोहोचला. तेथे पुन्हा मोबाईल सुरु केले आणि दोन्ही फोन रस्त्यावर फेकून रात्री 11 वाजताच्या सुमारास आपल्या घरी गेल्याचे समोर आले आहे.



**चंद्रपुरातून केली कार चोरी**

पोलिसांनी अंदाज वर्तविला आहे की, नरेशने आधीच अनुराधाचा खून करण्याची योजना बनवली होती. त्याला संशय होता की, अनुराधा घरून पळून यायला नकार देईल. त्यामुळे त्याने चंद्रपुरातून एक कार चोरी केली. याच कारमध्ये तो अनुराधासह फिरत होता.

चंद्रपूरच्या स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी)ने कार चोरीचा तपास सुरू केला होता. अखेर पोलिसांना नरेशचा सुगावा लागला. पोलिसांनी त्याला कारसह अटक केली. तांत्रिक तपासादरम्यान तो अनुराधाच्या सतत संपर्कात असल्याचे पुढे आले. अनुराधा घरून बेपत्ता असल्याने पोलिसांचा संशय वाढला.

सखोल चौकशी केली असता नरेशने अनुराधाचा खून करून मृतदेह वेळाहरी परिसरात फेकल्याची माहिती दिली. मंगळवारी दुपारी चंद्रपूरचे एलसीबी पथक नरेशला सोबत घेऊन नागपुरात आले. बेलतरोडी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी अनुराधाचा मृतदेह ताब्यात घेऊन मेडिकल रुग्णालयात रवाना केला. बुधवारी मृतदेहाची उत्तरीय तपासणी केली जाईल.

## सुविधेमध्ये कोणतीही उणीव नसेल




■ **महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. १० :**

परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ नागपूर अंतर्गत 26 जानेवारी 2025 भव्य सेवक संमेलन पावडदौना (मौदा) येथील आश्रमात आयोजित करण्यात आला आहे.

त्यानिमित्त मौदा तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली मंडळाचे अध्यक्ष राजू मदनकर व सर्व विभागाच्या पदाधिकारी यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयात आज मंगळवारी बैठक पार पडली.

आश्रमला जाणाऱ्या महामार्गांवर उड्डाण पुलाचे काम प्रगतीपथावर आहे. यावर्षी सुद्धा संपूर्ण भारत देशातून सुमारे 10 लाख सेवक आश्रमला उपस्थिती दर्शवितात. दिवसेंदिवस सेवक वाढत आहेत. असे मंडळाचे अध्यक्ष राजू मदणकर यांनी आपले मत व्यक्त केले.

पोलीस विभागातर्फे पार्किंगची व्यवस्था 100 एकरात करण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळे आज पासूनच पोलीस विभागाने पार्किंग करीता नेमकी जागा ठरवावी, रस्त्याची पाहणी करावी, अग्निशमन व्यवस्था नगरपंचायत मौदा, एनटीपीसी कंपनी ला सोपविण्यात आली. पिण्याची पाण्याची व्यवस्था मंडळातर्फे करण्यात येते परंतु पाण्याची टेस्टिंग आरोग्य विभागातर्फे करण्यात येईल.

त्याचप्रमाणे आरोग्य विभाग तर्फे 3 कॅम्प लावण्यात येणार व दोन ॲम्ब्युलन्स ची सेवा उपलब्ध करण्यात येणार आहे. इमर्जन्सी करीता 10 बेड ची व्यवस्था करण्यात येईल. आश्रमच्या बाजूने पाच किलोमीटरच्या परिसरातील रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपविण्यात आले.

प्रसाधन गृहाची व्यवस्था नगरपंचायत तर्फे करण्यात येईल. ज्यादा बस ची सुविधा करण्यात येईल. पाच किलोमीटरच्या परिसरातील विद्युत खांब, तारे विद्युत विभागाला तपासून पाहण्यास सांगितले. कोणतेही अनुचित प्रकार घडणार नाही याची सर्व विभागाने दक्षता घ्यावी असे तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर यांनी सांगितले.

बैठकीला तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर, परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ नागपूरचे अध्यक्ष राजू मदनकर, मुख्याधिकारी ऋचा धाबर्डे, डॉ. उत्तम पाटील,पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे, मंडळ अधिकारी राहुल भुजाडे, अविनाश हाके सा.बा.विभाग, प्रतीक्षा पाटील तलाठी पावडदौना,अंकिता चकोले ग्रामसेवक पावडदौना, अभिजित भोयर सहायक अभियंता विद्युत विभाग, मनोहर देशमुख उपाध्यक्ष,सुरजलाल अंबुले सचिव, मोरेश्वर गभने सहसचिव, प्रवीण उराडे कोषाध्यक्ष, टिकाराम भेंडारकर, संचालक, खुशाल जगनाडे, कैलास लांजेवार, पांडुरंग शेंडे व पदाधिकारी उपस्थित होते.

## डोक्यावर बॅनर पडल्याने वृद्ध जखमी

**नागपूर :** कामठी रोड उड्डाणपुलावरून जाताना दुचाकीस्वार वृद्धाच्या डोक्यावर अचानक एका राजकीय पक्षाचे बॅनर पडले. दुचाकीस्वार गोंधळला आणि वाहनावरून त्याचे नियंत्रण सुटले. अनियंत्रित वाहन थेट पुलाच्या सुरक्षा भिंतीवर जाऊन आदळले. यात दुचाकीस्वाराच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याला उपचारार्थ रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. फिदाली फिदवी (६३) रा. गांधीबाग असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे.

फिदवी हे व्यापारी आहेत. मंगळवारी सकाळी ते एलआयसी चौकातून उड्डाणपुलावर चढले आणि दुचाकीने कामठीकडे जात होते. ऑटोमोटिव्ह चौकात अचानक एक बॅनर त्यांच्या डोक्यावर पडले. फिदवी यांचे दुचाकीवरून नियंत्रण सुटले आणि वाहन पुलाच्या सुरक्षा भिंतीवर जाऊन धडकले. डोक्यात हेलमेट असतानाही त्यांना गंभीर मार लागला. रस्त्याने ये-जा करणारे लोक त्यांच्या मदतीसाठी धावले. त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच कपिलनगर पोलिस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपास सुरू केला आहे.

## कार्यालय प्रमुखांकडून शासन निर्णयांना अभिप्रेत असलेली न्यायोचित भूमिका अपेक्षित

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १० :**

प्रत्येक कार्यालय प्रमुखांकडून विविध शासन निर्णयांना अभिप्रेत असलेली न्यायोचित भूमिका त्यांच्या प्रशासनातून, कार्यपध्दतीतून प्रतिबींबीत झाली पाहिजे. कोणत्याही कर्मचाऱ्यावर यातून अन्याय झाल्याची भावना उद्भवणार नाही. वेतनवाढ, कार्यलयीन बदली यासाठी शासनाचे सुस्पष्ट निर्णय आहेत. नियमांचे काटेकोर पालन प्रत्येक पातळीवर होणे आवश्यक आहे, असे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपूर खंडपिठाचे उपाध्यक्ष न्यायमूर्ती एम.जी.गिरटकर यांनी सांगितले.

कायद्याला अभिप्रेत असलेला शासन निर्णयाचा अन्वयार्थ अपेक्षित असतो. शासन निर्णयाचे अन्वयार्थ आपल्या मजीर्नूसार कोणी काढू नयेत. कायद्याच्या चौकटीत असणाऱ्या बाबींची पडताळणी करुनच शासन निर्णय आकार घेतात. यात न्यायाच्या भूमिकेला अधोरेखित केलेले असतात, असे न्यायमूर्ती एम.जी. गिरटकर यांनी स्पष्ट केले. ज्या कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला आहे अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या न्यायाचे रक्षण व्हावे यासाठी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण आपली जबाबदारी पार



**न्यायमूर्ती एम.जी. गिरटकर यांचे प्रतिपादन**

पाडते आहे. कनिष्ठ कर्मचाऱ्यांपासून कोणत्याही अधिकाऱ्यांना जर आपल्यावर अन्याय झाल्याची भावना असेल तर त्यांच्यासाठी हे न्यायाधिकरण आहे. यात असंख्य प्रकरणे ही समोपचाराने मिटू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर (मॅट) मध्ये दाखल प्रकरणांमध्ये आपसी सामोपचारातून न्याय मिळावा याउद्देशाने आयोजित लोक अदालतीमध्ये 145 प्रकरणांपैकी 63 प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यात आली.

न्यायमूर्ती एम.जी. गिरटकर यांच्या मार्गदर्शनाखाली 7 डिसेंबर रोजी ही विशेष लोक अदालत आयोजित करण्यात आली होती.

उच्च न्यायालयाच्या विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या लोक अदालतीत मॅटचे 2 पॅनल होते. यात पॅनल प्रमुख म्हणून न्यायमूर्ती एम.एन. गिलानी, न्यायमूर्ती के. जे रोही यांनी काम पाहिले.

पॅनल सदस्य म्हणून सेवा निवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.एस. दास, ए.पी. मते यांच्यासह ॲड. आर.एम. फटींग व पी.व्ही. ठाकरे यांनी काम पाहिले. या लोक अदालतीच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपुरचे प्रशासकीय सदस्य नितीन गद्रे, न्यायीक सदस्य एम.ए. लव्हेकर, प्रबंधक न्या. पी.व्ही. बुलबुले व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.